म. ग्रं. सं. ठाणें
विषय 1280
लेखक श्री. बी. गोगटे
सन १—
संग्रहालय क्रमांक २२८
पुस्तकाचें नांव वीरसेन नाटक
९२८४ नाट्य

वाताहत.

अथवा

# वीरसेन नाटक.

हें पुस्तक

**' स्वातंत्र्यप्रिय मंडळी पुणें '**

यांच्या चिटणिसांनीं

त्या संस्थेकरितां तयार केलें

तें

त्याच संस्थेनें छापवून प्रसिद्ध केलें.

( या पुस्तकासंबंधीं प्रसिद्ध करण्याचा वगैरे हक्क पुस्तक कर्त्यानें १८६७ च्या २५वे आक्टाप्रमाणें आपणाकडे ठेविले आहेत.)

पुणें येथें

"...मर्थ" ...खान... छापिलें.

२-२१-१९१४,

चाकर—( मुजरा करून ) ह्या तुं... स्नी द्यन्या करतां म्हून लखुटा दिला हाये ... याचे

## सूचना.

पुस्तककर्त्यांचे परवानगीशिवाय या नाटकाचा कोणासही रंगभूमीवर प्रयोग करितां येणार नाहीं.

पुस्तककर्ता.

# विज्ञप्ति.

प्रकृत पुस्तक लिहितांना फक्त एक दोनच मुद्दे पुढें मांडले असल्यामुळें नाटकाला लागणारे जे रस—मुख्य शृंगार—[ याचीच आवड समाजांत फार दिसते म्हणून यास मुख्य म्हणणें नाशिवीं येतें ] त्या सर्वांचा या पुस्तकांत समावेश करितां आला नाहीं. कोणत्याही परतंत्र झालेल्या राष्ट्रांतील लोकांनीं 'राजकीय व सामाजिक,' या दोन्ही प्रकारच्या सुधारणा करण्याचें मनांत आणिलें असतां, त्या त्या राष्ट्राच्या तत्कालीन स्थितीला अनुसरून प्रथम कोणत्या प्रकारची सुधारणा करण्याकडे त्यांनीं आपलें लक्ष पुरवावें हाच बहुतेक मुद्दा असल्यामुळें वरील अडचण दृष्टोत्पत्तीस येणार आहे. त्याप्रमाणेंच प्रत्येक वेळीं राज्यक्रांतीचे जे प्रसंग येतात ते देशांत कशा मूर्ति निपजल्यापासून येतात हेंही दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. अधिकार धारकांचा कावा कसा असतो व तो साधण्याकरितां प्रथम ते कशी साखर पेरीत असतात हें प्रत्येक मनुष्याला समजलें पाहिजे. व तें दाखवण्याचाही थोडासा प्रयत्न येथें केला आहे. स्त्रियांना कांहीं कालापूर्वी शिक्षण नव्हतें—किंवा हल्लीं तरी स्त्रीशिक्षणास लोकमताची फारशी अनुकूलता नाहीं—आतां तें देण्याची पद्धत कशी असावी हा प्रश्न वेगळा!—परंतु प्रस्तुत पुस्तकांत स्त्रियांस शिक्षण असल्यास त्या राष्ट्रोन्नतीसही उपयोगीं पडतात हेंही दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत नाटकाचें संविधानक एका फार जुनाट ऐकीव traditional गोष्टीवरून रचलें आहे.

आतां यांत दोषही बरेच सांपडणार आहेत व ते सुज्ञ वाचक त्यावेळीं [illegible]स दाखवितील अशी फार उमेद आहे.

[illegible] दास

चाकर—( मुजरा करून ) [illegible] मं. पुणें.

स्नी घेन्या करतां म्हून लखुटा दिला हाये. [illegible]

स्थळ

# सुवर्णमालिनी देशाची राजधानी सत्यपुरी व आसपासचा प्रदेश.

## आभार.

हें पुस्तक लिहितांना वेळोवेळी यांत सुधारणा करण्याबद्दल निरनिराळ्या सूचना केल्याबद्दल रा. रा. श्रीधर वामन जोशी, पब्लिक प्रॉसिक्यूटर, पुणें रा. रा. वा. वि. वैशंपायन, रा. रा. शि. स. वैशंपायन. व रा. रा. बाबुराव भालचंद्र ओंकार इनामदार यांचा मी फार आभारी आहें. माझे मित्र रा. रा. कृ. ल. सोमण यांनीं तर मला फारच मदत केली त्याबद्दल त्यांचा मी फार ऋणी आहें. रा. रा. रामचंद्र केशव लिमये, वकील यांनीं याचा प्रत्यक्ष प्रयोग पाहिल्यावर मुद्दाम मला फार हितावह सूचना केल्याबद्दल त्यांचाही मी फार आभारी आहें.

शिवराम विनायक गोगटे.
पुस्तक कर्ता.

५.२४.१८८४

## नाटकांतील पात्रें.

| | |
|---|---|
| मालोजी.... | .... सुवर्णमालिनी देशचा राजा. |
| वीरसेन .... | .... राजपुत्र ( मालोजीचा मुलगा. ) |
| चंद्रसेन. .... | .... मित्र ( वीरसेनाचा. त्याच कुटुंबांतील. ) |
| विषयीराव.... | .... सरदार (लष्करी अधिकारी) |
| घातकीराव.... | .... एक कमी दरजाचा मानकरी. |
| लिंबाजी .... | .... विश्वासु चाकर [ वीरसेनाचा. ] |
| तीव्रसेन .... | .... मुलगा ( वीरसेनाचा. ) |
| चंद्रिका .... | .... पत्नी ( वीरसेनाची. ) |
| चंद्रानना .... | .... चंद्रसेनाची भावी स्त्री ( घातकी रावाची बहिण. ) |
| सुशीला .... | .... दासी ( चंद्रिकेची. ) |
| अखूतरशहा.... | .... समर्कंद येथील बादशहाचा सरदार. |
| दिलेलशहा.... | .... सरदार ( बादषहाचा. ) |
| हंबीरराव.... | .... विजयदुर्ग येथील संस्थानिक .... (मानलेला भाऊ चंद्रिकेचा. ) |
| गणपतराव, माधवराव | दोन सभ्य गृहस्थ. |

याशिवाय इतर सरदार, चाकरमाणसें, भिक्षुक, रामोशी, मांग, दवंडीवाले वगैरे.

---



चाकर—( मुजरा करून ) ह्या ...
स्नी द्यान्या करतां म्हून लखुटा दिला हाये

# सुवर्णमालिनी देशच्या राजघराण्याची वाताहत

अथवा

# वीरसेन नाटक.

## अंक पहिला.

### प्रवेश १ ला.

स्थळ—सत्यपुरी–( तलावा कांठची बाग )

[ घातकीराव व एक चाकर येतात. ]

**घातकी०**—( चाकरास ) ताबडतोब जा. पण खबरदार वाटेंत कोणी भेटल्यास त्याजजवळ कशा करितां व कोठें जात आहेस याबद्दल चकार काढशील तर! तेथें गेल्यावर हा तांबडा रुमाल देतों ( रुमाल पुढें करून ) हा दाखीव, म्हणजे तुला थेट अखुतर[illegible] [illegible]दार बसले असतील तेथपर्यंत [illegible] [illegible] येईल. ( त्या रुमा[illegible] देतो ). [illegible]

**चाकर**—( मुजरा करून ) ह्यो तुं[illegible] [illegible]स्नी द्येन्या करतां म्हून लखुटा दिला हाये[illegible] [illegible]

फाडून तुकडे कर! समजलास! जा. तूं येईपर्यंत मी येथेंच बागेंत आहें! मात्र ध्यानांत ठेव!

चाकर०--त्यायिशि इक्तबी नग मनांत आना-या. अक्शी ततच जातो. (चाकर मुजरा करून जातो.)

घातकी०--(चाकर गेलासें पाहून, आपल्याशीं) हें एवढं काम झालं ह्मणजे रंकाचा राव करणं व रावाचा रंक करणं हें ईश्वराधीन आहे किंवा मनुष्याधीन आहे, हें लवकरच लोकांच्या प्रत्ययाला आणतों! कांहीं बावळे व देवभोळे लोक "ईश्वराचं कर्तृत्व अगाध आहे, व त्याचं गारुड कोणालाही समजत नाहीं" असं ह्मणतात! मग मी ह्मणतों कीं मनुष्याचं गारुड तरी कोणाला समजतं का? (ओंठ आंवळून) आँ! मी ह्मणजे यःकश्चित्! आणि हे राजश्री माळ सिंहासनावर बसणार म्हणून थोर! बरं बरं! घेतों समाचार! गुलामा तुझीं पाळं मुळं खणून काढतों! तूं काय समजलास! स्वराज्य व स्वातंत्र्य याबद्दल लोकांना स्वप्नांत सुद्धां आठवण हो-ऊं नये अशी स्थिति करून टाकतों! व तसे विचार नुसते मनांत आणणं देखील भयप्रद असं वाटायला लावतों! थांब! वीरसेन[illegible] ज्या घातकी[illegible]ला तूं सिंहासनाच[illegible] भा[illegible] अवि[illegible]णी म्हण[illegible]

फ[illegible]वीत [illegible]

तुझ्य

आज जो अख्तरशहा मागें मागें पाऊल घेतोसा दिसत आहे, तोच अख्तरशहा आपल्या लोकांसह सर्व देशांत इकडून तिकडे वावरूं लागून तुला 'दे माय धरणी ठाय' करून टाकील! (रागावून) ती रांड चंद्रिका! तिचा तर मला सूड घेतलाच पाहिजे! रांडेनें मजशीं विवाह तर नाहींच लावला, परंतु वीरसेनाशीं विवाह झाल्यावर उलट माझी थट्टा व बेअदबी करूं लागली! माझं वय तीस वर्षांचं देखील नाहीं! थांब! रांडे, तुझी दैना दैना करून टाकतों! प्रत्यक्ष विवाह नाहीं तर नाहीं; परंतु बलात्कारानें किंवा वाटेल त्या अन्य तऱ्हेनें तुजशीं संगमसुख घेईन तरच नांवाचा घातकीराव! या कृत्याला म्हणजे फारसा अवकाश आहे असं नाहीं! कांकडा पेटवून तयार आहे! फक्त लावायचाच अवकाश! इतक[illegible] देखील अवधि देण्याचं माझ्या मनांत नव्हतं; परंतु ही राज्य प्रकरणाची म्हणजे विचाराचीच गोष्ट पडली, तेव्हां उच्छृंखलपणा करतां येत नाहीं! तरी पण रांडे तुझा, त्या राजा म्हणवून घेणाऱ्या धगडाचा व चंद्रसेनाचा लवकरच समाचार घेतों! कोणी कां राजा होईना! माझ्या सुखाची तोड निघाली म्हणजे झालं! (थांबून आनंद[illegible] माझ्या कृ[illegible]ंत सा[illegible]दार ही पण कसा [illegible] च मनप[illegible] मेळा[illegible] अ[illegible]! मनुष्याला

चाकर—(मुजरा करून) ह्यां त[illegible] तो [illegible]य [illegible]नी द्येन्या करतां म्हून लखुटा दिला हाये[illegible] करण्या-

ला मागं घेणार नाहीं! त्याचप्रमाणें चंद्रिकेविषयीं मनांत भरवून दिल्यामुळं विषयीरावासारखा पुरा राजनिष्ठ लष्करी अमलदारही माझा दासानुदास बनण्यास तयार झाला! बस्स! झालं म्हणून समजा गुलामानों! (पाहिलेंसें करून) हीं पहा! नांव घ्यायचा अवकाश! स्वारी तयारच!!

(विषयीराव येतो.)

**विषयी०**—कां घातकीराव, कसं काय? ठरल्याप्रमाणें मी तर आलों! आणि तुम्ही स्वस्थसे? तुमची तर तयारी कांहींच दिसत नाहीं! तुम्ही अद्याप छावणीकडे मनुष्यच पाठवला नाहीं वाटतं?

**घातकी०**—वा! त्याचीच तर येण्याची वाट पहात आहें!

**विषयी०**—पण काहो घातकीराव, कालपासून मी आपल्या मनाशीं विचार करीत आहें; परंतु आपण हें असं करावं अशी माझी कांहीं मती चालत नाहीं!

(घातकीराव साशंक त्याजकडे पाहूं लागतो).

**विषयी०**—कारण ज्यांच्या कबज्यांत आपण सर्वस्व देण्याचं पत्करलं आहे, ते आपल्या देशांतले नसून त्यांच्याशीं आपला काडी इतका देखील बरावाईट संबंध नाहीं। शिवाय धर्म देखील भिन्न! तेव्हां या गोष्टीला [illegible] व्हावे अशी [illegible]

कांहीं कबू[illegible]

स्वतःच्याच

जनांच्या शापाचा बोजा शिरावर घेणं हें आपल्याला कांहीं संमत नाहीं!

**घातकी०**——( एकीकडे ) यावरून कदाचित् माझा प्राण कायम ठेवणं हेंही तुला संमत होणार नाहीं! कारण काय नेम सांगावा! तुला संमत नसलं, तर तुझा प्राण कायम ठेवणं हें तरी कोणाला संमत आहे इथे! ( तरवारीस हात घालतो, व पुनः चपापून ) असं नाहीं! याचं खरं मत काय आहे तें आधीं पहावं! नाहीं तर मग आहेच! जातो कुठे! ( उघड ) स्वदेशी आहेत किंवा परदेशी आहेत त्याची पंचाईत, आपली तुंबडी भरल्याशी कारण! म्हणे शिव्याशाप डोक्यावर बसतील! अहो, त्यांत काय आहे! आपल्याला तरी कितीसे दिवस काढायचे आहेत आणखी! आहेत तेवढ्यांत ऐषआराम झाला म्हणजे झालं! पुढें म्हणाल तर 'आपमुवे पीछे डुबगयी दुनया'! आणि हें एक तुम्हाला सांगून ठेवतों कीं या मुसलमानांच्या उपयोगीं पडून त्यांना मदत करण्यांत जो फायदा आहे, तोच एखाद्या स्वदेशी संस्थानिकाला करून कधींच होणार नाहीं!

**विषयी०**——हो. तेंही खरंच!

[illegible] ! इतक्यांत [illegible] )

**चाकर**——( मुजरा करून ) हा [illegible] शी अ[illegible]नास्नी द्येन्या करतां म्हून लखुटा दिला हाये!

**घातकी०**—( पत्र फोडून ) विषयीराव, झालं आपलं काम! ( टाळी देतो ) उद्यांचाच बार!

**विषय०**—काय ? झालं काम ? वाचा तर खरं!

**चाकर०**—आपनास्नी तवड तडक बोहिल हाये!

**घातकी०**—जा. मी येतोंच. ( पत्र वाचतो )

" प्रिय मित्र सरदार घातकीराव यांसः—

नम्रतापूर्वक रामराम विशेष.

ठरल्याप्रमाणें आपल्या दरबारीं आमचे इकडून वकील पाठविण्यांत आला होता; व तेथील प्रकार आपण अटकळ केल्याप्रमाणेंच घडून आला. आपल्या इषारतीचा विचार चालला असतां, आपल कडून मनुष्यही वेळींच येऊन पोंहोंचला. त्याचे बरोबर हा लखोटा पाठविण्यांत आला आहे. तरी विचारा प्रमाणें छावणीकडे येण्याची तसदी घेणें हे विनंति!

**अख्तरशहा सरदार यांचे हुकुमावरून.**

(आपल्याशीं) हें ठीक झालं! आतां मात्र या गुलामाला आरंभलेले काम तडीस जाईपर्यंत एकटा सोडतां कामा नये! ( उघड ) विषयीराव, चला. एकदां तिकडे जाऊन आलं पाहिजे खरं! हें पहा ही सगळी खटपट तुम्हाला सुख होण्याकरितां! माझं काय आहे.

**विषयी०**—[illegible] आ[illegible] चला.

[ जातात. ]

**प्रवेश पहिला समाप्त.**

## प्रवेश दुसरा.

स्थळ—राजवाड्यांतील खासगी दिवाणखाना.

[ चंद्रसेन बसलेला प्रवेश करितो. ]

चंद्रसेन—( आपल्याशीं ) राज्यांत मंत्री चांगला नसला म्हणजे राजा कितीही हुषार असो; त्याची मूर्खांतच जमा! तद्वत हल्लीं आमची स्थिति झाली आहे. आमच्या राज्याचे केवळ खांब, सर्व जगांत वाखणलेले, ज्यांच्या नांवाचा डंका सर्व जगभर पसरलेला, ज्यांच्या अकलेची व शहाणपणाची तारीफ करून परराष्ट्रांतील न्यायपटु व अकलेचे केवळ भांडारच असे अखूतरशहासारखे देखील तोंडांत बोट घालून थक्क होत असत, ज्यांनीं आपल्या अकलेच्या व राज्यधोरणी विचारांच्या जोरावर आमच्या यशोदुंदुभीच्या नादानें सर्व देश गजबजून टाकला, व ज्यांच्याकरितां सर्व अबालवृद्ध शोकग्रस्त झाले आहेत; त्या एकट्या धूर्तशील अमात्यांच्या मरणानें आमच्या राज्यांत इतका विसंगतपणा झाला! जो अखूतशहा पूर्वी एकेक पाऊल मागें हटत होता, तोच हल्लीं पुढं पुढं येऊन एकेक प्रांत घशांत टाकण्याची सुरवात करूं लागला! आपआ[illegible]त [illegible]टे आणि दुफळ्या यांना सुरवात झाली [illegible]धा चि[illegible] पुढें काय प्रसंग येईल हें कांहीं कळत नाहीं! फितुरीला तर सुरवा-

त झालीच म्हणायची! कारण तशीं चिन्हंही आतांशा दिसूं लागलीं आहेत! स्वामिभक्ति म्हणजे काय हें न-णु कांहीं कोणाला कळतच नाहीं असं झालं आहे. कांहींना कळूनही हे अज्ञानाचं जाळं पांघरून घेऊं लागले आहेत! एकंदरींत सर्वतोपरी ग्रहणकालचा वेध लागल्याप्रमाणें स्थिति झाली आहे! विषयीराव व घातकीराव यांचीं कांहीं कृष्ण कारस्थानं चालली आहेत, अशाबद्दलची बातमी काल गुप्त हेरानें दिली तेव्हां पासून तर फारच चुटपुट लागली आहे! माझं मन अगदीं अस्वस्थ झालं आहे! (किंचित् थांबून रागानें) काय करावं! हे मालोजी महाराज जर प-हिल्यापासून व्यवस्थेशीर वागले असते, व अनेक प्र-संगीं त्या अख्तरशहाकडे यांनीं खलित्यावर खलिते पाठविले नसते व या गुलामांचं वृथा प्राबल्य वाढूं दिलं नसतं, व या घडलेल्या दोन तीन चकमकींत सर्वांच्या म्हणण्याप्रमाणें वागले असते, तर आज हा प्रसंग येईल असं स्वप्नांत देखील आणायाला नको होतं! परंतु आतां विचार करण्यांत काय अर्थ आहे! अगोदर ही सर्व बातमी वीरसेनाला कळवून याचा वेळींच बंदोबस्त होईल अशी तजवीज केली पाहिजे! (उठून) प-रमेश्वरा, आह्मी [illegible] कोणत्याही प्रकारें अपराधी नाहीं. म्हणून या दुष्टांचे नीच हेतु साधण्याला मदत ही होऊं नको व साधूं ही देऊं नको! (किंचित स्तब्ध

होऊन ) नाहीं । पण तें तसं नाहींच ! याचा परिणाम कांहीं विपरीतच होणार ! अस्तु. जें प्राक्तनांत असेल तेंच होईल ! प्रथम वीरसेनाकडे जावं !

( जातो. )

**प्रवेश दुसरा समाप्त.**

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ—राजवाड्यांतील दिवाणखाना.**

[ **वीरसेन** बसलेला प्रवेश करितो. ]

**वीरसेन**०—[ आपल्याशीं ] आज माझं चित्त असं उद्विग्नकां बरं होत चाललं ! माझ्या मनांत एकाएकीं अशी भीति कां बरं उत्पन्न होऊं लागली ! काल सूर्याला खळं पडलेलं पाहिल्यापासून माझ्या अंतःकरणाची कशी भ्रमिष्ठावस्था झाली आहे. तेणेंकरून काल रात्रीं झोंप अस्वस्थ झाली, व स्वप्नंही चमत्कारिकच पडलीं ! एकंदरींत या सर्व चिन्हांचा भावार्थ काय असेल बरं ! मला वाटतं कीं खास कांहीं तरी अनिवार्य संकट ओढवणार ! नुकत्याच मुसलमानांशीं घडलेल्या दोन तीन चकमकी परिणामावर येणार असं दिसतं ! काश्या अ- ख्तरशहाचेही प्रयत्न चालू आहेत ! काय बरं करा-

वं ! कालपासून चंद्रसेनाचीही भेट झाली नाहीं. खचित आपल्या मनोगतांचा पूर बाहेर वाहूं देण्याला मित्रासारखं दुसरं साधनच नाहीं ! आज सुद्धां चंद्रसेन अद्याप कां बरं येत नाहीं ?

( इतक्यांत चंद्रसेन येतो. )

**चंद्रसेन**—( आपल्याशीं ) 'राजाला दिवाळी काय ठाऊक' ही म्हण अगदीं खरी आहे ! पहा कसे स्वस्थ बसले आहेत महाराज ! ( जवळ जाऊन, उघड ) सरकार. ( मुजरा करतो )

**वीरसेन**—( पाहून ) चंद्रसेना, ये. आतांच मी तुझी आठवण केली होती ! आलास ठीक झालं ! ( किंचित् थांबून ) चंद्रसेना काल सुर्याला खळं पडलेलं तूं पाहिलंच असशील !

**चंद्रसे०**—सरकार, त्याचंच फळ लवकर अनुभवावं लागतं कीं काय या भीतीनें आपल्याला कळवण्याकरतां आलों आहें !

**वीरसे०**—काय ! मला कळवण्याकरतां ? काय बरं असं ?

**चंद्रसे०**—अख्तरशहा अगदीं जवळ येऊन ठेपला; व त्याचा वकीलही "अमुक अमुक मुलुख ताब्यांत द्या, नाहीं तर लढाईला पुन्हा आह्मी सिद्ध आहों" असा [illegible] कारचें बोलणं लावण्याकरतां आला होता; परंतु "दोन तीन टकरा आह्मी दिल्याच आहेत आतां अखेरचीच टक्कर आह्मी तु-

म्हाला देणार ! तुमची सिध्दता असल्यास आजपासून आठ दिवसांत आम्ही तयार आहों. तुमच्या स्वाधीन मुलुख करणं वगैरेबद्दल तुमच्या तोंडून उद्गार निघाल्यास पुढें तुम्हाला क्षमा होणार नाहीं. “ असा थोरल्या सरकारानीं या प्रसंगीं खर्पूस जबाब दिल्यामुळें निरुत्तर होऊन परत गेला. आतां एकदोन दिवसांत लढाईला खास सुरवात होणार व त्यांत आपल्याला अपजयही खास येणार असं दिसतं ! आतां जरी यावळीं आपल्याला माझं बोलणं अगदीं विषतुल्य लागेल व माझा अत्यंत रागही येईल, तथापि ज्या मार्गानें मला ही गोष्ट समजली त्यावरून तरी मी आपल्याला खात्रीनें सांगतों, कीं आपल्याला जयाचा वांटा मिळणं म्हणजे फारकरून दुरापास्तच !

**वीरसे०**—चंद्रसेना. ही गोष्ट तुला कशी समजली हें सांग तरी !

**चंद्रसे०**—सरकार, कशी समजली व काय समजली हेंजरी मला सांगावं असं वाटत आहे, तरी आतां सांगण्यांत काय अर्थ ? वेळ निघून गेल्यावर त्याचा काय उपयोग ! सरकार, तोंडा हातांत होता तोंपर्यंतच जर ही गोष्ट कळती तर ठीक होतं ! पण आतां काय ! बार उडण्याच्या देखील बेतांत आला, उडून गेला असं म्हणायला देखील हरकत नाहीं ! फक्त त्याचा प्रतिध्वनि मात्र ऐकू यायचा राहिला आहे !

वीरसे०—चंद्रसेना, या तुझ्या बोलण्याचा अर्थ बिलकुल समजला नाहीं !

चंद्रसे०—सरकार, अर्थ तो काय समजायचा ! आपल्या घरावर जो दरवडा पडणार आहे अथवा पडल्याप्रमाणें ही आहे, तो दरवडा नव्हे, तर निवळ फितुरीचा परिणाम आहे !

वीरसे०—चंद्रसेना, असं अर्धवट व अन्योक्तीचं भाषण करून मला भ्रांतींत कां बरं ठेवतोस ! काय तें सांग ?

चंद्रसेन०—सरकार, ही बोलत बसण्याची वेळ नव्हे ! केव्हां प्रसंग येईल याचा माझ्या समजुतीनें कांहीं निर्णय करवत नाहीं ! या कामांत घातकीरावाचा मात्र संषय येतो ! आणि या थराला गोष्ट येण्याला तरी कारण तोच आतां आपल्याला सूचना म्हणून एवढीच करायची कीं आपलं कांहीं तरी होईल व कसं तरी चालेल; परंतु अशा प्रसंगीं वइनीसाहेबांना या ठिकाणीं ठेवणं मला कांहीं प्रशस्त दिसत नाहीं! तशांतून त्या गरोदर ! यावर जशी मर्जी !

वीरसे०—राष्ट्रामध्यें एक मनुष्य नीच असला म्हणजे तो सर्व राष्ट्र धुळीला मिळवून टाकतो ! तरी मी बाबांना सांगत होतों बरं, कीं या अधमाचा हात राज्यांत शिरूं देऊं नका ! पण त्यांनीं कांहीं माझं ऐकलं नाहीं ! असो. आतां त्या गोष्टीचा विचार करून काय उपयोग ! होता होई तों करून पहावं ! नाहीं तर पुढें प्र[illegible] इच्छा !

[ इतक्यांत एक [illegible]न्य धांवत्या [illegible]चा प्रवेश करितो. ]

हुजऱ्या०—ध-ध-ध-धनीसाब, वखत लइ वंगाळ आलाय! वाड्यामंदी म्होरल्या दरोज्याप अक्शी गो-गो-गोंदुळ झाला हाये! च-च-चंद्रिका बाईसाबास्नि थोरल्या सरकारांनीं शिवाजीबराबर दिल्या थिलास गडाकड म्यायेरी लावून, अन् आपुन घोड्याप सवार होऊनशानी मागल्या दरोज्यान लस्कराला निशानी द्येन्याकरतां म्हून छावणीकड ग्येल! म्होरल्या दरो-जाशी पन अक्शी गोंदुळच! त्यो समार्कंदचा अबुता-र न् लस्कार न् समदी योकुच गर्दी!

[ इतक्यांत पडद्यांत रणवाद्यें वाजूं लागतात. ]

चंद्रसे०—सरकार, उठा. उद्यांचा प्रसंग आजच आला बरं! हीं पहा रणवाद्यंही वाजूं लागलीं!

वीरसे०—( उठून ) परमेश्वरा, आतां यावेळीं तुझ्यावांचून आमचं साह्यकर्ता कोणीच नाहीं! ( हुजऱ्यास ) जा, आमचे घोडे तयार ठेवायला सांगून माझं व चंद्रसेनाचं पिस्तुल, शिरस्त्राण, चिलखत व इतर सर्व लढाईचा पोषाख तयार ठेव! ( तलवार म्यानांतून काढून ) बया या वेळीं तूंच माझी मातोश्री आहेस! आजपर्यंत तुला सर्वत्र शांततेमुळें मनुष्याच्या रुधिराचा गंधही नाहीं, तेव्हां आतां पाहिजे तितकं रक्त प्राशन कर! चला, चंद्रसेना! शस्त्र म्हणून पुनः म्यानांत घालणं नाहीं ते ले (जातात.)

प्रवेश तिसरा समाप्त.

स्थळ—राजवाड्यापुढील भव्य मंडप.

[ चंद्रसेन एकटाच प्रवेश करतो. ]

**चंद्रसेन०**—( आपल्याशीं ) धान्याला काय किंवा पुष्पाला काय, परंतु एकदां आंगची कीड लागली कीं मातीच ! तद्वतच हल्लीं आमच्या या राष्ट्राची त्यांत फितुरीचा शिरकाव झाल्यामुळें एका क्षणांत अशी दुर्दशा झाली ! मद्यानें आपला अम्मल एकदां या नरतनूवर बसवला कीं तें तिची क्षणांत ' छीः थूः ' करण्यासारखी स्थिति करून तद्वारीं आत्म्याला अगदीं वेडा करून सोडतं; व त्याच्या इतर सर्व अवयवांना निःशक्त करून टाकतं ! तद्वतच या फितुरीचंही आहे. या फितुरीपणाचा शिरकाव झाल्यापासून अल्पकाळांतच थोरल्या सरकारांना स्थानभ्रष्ट व्हावं लागलं; व त्यांचीं अंगं जी आह्मी सर्व प्रजा यांना शिथिलता आली. ( दुःखानें ) एकंदरींत आज आम्ही पराधीन झालों, आमचे मेंदु हलके पडूं लागले व आमच्या मति कुंठित झाल्या ! आमच्या स्वातंत्र्याचा ऱ्हास झाला, पारतंत्र्याचा चिरकालिक पगडा आमच्यावर बसणार ! व आम्ही व आमच्या पूज्य, विचारशाली, पोक्त व धूर्त अशा पूर्वजांनीं मिळवलेलं जें निष्कलंक यश व त्यांनीं केलेल्या ज्या अपूर्व गोष्टी या सर्वांवर एकसमयावच्छेदेंकरून पाणी पडणार ! त्यांच्या सद्गुणांची व सत्कृत्यांची विस्मृति पडणार ! व एकंदर सर्व

विचार न.गच्यानागीं राहून नरकांतल्या किड्याप्रमाणें आह्मी ज्ञाते असून परवशतारूपी नरकांतील अज्ञानानें किडे बनणार! शिव शिव! ज्या सिंहासनावर शुद्धवंशीयांनींच बसावं व जे विराजमान झाले असतां, मृगराजाप्रमाणें क्रूर, चंद्राप्रमाणें शांत, तपस्व्याप्रमाणें दयाळू व ईश्वराप्रमाणें सर्व प्रजेवर ममता करणारे व तेजस्वी दिसत, त्या पवित्र सिंहासनाला या मुसलमानांनीं स्पर्श करून त्याचा उपमर्द करावा! आणि ही गोष्ट प्रत्यक्ष आम्हीं आपल्या डोळ्यांनीं पहावी! आणि अशाला समारंभ मानून मोठ्या इतमामानें या ठिकाणीं येऊन मुसलमानांचा निमूटपणें अंगीकार करावा! केवढी शरमेची गोष्ट ही! 'न नीचो यवनात्परः' असं थोरांनीं म्हटलं आहे! असं असून त्यांना आपण वरिष्ठ पद देतांना? एकंदरींत या गोष्टीला सर्व क्षत्रियांचं देखील अनुमोदन पडलंना? त्यांना देखील हा प्रकार पसंत पडलाना? हर! हर! परावलंबनाच्या ज्या कांहीं गोष्टी आम्हीं आजपर्यंत ऐकत होतों, त्या प्रत्यक्ष अनुभवण्याचंही कपाळीं आलं! धिक्कार! धिक्कार असो अह्माला! आज त्या समर्कंदच्या सलतान उल्मुल्क बादशहाच्या प्रतिमेला राज्याभिषेक होणार! ( दुःखावेगानें ) हाय हाय! हें पहाण्याला किंवा ऐकण्याला जगलों त्यापेक्षां काल त्या रणयज्ञांतच माझ्या प्राणांची आहुति पडती तर फार ठीक झालं असतं ( पडद्यांत वाद्यें वाजूं लागतात ) काय!

वाद्यं वाजूं लागलीं ! (पाहिल्यें करून) हे पहा लोक सुद्धां नमूं लागले ! हर हर ! प्राण निघून गेल्यावर ज्याप्रमाणें सर्पाचें शरीर हलत असतें व तेणेंकरून जसा त्याच्या अस्तित्वाचा कांहीं कालपर्यंत भास होतो, त्याप्रमाणेंच सरकार जरी स्थानभ्रष्ट झाले, तरी अद्यापपावेतों त्यांची गादी रिकामी असल्यामुळें त्यांच्या अस्तित्वाचा भास होत आहे ! (दुःखाचा सुस्कारा टाकून)हाय हाय ! माझा मित्र युवराज वीरसेन ! वीरसेना, कुठें आहेस तूं ? नाहीं तर त्या चांडाळानें कांहीं अपाय तर केला नाहींना ! अरे-अरे-अरे ! फक्त साठ घटकांच्या आंत इतकी दीन दशा आं ! धिक्कार-धिक्कार ! केवढी भयंकर स्थिति ही !! अस्तु ! आतां अगोदर वीरसेनाच्या शोधाची तजवीज केली पाहिजे ! आतां मात्र या ठिकाणाहून पोबारा करून आपल्याला अन्य वेषानें राहिलं पाहिजे.

( जातो. )

**प्रवेश ४ था समाप्त.**

---

## प्रवेश पांचवा.

स्थळ—राजवाड्यापुढील दिव्य मंडप ( अभिषेकोत्सव )

( घातकीराव, विषयीराव, अख्तरशहा, त्याचा वकील, रक्षक, प्रजाजन, सरदार, गवय्ये वगैरे प्रवेश करितात. )

घातकी०—(डोळ्यांस पाणी आणल्याचें मिष करून) सर्व सरदार, अमीरउमराव, शेटसावकार व प्रजाजनहो, आज आपल्याला दुःख व आनंद या दोहोंचाही अनुभव घ्यावा लागत आहे असं जरी आपल्याला वाटत आहे तथापि सांप्रतच्या प्रसंगी त्याचा विसर पाडून आपल्याला एकट्या सुखाचाच अनुभव घेतला पाहिजे! आतां हें जरी खरं आहे. कीं, प्रत्यक्ष आईचा नाश होऊन त्या ठिकाणीं जर दाई आली, तर मुलाला सौख्य होणार नाहीं! तथापि इतकं खास लक्षांत ठेवलं पाहिजे कीं त्या दाईचा लेकराला पूर्ण परिचय झाला, म्हणजे त्याला आईचं स्मरण देखील होणार नाहीं; इतकंच नव्हे पण ती जर क्षणभर दूर झाली तर तें सुद्धां त्याला खपणार नाहीं! त्याचप्रमाणें आपले मालोजी महाराज राज्यभ्रष्ट झाल्यामुळें आज आपली दुःखकारक व शोकास्पद स्थिति झाली आहे खरी; परंतु ज्या कांहीं गोष्टी ईश्वराधीन असतात, व त्याच्याच कृपेनें त्यांस अस्तित्व किंवा नष्टदशा या दोन्हीही स्थिति प्राप्त होतात तेथें आपला उपाय काय? अशा प्रकारचे अनेक प्रसंगोचित विचार मनांत आले म्हणजे आपला दुःखावेग क्रमाक्रमानें कमी होत जाईल शिवाय राज्यासनावर एकच म्हणजे चिरस्थायी होतो, असं थोडंच आहे! राज्याचा किंवा तें चालविणाराचा चिरस्थायीपणा म्हणजे प्रवाहानें वहात असलेल्या जलबिंदूप्रमाणें

आहे ! आज निरुपायास्तव अगदीं डोळ्यांवर कातडं ओढून चार गोष्टी बोलण्याकरतां मी आपल्यापुढं उभा राहिलों आहें ! तस्मात् सर्वांना मी समर्कंदच्या सुलतान उ-मुल्क बादषहाच्या अख्तरशहा सरदारातर्फे अशी विनंति करतों कीं सर्वांनीं दुःखाचं परिमार्जन करून व आजचा हा सुदिन समजून पुढें होणारा समारंभ तडीस न्यावा; व आम्ही नूतन तक्ताधिपति बादषहाविषयीं पूज्यबुद्धि धरूं व त्यांचं यश व सौख्य तेंच आमचं असं मानून त्यांच्या करितां अंतःकरणपूर्वक झटूं अशी सर्वांनीं शपथ घ्यावी; आणि असं करणं म्हणजे आपण खरे स्वामिभक्ति परायण आहों अशा बद्दलचं दिग्दर्शनच केल्याप्रमाणें होणार आहे !

वकील०—( उठून ) हाज़रीने मजलिस्—मैं एक अदना शख्स आज इस् जषने मजालिसकु देख बाग बाग हो इझारे मतलब करताहुं के हरएक फर्द जिस् तौरसे के हमारे पादषाह जीहम्मो दौलतके हुकुमकी ताबेदारी करते हैं उसी तौर इस् मजलिसके अहबाब भी हुकुमे षाहानासे मुंह् न मोडेंगे. और दिलोजानसे पाबंदषाह रहेकर षाहकू यार रखेंगे. अब् हुकुमेषाह जो जाहका यूं हुवा है के नामदार अख्तर-शाह यहांकी सूबेदारी करें; इसलिये आनही इन्हे लायक व फायक जान सूबेदारीका तरफ व खिलत इनायत् किया जाय; और नामदार अख्तरशाह जिस्

साहाबकों सरदारी खिताब वगैरा दिया चाहें उसेभी सरदारी खिल्अत् दी जाय !

अख्तर०—( उर्दून ) अहेले दरबार—आप् लोगों-कु अजहर मिनष् षम्षहै, के हम् मुसलमान यहांके बाषिंदह् नहीं; मगर ये भी अपकु मालुम जुरूर है के सोहोबतका आसर इनसानपर कहांतक होता है ! सो अब् आपही लोगोंसे सोहोबत है. इस् बा अस् हम्-मे व आपमे किसी तरहाका फरक नहीं, जुदाई नहीं-नफाख् नहीं, हसद् नहीं, कीना नहीं; और अल्बत्ता-ह् आप लोगोंकु षिकिष्ता महाराज साहाबका खिया-ल जुरूर होता होगा; और साथही उस् ख्यालके यह् ये खियालत भी आते होंगे के मालुम नहीं यह् बादशाहतकी हवा कैसी है—गरम है या सर्द ! मगर खैर गुजिष्ताह रासल्भात—अब् मै आप लोगोंकु यकीनेंकुल्ली दिलाताहूं के बेषक् शमशीरके जोरसे यह् मुल्क हमने जेर किया; मगर जेर करनेसे यह् इरादा-ह् नहीं के, शमशीरपर आपके सर रखे जाएं ! बल्के इस् इरादेसे रय्यतकी खुषी वोह् ऐन हमारी खुषी ! रय्यतका फायदाह् वोह् ऐन हमारा फायदाह् ! रय्यतका नुकसान वोह ऐन हमारा नुकसान है ! मुझे उम्मीदे कामिल है के जिस् तौरसे आप लोगोंकी खुषी होगी उसी तौरकी पादशाहतकी बू होगी. आप लोगोंके लिये जो जो कुच फायदाह्मंद होगा वोह् भी किया जायगा ! आप लोगोंकु इल्ममे भी कामिल करना यह

भी दिलसे हमारा इरादा है ! और अल्लाहसे दुवा है के ऐ अल्लाह् तू हमेषाह् हमारे सरकारे आलीकु इसी कौल व फेलपर कायम रख ! बाद इसके आपने दोस्त घातकीराव व विषयीराव इन्हे सरदारी खिताब दिया जायगा !

घातकी०—( उठून ) आतां वकील साहेबांनीं सांगितलेल्या गोष्टींची पूर्ण फोड आपल्या भावी सुभेदार साहेबांनीं केलीच आहे. तेव्हां वकील साहेबांचं असं ह्मणणं आहे कीं, त्याच गोष्टी पुन्हां सांगून काथ्याकूट करावी व आपला सर्वांचा वेळ व्यर्थ घालवून आरंभलेल्या कृत्याला विनाकारण अवधि लावावी यांत तथ्यांश नाहीं ! याकरितां सर्वांनीं एकवार जयजयकार करावा म्हणजे तेणेकरून व सर्वांचं अनुमोदन मिळालं असं समजून पुढील तयारीस लागतां येईल !

( सर्व जयजयकार करतात. )

( वाद्यें वाजूं लागतात व समारंभास सुरवात होते )

वकील—( उठून ) सूबेदारसाहाब अब आपनी सूबेदारीकी जगाह् बैठ खिताब वगैरा इनायत करेंगे !

अखबार—( उठून ) अहेले मजालिसने आज मजालिसकु रौनकदी, इस खुषीके सिलेहमे मै अहले मजलिसका ममनून व मष्कूर हूं ! और सरकारे आली

यांन पादषाह् जी जाहने मुझे सूबेदारी देकर और अपनी खुष्नूदी जाहेर कियी उस् बारेमे भी शुकर्याह् आदा करताहुं ! दिगर घातकीराव और विषयीराव इन् साहाबोंकु " खून उल् सल्तनत् " यह खिताब दिया गया है ! इसी मुआफिक् जो लोगके खैर खुवाह् सुलताने मोअज्जम् जाहेर होंगे उन्हें भी इसी रआफिक् खिताबात दिये जाएंगे !

( सर्व टाळी देतात. )

**वकील**—( उठून ) मुझे उमीद है के, आज तारीखसे पादषाह जी जाहके मुल्की व लष्करी वगैरा वगैरा सरदारोंसे आप लोग इमान व वफाईसे होकुमकेताबेदार रहेकर अपने एतेबार व भरोसेका सिक्काह् उन्के दिलोंपर बिठाओंगे और आप लोगोंकी कदरदानी व लियाकत हमे जाहेर कर रही है के, आप लोगोंकु यह् कुल बातें मंजूर हैं ! अज् जबरदस्त जहांदार दीनपरवर दादगीर पादषाह सुलतान उल्मुल्कके तर्फसे आप लोगोंकु यांन रय्यतकु बतौर करार व इषाराह् चंद जुमले पढे जाते हैं सो उमीद है के उनपर ध्यान व गौर करें !

" आजसे आप सब लोगोंके रू ब रू खुषी व रजामंदीस इस् अक्लीमकी सल्तनत् हम् अपने जिम्मे लिये हैं, और जिस् मतलबकु हम् जोर दे इज्हार करते हैं , वो ये हैं—यांन बेकारी, बेहुनरी, बेइल्मी

नादानी यह कुल आप लोगोंके जबरदस्त दुष्मन है– और इन दुष्मनोंका दूर करना हमारा काम हैं ! नके सरदारी, जंगदारी, आरामदारी, दिखाना ! आजहींसे आप लोगोंकी कोषिषे इल्म की जायगी; और पूरी तौरसे हरएक अमरकी को गुजाष्त हुआ करेगी, और हर वख्त जिस किसमकी तक्रार होगी, दादरसी भी की जायगी ! सौदागिरी वगैराह वगराह फनोंके लिये वख्त ब वख्त पैसह वगैराहकी भी मदद की जायगी बषर ख्वा किसी कोम व मिल्लत व मजहबका हो अगर मदारिज इमल्के हासिल करेगा ओह्दे बडे बडे मुल्की व फौजी बिला तासुब्र दिये जाएगे ! अद्लमे तर्फदारी न की जाएगी ! मजहबी बारेमे हम मुतलख्ख दस्त अंदाजी न करेंगे, न इस बारेमे कुइ कायदाह करेंगे बल्के माल व दौलत जो जो जुरूर याते इमसान हैं उसभी हम ब खूबी संभालेंगे और मत्र आप लोगोंमे हुषियारी व इल्म पूरी तौरसे सरायत करेगा और हमे आपलोगोंपर पूरा भरोसा व यकीन आवेगा तब मुझे यकीने कुल्ली है के पादषाह दीन पर्वर व दादगीर मुल्तनतके उमूर भी जुरूर बिल् जुरूर आपलोगोंके सिपुर्द करेंगे !"

रूवें०–( उठून )

जिही दीन ओ दानिषू जिही अल्लदाद
जिही मुल्क दौलत के पायंदा बाद (जातात.)

**प्रवेश पांचवा समाप्त**

## प्रवेश सहावा.

### स्थळ—किल्ल्यांतील तुरुंग.

[ हातापायांत बिड्या असलेले वीरसेन व शिवाजी प्रवेश करितात. ]

वीरसेन०—( दुःखाचा सुस्कारा टाकून, आत्म्याशीं ) कालचक्राचा सपाटा कांहीं विलक्षण आहे ! एकदा वेध लागला ह्मणजे ग्रहण हें लागायचेंच ! तशीच आज स्थिति झाली आहे ! ज्या वेळीं हा असा विपत्काल येणार ह्मणून वाटलें, त्या पूर्वींच तशा प्रकारचीं दर्शक स्वप्नंही पडत होतीं ! अवदसेनें एकदां पाया घातला, कीं ती आपली इमारत अल्प काळांतच उभारते ! काय माझी ही स्थिति ! जो मी नित्य आनंद मंदिरांत बसून स्नेहांशीं आनंदकारक गोष्टी सांगून काळ घालवीत असें, तो मी आज ज्या ठिकाणीं गुडघा गुडघा माती सांचली आहे, व ज्याकडे पाहिलें असतां एखाद्या अमंगल मनुष्याला देखील तत्काळ वांती होईल अशा निर्जन स्थलीं येऊन पडलों ! ज्या माझ्या हातास नेहमी रत्नजडित कंकणं असायचीं, त्या हातांत ज्यांचें नांव ऐकलें असतां अति निंद्य आचरण करणारांच्या देखील वृत्तींत फेर होतो, अशा या लोखंडी बिड्या पडल्या ! ! एकंदरींत कर्माची गति कांहीं

विचित्र आहे ! माझं कांहीं जरी झालं तरी त्याची मला पर्वा नाहीं ! परंतु माझे बाबा ! परमेश्वरा या वेळीं ते कोठें असतील! माझ्याप्रमाणेच तेही जर शत्रूच्या हातीं लागले असतील तर त्यांची काय स्थिति होईल! अशा प्रसंगीं कनवाळ्याचा एकही मनुष्य जवळ नसेल ! माझी वारंवार आठवण करून दुःख करीत असतील! पुनः माझी भेट होण्याची आशाच नाहीं अशी खात्री झाल्यास ते आत्महत्या सुद्धां करून घेतील! हाय हाय ! काय करावं आणि काय न करावं हें कांहीं सुचत नाहीं ! यावेळीं चित्तवृत्ति कशी अगदीं बावरून गेली आहे !! हर हर ! माझा मित्र चंद्रसेन ! चंद्रसेना, अशा वेळीं दैवानें तुलाही मजजवळ टिकूं दिलं नाहींना ! तूं त्या चांडाळाच्या तर हातीं नाहींना लागलास ! ( सुस्कारा टाकून ) ही हकीगत जर प्रियेला समजली, तर ती अशा परतंत्रावस्थेंत राहून अमूला धक्का बसेल कीं काय या भीतिनें भ्रूण हत्येचंही पातक बरं असं मानून या लोकची वस्ती सोडून परलोकची देखील वाट धरील ! ( कपाळावर हात मारून ) धिक्कार ! धिक्कार !! धिक्कार !!! ( मुर्च्छित पडतो ).

लिंबाजी—( त्यास सांवरून ) हां हां ! सरकार हें काय ? थोडासा विचार केला पाहिजे ! आपण जर सतत असं दुःख कराल तर कसं होईल?

( इतक्यात घातकीराव व विपर्यीराव येतात)

घातकी०—( विषयीरावास ) कां विषयीराव, कशी आहे मजा! गुलामांचे याहीपेक्षां हाल झाले पाहिजेत !

शिवाजी०—( रागानें ) गुलामा, कोणाचे हाल करणार ह्मणून ह्मणतोस ! तुझेही हाल करण्याची योजना झाली आहे समजलास ! अरे, ज्यांनीं तुला इतक्या प्रेमानें वागवलं, त्यांचेच हाल करण्याची इच्छा आं !

घातकी०—( रागानें ) हां खबरदार ! एक अक्षर सुद्धां बोलूं नको ! कोण आहेरे तो ! जमाल !

[ एक शिपाई येतो ]

घातकी०—याचं मुसकट बांधून टाक !

वीरसेन०—( सावध होऊन ) कोणतो? घातकीराव !

घातकी०—( पुढें होऊन ) होय सरकार. तोच मी आपला नम्र सेवक घातकीराव! कां सरकार, आनंद आहेना! राज्यप्रकरणीं अनेक गोष्टींकडे डोकं खर्च करून मेंदु बिघडून घेण्याचा जो प्रसंग आपल्यावर येणार होता, तो दुःखकारक व त्रासदायक प्रसंग न यावा व आपला मेंदु चिरकाल कायम रहावा, म्हणून दक्षतेनें केलेली ही योजना आपल्याला पसंत आहेना ! संसारांत असलं ह्मणजे स्त्रियांची एक जंगी बेडी पुरुषाच्या पायांत असते, व ती नेहमीं अंतःकरण अ-

स्थिर स्थितींत ठेवते. ती बिडी काढून टाकून हल्लींची ही बिडी हातापायांत घातल्यानें आपल्या अंतःकरणांतली काळजी दूर झाली किंवा नाहीं ! आतां मणगटांना वगैरे पीडा होईल ! परंतु तीही नाहीं झटलं असतां चालेल ! कारण राजकंकणं घालण्याची संवय आपल्याला आहेच ! सरकार, चितारी जसा अनेक रंग भरून चित्रांत न्यूनता राहूं नये ह्मणून दक्ष रहातो, त्याप्रमाणेंच मीही आपली तजवीज ठेवण्याच्या कामीं होतां होईल तितकी दक्षता ठेवण्याचा विचार केला आहे ! आपल्याला तेंच तेंच अन्न नेहमीं खाल्लयानें कंटाळा आला असेल असं समजून लहान मुलाला जसा अपरिचित् पदार्थ दाखवला ह्मणजे तें आनंदित होतं, त्याप्रमाणेंच आपल्यालाही अपरिचित पदार्थ सेवनाला मिळाले असतां आपण ते आनंदानें स्वीकाराल अशा समजुतीनें सुंदर कोंड्याची भाकर व चहूंकडे घमघमाट देणारं असं लाल लसणीचं तिखट अशी तजवीज ठेविली आहे ! या तजविजींत जर अंतर पडेल, तर सरकार सेवकाला हुकुम करावा, कीं याहीपेक्षां निराळीच तजवीज करीन ! पहा सरकार, चाकरमाणसं जवळ असलीं ह्मणजे आपल्याला फार त्रास होतो, तर तोही बखेडा मोडून टाकला ! आतां हा एक लिंब्या आहे ! आणि याचा आपल्याला कंटाळाही आला असेल खरा ! तर थोडक्याच दिवसांत त्याचीही तजवीज लावतों !

लिंबाजी०—( संतापून ) कारे ए काळतोंड्या !

फारशी वटवट लावली आहेस! सरकारांची बेअदबी अं! गुलामा, पिंजऱ्यांत सांपडलेल्या वाघाला खडे मारावे, आणि त्यांतच पुरुषार्थ भोगावा हीच कारे तुझी अक्कल! तुझ्यासारख्या अधमाधमाला कोणती जागा द्यावी याचा यमपुरींत देखील विचार पडला असेल! कारण तुजकरितां इतकी नीच जागा पाहिजे कीं तशी तयार असावी असं यमाच्या पूर्वी कधीं स्वप्नींही आलं नसेल!

**वीरसेन**०—( आपल्याशीं ) काय! मी स्वप्नांत आहे! छेः! शत्रूंच्या लोकांनीं मला तापलेल्या तेलाच्या कढईंत उभा केला असता, किंवा माझ्या अंगाला सुया टोंचल्या असत्या, किंवा मला उभा जाळला असता, किंवा जे हाल पाहिले असतां पहाणाराचे नेत्रही बाहेर येतील, असे जरी माझे हाल केले असते, तरी त्याच मला दुःख होतंना! परंतु या मांगाच्या तोंडचे हे प्रत्यक्ष मृतावर देखील घावांप्रमाणें लागणारे हे शब्द माझ्यानें नाहीं ऐकवत! यापेक्षां मी बहिरा झालों असतों तर ठीक होतं! परमेश्वरा, असले हे शब्द ऐकून त्यांचे जे डाग बसत आहेत ते सहन करण्यापेक्षां मला मरण येईल तर फार बरं! ( उघड ) घातकीराव! अथवा तो घातकी कीं मी घातकी! छे! लिबाजी तरी कसा! घातकीच घातकी! ( बरळूं लागतो )

**लिबाजी**—( घाबरून ) सरकार, आपण असं

काय बडबडतां? अरे! यांना वायू किंहो झाला! आ-तां काय बरं करावं! (घातकीरावास) चांडाळा, तुझ्यामुळं बरं हें! मांगा, कांहीं तरी द्रव येऊंद तुझ्या अंतःकरणाला!

घातकी०—चला. विषयीराव, पडूंद्या बडबडत; आपोआप येतील ताळ्यावर!

(जातात)

पडदा पडतो

प्रवेश सहावा समाप्त.

---

पहिला अंक समाप्त.

---

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

स्थळ—विलासगड किल्ल्यांतील दिवाणखाना.

(चंद्रिका वसतेली प्रवेश करिते)

चंद्रिका०—(आपल्याशीं) मामंजींनीं मला

एकाएकीं इकडे पाठवून दिली, कोणाची गांठ घ्या-यचा सुद्धां अवकाश दिला नाहीं, याचा काय बरं अर्थ असावा ! वाटेनें मला पोहोंचवण्याकरतां तिकडचा विश्वासु लिंबाजी आला होता, त्याला विचारलं त्यानें सुद्धां कांहीं सांगितलं नाहीं ! काय बरं असेल हें ! मात्र मला इकडे पोंचीव असं सांग-ते वेळीं मामंजींनीं लढाईचा पोषाख केला होता, त्यावरून तसा तर कांहीं प्रकार नव्हताना ! काय असेल तें देवाला ठाऊक ! निघण्यापूर्वीं दोन दि-वसांत तिकडची देखील गांठ पडली नव्हती ! काय बरं करूं आतां ! जगदंबे ! तुला सर्व काळजी ! आज आठ दिवस झाले, बाबाही तिकडे म्हणून गेले आहेत ते सुद्धां अजून परत येत नाहींत ! नि-घतांना " लवकरच जासूद पाठवीन " ह्मणून मामंजींनीं सांगितलं होतं, तो सुद्धां अजून कां बरं येत नाहीं ! आज दोन दिवस माझा उजवा डोळा लवतो आहे ! स्वप्नं सुद्धां नाहीं नाहीं तशीं पडतात ! यावरून का-य अनर्थ कोसळला असेल कोणाला ठाऊक ! मीच मेली वेडी ! नाहीं तर निघतांनाच नको का होती याची चवकशी करायला ! नाहीं तर देवा, त्या साध्वी जानकी प्रमाणें तर माझी अवस्था झाली न-सेल ना ! महाराज, तसं करायला मी असा काय अपराध केला होता ? ( किंचित् थांबून ) छे ! पण हे कसले मेले वेडे वेडे विचार मनांत येतात मा-

ङ्बा ! देवा ! मी तुला शरण आहें ! तिकडची प्र-कृति खुशाल राख येवढंच माझं तुझ्या जवळ पदर प-सरून मागणं आहे !

[ इतक्यांत सुशीला येते ]

**सुशीला०**—वइनीसाहेब, आपण अशा नेहमी विचारांत कां असतां ! आपल्याला कांहीं कमी का आहे ? थोरल्या सरकारांनीं आपल्याला एकाएकीं इकडे पाठवून दिल्या म्हणून इतकी काळजी नको करायला ! असेल तसेंच कांहीं कारण !

**चंद्रिका०**—सुशीले, सारं खरं ! पण जाई आ-पण निघालों त्यावेळीं मामंजींनीं लढाईचा पोषाख केला होता त्यावरून, व कालपासून मला जीं भलभल-तीं स्वप्नं पडताहेत त्यांवरून जिवाला कशी हुरहुर लागली आहे ! माझ्या मनांत नाहीं नाहीं त्याच क-ल्पना येऊं लागल्या आहेत !

**सुशीला०**—विनाकारण मनांत भलभलत्या क-ल्पना आणून उगीच काळजी करीत कां बरं बसा-वं ? वइनीसाहेब, म्हण आहे ती खोटी का आहे? " मनीं असे तें स्वप्नं दिसे " ! थोरल्या सरकारां-कडून कांहीं समाचार कळत नाहीं त्यामुळें आप-ल्या मनांत जे विचार येतात तेच आपल्याला स्वप्नांत दिसतात ! दुसरं काय ! नाहीं तेंच मेलं ! अशा स्वप्नांतल्या गोष्टी कुठे खऱ्या का होतात ?

चंद्रिका०—तूं म्हणतेस तें सारं खरं ! पण म्हणं आहेना कीं ' मन चिंती तें वैरी ही न चिंती ' ! म्हणून बाई ! एकदा मनांत तरंग येऊं लागले, म्हणजे कांहीं विचारूं नको ! नदीला जसा पूर आला म्हणजे तिच्या कांठचीं शहरं सुद्धां वाहून जातात, तसंच हेंही आहे !

सुशीला०—वहिनीसाहेब, आपल्याला जराशी करमणूक झाली पाहिजे म्हणजे आपलं चित्त स्थिर होईल ! मी तें आपलं आवडतं पुस्तक आणूं का ? खरंच ! काल आपण वाचलेली गोष्ट अर्धीच राहिली !

चंद्रिका०—बरं तर. जा आण जा. ( सुशीला जाते ) खरंच ! स्वामिभक्ति पूर्ण अंगीं असली म्हणजे तें मनुष्य कोणाला सुद्धां नकोसं होत नाहीं ! हीच सुशीला पहा ! हिचं माझ्यावर किती बरं प्रेम आहे ! माझ्या जर पायाला कांटा टोंचला, तर हिच्या काळजाला धक्का बसतो !

( इतक्यांत सुशीला येते. )

सुशीला०—वहिनीसाहेब, सत्यपुरीहून कोणी जासूद पत्र घेऊन आला आहे व तो आपल्याच हातीं हें पत्र देण्याचा हुकुम आहे असं म्हणतो. बोलावूं का त्याला आंत ?

चांद्रिका—( एकदम उठून ) काय ! माझ्या नांवचं

आहे ह्मणतेस ! आणि तेंही माझ्याच हातीं द्यायचें ! जा तर मग बाई त्याला आंतीं आंत घेऊन ये !

( सुशीला जाते )

चांद्रिका•—( आपल्याशीं ). या पत्राची हकीगत सुशीलेनें सांगितल्याबरोबर माझ्या पोटांत असं धस्स कां बरं झालं !

( इतक्यांत सुशीला जासुदासह येते. )

जासूद —( मुजरा करून ) बाईसाहेब, ह्यो आपनास्नी द्यायाकरता म्हून धाकल्या सरकारांनीं मप लागुटा दिला हाये ! ( पत्र पुढें टाकतो )

चांद्रिका —( पत्र फोडून वाचूं लागते )

" माझी लाडका चंद्रिका हास,

अनेक आशिर्वाद–मनुष्याला पूर्ण अनुभव असला, ह्मणजे तो पाहिजे त्या युक्तीनें आपल्यावर येणारे प्रसंग टाळून त्यांतून इतक्येनें पार पडतो. आतां एवढं ध्यास कीं या गोष्टीला ईशकृपा व दैव या दोहोंचीही अनुकूलता पाहिजे ! "

चांद्रिका० – ( आपल्याशीं ) ह्मणजे ! या पत्राचा आरंभ कांहीं निराळाच दिसतो ! देवा ! कांहीं भयंकर हकीगत वाचण्याचें तर नाहींना येत माझ्या कपाळीं ! ( वाचूं लागते. )

“ कारण त्यावांचून काडी देखील हलत नाहीं. असो. आमच्यावर जो प्रसंग आला होता, त्याचं किती म्हणून वर्णन करूं ! परंतु प्रभुकृपेनें व मुख्यत्वेंकरून घातकीरावाच्या सहाय्यानें निभावलों ! या कामीं घातकीरावाचे मी व बाबा—कांहीं अंशीं सर्व प्रजाजन सुद्धां ऋणी आहों ! माझ्या अंगावर वार लागल्यामुळें मला जखमा झाल्या आहेत; व त्या वेदना सहन करवत नाहींत ! ”

चंद्रिका०—( जासुदास ) अरे बाबा, अशा किती जखमा झाल्या आहेत ? आणि त्या कुठे कुठे तरी झाल्या आहेत ?

जासूद०—( आपल्याशीं ) ह्यचा काय जाब द्यावा ! मास्नी तर काईबी न्हाई सांगितलं ! [ किंचित् थांबून ] बरं ! इचिभन समदच वंगाळ झालय म्हून सांगाव झजी झाल ! का हाये त्येच्यात ! ( उघड ) त्येच न्हय बाईसाब ! त्येकाई यिचारू नगा ! सरकार म्हजी अक्शी यिवळत्याती ! त्येच्यामंदि ताकद ती म्हाइच ! समद सरदार अक्शी घाबरल्याती !

चंद्रिका०—( दुःखानें ) काय ! इतकी भयंकर स्थिति झाली आहे ? ( मूर्च्छित पडते. )

सुशीला०—( घाबरून ) अगबाई ! आतां काय बरं करावं ! वहिनीसाहेब, सावध व्हा ! असं काय बरं हें ! पत्र तर पुरतं वाचा !

चंद्रिका०—( उठून व सुशीलेच्या गळ्यास मिठी मारून ) सुशीले, आतां कसंग करूं !

सुशीला०—वहनीसाहेब, त्या मेल्याच्या बोलण्यावर कसला विश्वास ठेवतां ! गरीब बिचारा तो ! घाबरून गेल्यामुळें तसं सांगत असेल ! आधीं पत्र तर पुरतं वाचा !

चंद्रिका०—[ पुन्हा पत्र वाचूं लागते. ]

" आतां माझं सर्व लक्ष तुझ्याकडे लागलं आहे ! तर पत्रदर्शनीं निघण्याचीच तयारी करावी ! लबाजीलाच पाठवणार होतों, परंतु अशा प्रसंगीं इतका विश्वासु व मेहनती मनुष्य दूर करूं नये म्हणून पाठवला नाहीं ! विलासगडकरांसही चार दिवस येथेंच ठेवून घेतले आहेत ! आतां माझ्यानें जास्त लिहवत नाहीं; लवकर यावें हे आशिर्वाद !

तुझे प्रियकर्ता,

वीरसेन.

चंद्रिका०—सुशीले, तरीच बरं बाबा आले नाहींत ! [ उसासा टाकून ] कुठे जखमा झाल्या असतील नि काय ! आतां केव्हां जाऊन भेटेन असं मला झालं आहे ! सर्व लक्ष माझ्या येण्याकडे लागलं असेल ! ( जासुदास ) अरे बाबा, तुझं नांव काय ?

**जामुद०**—माझं नांव व्हय बाईसाब ? मास्नी राघु म्हनत्यात !

**चंद्रिका०**—काय राघु ?

**जामुद०**—व्हय बाइसाब ! जसं कूनी शिकवील तसं मी म्हनतो म्हूनशानि मला राघु म्हनत्यात !

**चंद्रिका०**—सुशीले, आतांच निघण्याची तयारी करायची ! मला आतां तिकडचं दर्शन होईपर्यंत अन्न पाणी कांहीं गोड लागायचं नाहीं !

( जातात. )

**प्रवेश पहिला समाप्त.**

## प्रवेश दुसरा.

### स्थळ— बाग.

( घातकीराव एकटाच प्रवेश करतो )

**घातकी०**—( आपल्याशीं ) आरंभलेलं काम कसं निर्वेध तडीस गेलं ! एवढा तरी बखेडा पडायचा होता ! पण छे ! नांव नको ! फक्त माझ्या या कामांत एक चूक झाली ! तेवढा चंद्रसेन हातीं लागता म्हणजे ठीक होतं ! वीरसेनाला अडकावून टाकल्यामुळं त्याची व्यवस्था लागल्याप्रमाणेच आहे म्हणा ! अख्तरशहा

च्या म्हणण्याप्रमाणें म्हटलं ह्मणजे तर या राजघराण्यातला एकही पुरुष जिवंत ठेवतां कामा नये! जन्मेजयानें आपल्या बापाच्या नाशाबद्दल ज्याप्रमाणें यज्ञ करून तक्षकांचा सूड घेतला, तसेंच याही ठिकाणीं केलं पाहिजे! अस्तिक मुनींनीं मध्यस्थी करून जसं एक सर्पकुल वांचवलं, तशा प्रकारचा ज्याचं वजन चालेल असा अस्तिक मुनीही सध्या राज्यांत कोणी नाहीं! थोरल्या वृद्ध कपींची तर अशाच नको! ते बहुतकरून तिकडेच 'राम' ह्मणणार! त्यांची आतां कांहीं खटपट चालणार नाहीं! गुलमांची नशीबच फिरलीं त्याला ते तरी काय करणार! सार्वजनिक चळवळीचीही फारशी भीति उरली नाहीं! कारण हळूहळू नवीन चाली, रीति, पेहरावादि अनेक गोष्टींचा त्यांच्यांत प्रसार होऊं लागल्यामुळें त्यांच्या मनांत राज्य प्रकरणीं कुकल्पना सुद्धां येत नाहीं! शिवाय मुसलमानाचा अंमल! त्यामुळें आपल्या वडलांनीं स्वातंत्र्य पूर्ण अनुभवलं होतं व हल्लीं आपण अगदीं परतंत्र झालों आहों, असे विचार त्यांच्या स्वप्नांत सुद्धां येत नाहींत! आणि कुठे कुठे असे विचार चालत असले तर तेही बंद होतील! (किंचित् इकडे तिकडे फिरून) आतां काळजी काय ती चंद्रिकेविषयीं उरली! पण तीही दूर झाल्याप्रमाणेंच आहे! कोळ्याच्या जाळ्यांत जशी फसगतीनें माशी सांपडते, तशी माझ्याही जाळ्यांत ती फसगतीनें आपोआप आली आहे!

(आश्चर्यानें) हं! काय चमत्कार पहा! अमलांत असतां जसं मनुष्याला कांहीं समजत नाहीं, तद्वतच काळजींत असल्यामुळें पत्राची चौकशी करण्याचं तिला समजलं नाहीं! इतकंच नव्हे! पण तें अक्षर परक्याचं असं देखील तिला समजलं नाहीं! एकंदरींत पत्रानें काम कसं चोख झालं! असो. सर्व कामं सुरळीत चालू झालीं! सर्वांत मुख्य हें, कीं मी शत्रूकडचा होतों, किंवा माझं शत्रूकडे अंग होतं असं कोणालाही त्या वेळीं समजलं नाहीं! तसं जर होतं, तर आज जी राज्यांत शांतता दिसत आहे, तिच्या ऐवजीं या क्षत्रियांनीं एकच कल्होळ करून सोडला असता! झालं हें सर्व ठीक झालं! इतक्या दिवसांत फुरसत अशी आतांशीं कुठे मिळूं लागली आहे! आतां जाऊन क्षणभर स्वस्थ विश्रांति घ्यावी! (पाहिलेंसें करून) हे कोण! (ओळखून) हं! हें आमचंच शुक्रकाष्ट! काय बातमी आणली आहे स्वारीनें! गारोड्याच्या कांडीप्रमाणें मला हें एक बरंच साधन मिळालं आहे म्हणायचं!

[इतक्यांत विषयीराव येतो.]

**विषयी०**--घातकीराव, शुक्लपक्षांत चंद्र जसा वाढतो, तसा अख्तरशहा सुभेदारांचाही अंमल वाढत चालला म्हणायचा!

**घातकी०**—अहो, इतकंच नव्हे! तर अभिनव पुष्पांच्या ठिकाणीं जसा भ्रमरगण लुब्ध होऊन मकरंद सेवनांतच निमग्न होतो, तद्वत लोकांची स्थिति होणार आहे!

**विषयी०**—अहो, 'होणार आहे' असं कां ह्मणतां? झाली आहे असं म्हणाना! तुम्हाला नवीन एक बातमी नाही वाटतं समजली?

**घातकी०**—काय बरं?

**विषयी०**—आपल्या या सत्यपुरींतील कांहीं प्रमुख विद्वान मंडळींनीं कांहीं विनंतीच्या गोष्टी पुढें आणून त्यांच्या कबुलायतीची मंजुरी मिळावी, म्हणून सुभेदार साहेबांना त्या प्रत्यक्ष कळवण्याच्या हेतूनें त्यांना पानसुपारीचं निमंत्रण केलं आहे; व थोरल्या दरबारांत दिलेल्या अभिवचनांचं विस्मरण पडत चाललं असं सुचवून तसं न होण्याबद्दल खुद्दांस विनंतीही करण्यांत येणार आहे!

**घातकी०**—हें एक ठीकच झालं! विषयीराव, आतां चला. अगोदर वाड्यांत जाऊं.

**विषयी०**—चला. पण कांहो घातकीराव, आतां आमच्या कामाचं कसं? हें पहा घातकीराव, चार चौघांना सुद्धां लाभ झाला तरी हरकत नाहीं! परंतु आधीं बार आमचा!

**घातकी०**—हेंच तें! अधीरपणा म्हणतात तो यालाच! "चंचु प्रवेशे मुसल प्रवेशः" या न्यायानें

घेतलं ह्मणजे सगळं जमतं! एकदमच सर्वांचा स्वाहा करूं ह्मटलं तर कसं चालेल! एवढ्या थोरल्या राज्याची उलथापालथ केली, तर त्या रांडेची हो काय कथा! बोलतां बोलतां होईल तें! आतां जरी पातिव्रत्याच्या घमेंडीनें ती आपल्याकडे गुरकावून पहात आहे, तरी तुम्हाला सांगून ठेवतों, कीं ही दीनदशा तिला आपोआप ताळ्यावर आणील! सर्वांत हें पहा, दोन प्रहरची वेळ फार कठीण आहे! (एकीकडे) बरा! गुलामा, यामुळें तरी माझा हरकाम्या झाला आहेस! बाकी गडबड विसराच! 'आधी पोटोबा आणि मग विठोबा' हें मी चांगलं समजतों! (उघड) विषयीराव, तुह्मी अगदीं निश्चित रहा!

**विषयी०**—तुम्हीं हो म्हटल्यावर मग हो कसली काळजी न् चिंता!

**घातकी०**—बरं चला. अगोदर वाड्यांत जाऊं!

[जातात.]

### प्रवेश दुसरा समाप्त.

---

### प्रवेश तिसरा.

स्थळ—घातकीरावाच्या घरांतील मागची खोली.

(चंद्रानना एकटीच प्रवेश करते.)

**चंद्रानना०**—(आपल्याशीं) देवा! त्या प्रेमा

चा अखेर असा परिणाम व्हावाना ! " हीच तुझी व माझी अखेरची भेट ! आतां परमेश्वर केव्हां प्रसंग आणील तो आणो !" असं म्हणून दीनवाणं तोंड करून जाणं झालं ! (उसासा टाकून) हाय हाय ! देवा ! वैराग्याच्या वेषानें रहायचं ! कधीं कधीं तर अन्नाची सुद्धां मोताद होत असेल ! शिवाय आपण अमुक अमुक ठिकाणीं आहों अशाबद्दल परिस्फुटता होऊं नये म्हणून अगदीं गुप्त रीतीनें राहिलं पाहिजे ! कसं होत असेल नि काय ! " तुला कशाही रीतीनें गुप्त बातमी देत जाईन " म्हणून मला सांगितलं होतं ! पण आज त्या गोष्टीला किती वर्षं होऊन गेलीं ! अजून एक वीटभर चिठ्ठी कीं कांहीं निरोप, कांहीं नाहीं ! काय बरं करूं आतां ! कांहीं बरा वाईट प्रसंग तर आला नसेल ना ! नाहीं तर हे मेले मांग कसे टपूनच बसले आहेत ! ! [ किंचित् थांबून ] थोर कुळांत जन्म चांगला असं लोक म्हणतात ! पण मला तें अगदीं खोटं वाटूं लागलं आहे ! तसं जर नसतं तर आज जो हा विपत्काळ भोगावा लागत आहे, तो कधीं तरी लागता का ! ( दुःखानें ) ज्यांच्याकडे पाहिलं म्हणजे क्षणभर वीरसेन महाराजांची देखील विस्मृति पडावी ! ज्यांनीं त्यांनीं पाहिल्याबरोबर, स्वदेशाभिमान व स्वराज्यनिष्ठा या दोहोंनीं एकरूप होऊन प्रत्यक्ष अवतारच घेतला आहे कीं काय,

असं म्हणावं ! ( सुस्कारा टाकून ) देवा ! त्या सर्वांचा हा परिणाम व्हावाना ! " चंद्रिका वहिनींची काळजी घेणं, वगैरे सर्व आतां तुझ्याकडेच आहे " असं मला जातांना सांगितलं ! पण देवा ! मी स्त्री जात ! मी काय बरं करूं ! दादानें तर त्यांचा कसा सारखा छळ मांडला आहे ! त्यांच्या पाठीस जसा हात धुवून लागला आहे मेला ! " चंद्रिकाबाईची प्रसूति झाल्याबरोबर लागलंच मला कळीव" असं मला जातांना सांगितलं होतं ! पण महाराज, मी कोणत्या ठिकाणीं आपल्याला कळवूं ! त्यांना प्रसूत होऊन आज नाहीं तरी तीन चार वर्षं झालीं असतील ! वीरसेन भाउजींना तुरुंगांत सुद्धां गुप्त बातमी नाहीं का दिली मी ! पण महाराज, आपला शोधच नाहीं त्याला काय बरं करूं मी ! मला तरी कमी का छळतो आहे दादा ! म्हणे "त्या जाधवरावाशींच तुझं लग्न लावायचं ! आणि तसं करणं मला पसंत नाहीं, मी आपला जीव देईन वगैरे गोष्टी तूं कितीही बडबडलीस किंवा कितीही डळीस तरी मी साफ ऐकणार नाहीं" अस्सं मेला मला निक्षून सांगत असतो ! महाराज, चंद्रिकावहिनींची काळजी घेणं एकीकडे राहून, उलट त्यांच्या हातून भलतंच एखादं कृत्य करवून मी मात्र निरंतर पापांत पडावं, असं करण्याचा प्रयत्न चालवला आहे त्या चांडाळानें ! म्हणे " ती चंद्रिका माझ्या म्हणण्या प्रमाणें वागेल असं करशी-

ळ, तर तुला वाटेल त्या तऱ्हेनें, वाटेल त्याशीं विवाह करण्याची, किंवा चंद्रसेनाची भेट होईपर्यंत तुझ्या इच्छेप्रमाणें अविवाहित रहाण्याची मोकळीक देईन !" नकोग बाई ! त्या साध्वीजवळ असलं निंदास्पद आचरण मी कधींही करणार नाहीं ! माझं कांहीं जरी झालं तरी मला पुरवेल !

[ इतक्यांत घातकीराव येतो ]

**घातकी०**—कां चंद्रानने ! विचार कसला चाललेला आहे ?

**चंद्रान०**—दादा, विचार कसला चालायचा ! चंद्रिकाबाईच्या खोलींतून आतां इतक्यांतच मुलाचा समाचार घेऊन आलें ! खरंच दादा, वीरसेन महाराजांच्या तोंडवळ्यासारखाच तोंडवळा आहे मुलाचा ! नाहीं बरं !

**घातकी०**—( रागानें ) कारटे, तुला मी कोणचं काम सांगितलं होतं ?

**चंद्रान०**—आणखी किनई दादा, आह्मी जोशीबुवांना विचारलं ! त्यांनीं तर बाई मुलाची फारच तारीफ केली ! आणि दादा—

**घातकी०**—( संतापून ) कारटे ! फारशी जीभ वाढत चालली ! मी विचारलेल्या प्रश्नाचा जबाबच देतां येत नाहीं वाटतं ! तें कारटं मोठं गोजिरवाणं

दिसतं, किंवा तूंही सुंदर तरुणी आहेस, किंवा तें तुला फार आवडतं, या गोष्टी कोणी विचारल्या होत्या! तुला मी निक्षून काय सांगितलं होतं त्याचं स्मरण नाहीं वाटतं? चंद्रिकेची मजवर कितपत प्रीति आहे याचा शोध करून मला कळव असं नव्हतं का मी तुला सांगितलं?

**चंद्रान०**—( मुद्रा पालटून ) हास्याच्या! एवढंचना? मी म्हटलं आणखी काय आहे! मी तरी आतां तुला त्याविषयींच सांगणार होतें! मी मुलाच्याच समाचाराला नुसती गेलें होतें असं नाहीं! हीही गोष्ट काढली होती!

**घातकी०**—( तिच्या खांद्यावर हात ठेवून )ताई! बोल तर मग आधीं काय झालं तें! तिनें आपलं मजवर कितपत प्रेम आहे ह्मणून दर्शवलं? ( एकीकडे ) कारटे! तूं मनांत कांहीं फसवणुकीच्या गोष्टी आणीत असशील! परंतु हें पक्कं लक्षांत ठेव, कीं मी कोणतंही काम अजाणपणानें करीत नसतों! तुझी अक्कल ह्मणजे माझ्या अकलेवर चालेल असं नाहीं! मी म्हणजे प्रेमानें अगदीं वेडावून गेलों आहे असं समजूं नको! माझी तिजवर काडी इतकी देखील प्रीति नाहीं! ( उघड ) बोल ती तुला काय म्हणाली तें!

**चंद्राननां**०—आणखी काय ह्मणायचं! तिचं तुझ्यावर प्रेम आहे असं तिच्या बोलण्यांत मुळींच

आलं नाहीं! खरंच दादा, त्या आपल्या राणी-साहेब म्हणजे आपल्याला आपल्या आईच्याच ठि-काणीं नाहीं का?

घातकी०—(रागानें) तूं सुद्धां चंद्रसेनाला आ-ई प्रमाणेंच नाहींस का? तुला फाजील वटवट क-रायला कोणी सांगितली! थांब! लवकरच तुला जावयाच्या स्वाधीन करतों। तुझे हाल झाल्याचें मला कांहीं दुःख नाहीं!

चंद्रान०—(रागानें) दादा! कसलीरे तुझी कसाबासारखी करणी ही! मी तुला साफ सांगतें कीं माझं कांहीं जरी झालं तरी मला पुरवेल! मी तुझ्या म्हणण्याप्रमाणें कधींही वागणार नाहीं!

घातकी०—थांब! तुझे हाल हाल करतों! तूं माझी बहीण म्हणून मायेनें माझ्या मनाला पाझर फुटेल असं समजूं नको! कधींही फुटणार नाहीं! पाहीन! त्याही रांडेला चमत्कार दाखवतों! (जातो.)

चंद्रान०—आतां मात्र देवा, त्या साध्वीचं तूं-च रक्षण कर!

(जाते.)

---

**प्रवेश तिसरा समाप्त.**

## प्रवेश चवथा.

### स्थळ—रस्ता.

( **गणपतराव व माधवराव** बोलत बोलत येतात. )

**माधव०**—कसला घेऊन बसलां आहां देशाभिमान! पूर्वीच्या सर्व गोष्टी तुम्ही पाहिलेल्या म्हणून तुम्हाला वाटत आहे एवढंच! बाकी खरं विचाराल तर तुम्हाला होणारा हा खेद अगदीं व्यर्थ आहे! अहो, ते दिवसही गेले आणि तो मनूही फिरला! सद्यां अशी स्थिति आहे, कीं आपले ओंठ आपल्याच दांतांनीं चावले जात आहेत! जिकडे पहावं तिकडे दुटप्पीपणा, मत्सर, अपलपोटेपणा, अशाच जिनसांचीं दुकानं! बरं गिऱ्हाइकंचें त्या करतां मग त्यांना तरी कां दोष! अहो, आपल्यांतलेच आपलं अकल्याण करण्याच्या विचारात! राज्य प्रकरण म्हणजे काय यांचें वारं तरी आहे कां? प्रजाकल्याणासाठीं राजानें अमुक एक केलं पाहिजे अशा बद्दल ब्र तरी काढण्याची पुण्याई आहे का? मात्र प्रजेनें अमुक अमुक तऱ्हेनें वागून राजनिष्ठपणा दाखवला च पाहिजे असे उद्गार ऐकतों! घरांतलेच जर चोरांना मिळाफी होऊं लागले, तर त्यांत चोरांचा तरी काय दोष!

**गणपत०**—माझा दुसऱ्यांना दोष देण्याचा बि-

मुळीच इरादा नाहीं व मी तसं म्हटलंही नव्हतं ! मी सुद्धां तुमच्या प्रमाणेंच ह्मणतों ! अहो, पुंगी वाजवून गारोडी बिळांतून सर्प बाहेर काढतो; व तोच प्रसंगीं त्याला घातुक होतो; ह्मणून हा दोष सर्पाकडे नाहीं ! याचा दोषी गारोडीच होतो ! कारण सर्प हा जातीवर जायचाच !

**माधव०**—अहो, गारोड्याचा सर्प बिळांतून बाहेर काढण हा धंदा तरी असतो ! परंतु चोरांना मिलाफी होऊन त्याच्या सर्वस्व स्वाधीन करून उलट-कांहीं लभ्यांश न होतां आपणा स्वतःसही नागवून घेणं याला कोण धंदा ह्मणेल ?

**गणपतराव** ०–माधवराव, काय सांगू ! एकंदर सर्व स्थिति लक्षांत आली ह्मणजे अंतःकरणांत एकदम एक प्रकारची कालवाकालव सुरू होते ! आणि प्रत्यक्ष सुलटच्या गोष्टी उलटच्या होऊं लागल्या हें पाहून दुःखाचे उमाळे फुटूं लागतात त्यावेळीं मोठ्या थाटानें दिलेल्या अभिवचनाचं धडधडीत पदोपदीं उल्लंघन होत असतां तें निमुटपणें आपणास पहावें लागत आहे, हें मनांत येऊन अतिशय खेद वाटतो! अहो, आपण एखाद्या दुःखद व अनिवार्य स्थितींत आहों, व ती आपणास प्राप्त झाली असतां, तिच्यांतून पार पडण्याचा विचार सोडून उलट ' बुडल्याचे पाय खोलांत ' अशी हल्लीं या क्षात्रत्वाचा अभिमान बाळगणाऱ्या लोकांची स्थिति झालेली पाहून दिलगिरी वाटते !

लों, त्यावेळीं त्या मानभावी रांडेनें माझी क्रूर व निश्चयी मुद्रा पाहून, " उदईक मी आपल्या म्हणण्याप्रमाणें वागण्यास तयार होईन " असं म्हणून रातोरात पोबारा कींहो केला! खरोखर! मनुष्य कामांध झाला म्हणजे त्याच्या अकलेची व शहाणपणाची माती होते! एकंदरींत स्त्रिया म्हणजे पाऱ्याप्रमाणें आहेत! त्याचा मिलाफ करून गोळी बनवायला ज्याप्रमाणें वनस्पतींची पूर्ण माहिती लागते, तद्वतच या स्त्रियांच्याही कामीं पाहिजे! (किंचित् थांबून) या कामांत मला इतकी दिलगिरी वाटतीना! परंतु तिला सामोपचारांनीं वश करून पुढं त्या कारट्याची व्यवस्था लावण्याचा जो माझा विचार होता तो अगदीं फसला! (रागानें) बरं! चिंता नाहीं! जाते कुठे! आं कुठे जाते! सरड्यानें जरी पळ काढण्याचा विचार केला, तरी त्याची धांव कुंपणापर्यंतच! तशी रांडे, तूं जरी पळून गेली आहेस, तरी जाशील कुठे! राज्यांतून तर जात नाहींस! या कामीं सुभेदारसाहेबांचे कान फुंकीन, त्यांना मथवीन, काय पाहिजे तें करीन! परंतु तुझ्या कारट्याचा व तुझा शोध करून आणून तुमचे हाल हाल करीन तरच नांवाचा घातकीराव! आणि हें पक्कं ध्यानांत ठेव कीं असं हें व्हायचंच! हातांतून सुटून मीं म्हणतों बिळांत जाऊन लपला, तरी पण त्याचं बीळच खणून काढल्यावर मग कुठे जातो सर्प! तूं असं समजूं

नको कीं मला ह्मणजे याचा विसर पडेल! कधीं नाहीं पडायचा! तुमच्या वंशाचं नांव सुद्धां निघूं नये व सर्व क्षत्रिय रजपूत नाहींसे व्हावे, हा तर माझा मूळ उद्देश! या कामीं मला जे श्रम घ्यावे लागतील ते घेईन; परंतु काम तडीस नेईन! हल्लीं जरी माझ्या नांवाचा लोकांत थोडा बोभाटा होऊं लागला आहे तरी त्याचीही मला फारशी परवा नाहीं!

( इतक्यांत विषयीराव येतो )

घातकी० ( त्यास पाहून ) हं! हे आले! आ-तां याला आपल्या पुढच्या मसलतींत घेतां कामा नये! याला चंद्रिकेबद्दलच आशा लावून तिच्या प्राप्ती क-रतां अमुक अमुक खटपट कर ह्मणून कांहीं तरी थाप देऊन नादीं लावला पाहिजे! ह्मणजे यालाही नादीं लावल्यासारखा होऊन कदाचित् तिचा शोध लाग-ल्यास आपलंही काम होईल! ( उघड ) विषयीराव, तुह्मी अगदीं वेळेवर आलां!

विषयी०—आलों म्हणजे! अहो यायचाच!! बरं! पण घातकीराव, आतां कसं काय पुढें? हें पहा आज इतकीं वर्षं झालीं नुसत्या आशेवर रहावं लागत आहे! म्हणून ह्मणतों, काय तें एक सांगा! होत असल्यास होय म्हणा नाहींतर नाहीं म्हणा! ह्मणजे मेघवृष्टि आतां होईल मग होईल या आशेनें चातकासारखं तिष्ठत नको बसायाला!

घातकी०—हेंच तें ! 'घे सुरी न् घाल उरीं' म्हणतात तें याला ! अहो, उतावळेपणानें होणारीं जर हीं कामं असतीं तर मग हो कशाला हवं होतं ? म्हणताातना उतावळेपणानें सर्वच फसून भलत्याच एखाद्या प्रसंगांत पडण्याची पाळी येते !

विषयी०—तें सर्व खरं ! पण किती दिवस हें आपलं असं चालायचं !

घातकी०—दिवसगत लावीत नाहीं; परंतु किंचित् धीरानें घ्या !

विषयी०—धीरानें घ्या, धीरानें घ्या ! किती धीर धरायचा ! आतां तर आपल्याच्यानें कांहीं धीर धरवत नाहीं ! तुमच्याच गळ्याची शपथ ! पण तसं कशाला ! मी म्हणतों कीं आपल्या ताब्यांत आहे तर बळजबरी करायला काय हरकत आहे ?

घातकी०—हरकत नाहीं ! पण हें पहा. मृदु वस्तु ज्या आहेत त्यांना मृदु साधनांनींच हस्तगत केल्या पाहिजेत ! जाईचं फूल कधीं कोणी वृक्षाला झोडपून पाडलं आहे का ? त्याला जपूनच खुडलं पाहिजे ! एवढा मोठा रावण ! त्यानें सुद्धां जानकी त्याच्या ताब्यांत असतां तिच्यावर बलात्कार केला नाहीं ! याचं काय कारण ?

विषयी०—बरं बोवा ! पण आतां काय उपाय काढलात ! मी तुमच्या सांगण्याबाहेर अगदीं जाणार नाहीं.

घातकी०—हां ! असे ताळ्यावर या ! मी तुह्माला

सर्व सांगतों ! हें पहा, आतां पाहिल्यानें जी गोष्ट मी तुम्हाला सांगणार आहें, ती ऐकतांच तुम्हाला आश्चर्य वाटेल; व तुमचं अगदीं धैर्य खचून जाईल ! परंतु तसं होऊं देऊं नका ! समजलांत ! चंद्रिका काल रात्रीं पळाली !

**विषयी०**--( निराशेनें ) काय !

**घातकी०**—चंद्रिका पळून गेली ! तिच्या शोधार्थ लोक पाठविले आहेत ! परंतु अद्याप कांहीं तपास लागला नाहीं !

**विषयी०**--( धैर्य खचून ) चंद्रिका पळाली !! तर मग माझा आशावृक्ष अगदीं दग्ध झाला !

**घातकी०**--अहो, दग्ध झाला असं जरी तुम्हाला वाटत आहे, तथापि यत्न केला असतां वाल्या कोळ्याप्रमाणें त्याला पुन्हां अंकुर नाहीं का फुटणार ! तुम्हाला उपदेश करणारा नारद मी आहेच !

**विषयी०**—तुम्ही काय उपदेश करणार ! माझ्या आशेची हल्लीं अगदीं निराशा झाली !

**घातकी०**—" निराशा झाली. निराशा झाली " असं बायकांसारखं काय करतां ? विचारांत कसले पडलां ! उठा. तिच्या शोधाकरतां लोक पाठवा ! ती कांहीं फार दूर गेली नसेल ! बापाच्या घरीं जाईल, तर तेंही कठीणच ! कारण त्याही स्वारीची तजवीज युवराजांच्या शेजारीं झालेली तुम्हाला ठाऊक आहेच ! बरं सासऱ्याची तर आतां अगदीं निरा-

शाच झाली ! कारण तुम्हांला ठाऊक आहेच कीं कालच वीरसेनाला "तुमच्या वडलांस देवाज्ञा झाली" असं कळविण्याविषयीं किल्लेदारास हुकूम झाला होता ! तेव्हां सध्यां ती आसपासच कोठें तरी असेल ! उठा !

**विषयी**०--ठीक आहे ! पाठवतों लोक !

**घातकी**०--( आपल्याशीं ) भाकरीचा तुकडा टाकल्याबरोबर हें एक बरंच मिटलं म्हणायचं.

( पडदा पडतो. )

**प्रवेश पहिला समाप्त.**

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**--सुभेदाराचे वाड्यापुढील पटांगणांतील तंबू.

( **अखतरशहा** बसलेला प्रवेश करितो. )

**अखतरशहा**०--( आपल्याशीं ) सच है के इनसानका अंदेषा इनसानकु खाता है ! यह नहीं, बल्के जिसकी उसे तजुस्सुस है वही उसका खुराक हो जाता है ! अरे मीया जो होना है वोह होगा ! यह गम वोह नहीं के तुम्हारी फिकरसे मिटेगा ! इसमे षक् नहीं के अव्वल आनेके इस अक्लीमके लोगोंसे हमें डर था; मगर मालुम हुवा के यह खियाल बेजा था ! यहांके लोग कमजोर ! खुदाका

पनाह् ! ऐसे चोर ! मुरव्वतका नाम नहीं; अखला-कका काम नहीं ! दौलतने इन्हें जेरदस्त कर रखा है; बहादूर सच्चे ! मगर बखीलीने आनकर मिटा रखा है ! ला रेबू, और अक्वामसे ऐसे लोग बहोत कम् होंगे ! ये सब सच, मगर बेफायदाह् ! बा-असूके इत्तिफाकीका कोइ नहीं कायदाह् ! इत्तेहाद अजीब पै है ! जिस् दिलमे ये नहीं वोह् खाली ने है ! ना इत्तिफाकी सगोंकु दुष्मन, दुष्मनकु दोस्त बनाती है ! आपना सर् दुसरोंके हात, दुसरोंका अपने हात कराती है ! मै आज एक अर्सेसे यही तमाशा देख रहा हूं जाहेरमे खेल बातिनमे गेंद फेंक रहा हूं ! अगर इनसाफसे देखें तो साबिअस्त्रके लोग कैसे होषमंद और आकिल् थे ! खुदाकी यादसे कोई वरुत नहीं गाफिल थे ! हालांके खजाना बहोत था, मगर ऐसे सुस्त नथे, के अपने कारोबारमे काहिल होते ! आज हम् हैं के खियाल तक् नहीं ! किधरसे आये किधर गये. अरे, कुच तो सोचे ! हक् तो मांगते हो, मगर किस् बिरतेपर भला ! कान काम कौनसी इजत् तुमने कमायी ? हां ! अलबत्ताह् बद-नामीका झंडा हर दयारमे कायम कर दीया ! यह् बात तो सच ! रोभी लिया, तो तुम्हे कौन पुच्छे ! बात तो यह् है, नकारेमे कहां तूती ! मगर मुझे ब-होत कुच अफसोस सद अफसोस है ! आह् !

( इतक्यांत एक चाकर येतो. )

चाकर०—हुजूर, घातकीराव साहाब तशरीफ़ लाये हैं !

अख़्तर०-अच्छा आनेदो (आपल्याशीं) आहा ! वोह् देखो हरामजादा घातकीराव आता है ! मै खियाल करताहूं के ऐसे इस् मुल्कमे बहोत होंगे !

[ घातकीराव येतो. ]

घातकी०—( गुडघे टेकून ) हुजूर, बमोजिब् इर्शाद आपके गुलाम हाजिर हुवा !

अख़्त०—घातकीराव, चंद्रिका कैसी निकल गयी ! यह् जिम्मा तुमारेही सर होगा ! मेख्यियालन कहेताहूं के जुरूर इसमे कुच न कुच खरखशाह् है ! अगर तुमने चंद्रिकाकी वापिसीकी जल्द खबर लादी तो ठीक ! वर नह् हर बहाने जिम्मेहे का बोज तुझारे सर ! अलावा एजीं जहांगीर आलम् पनाह् मलतान उल्मुल्कने एक खत अपनी मोहोरे खासकर समर्कदसे अपने एक मुका जिमके हात इरसाल किया है; और जिस्मे के बाद फैसला करने अपनी मजालिसे खासनें यह् हुकुम नाफिज् करता हैं के एकसो बीस घडीमे जैलके हुकुमकी तामील होना चाहिये ! वोह् यह् है के बीरसनकु हर बहाने एक रोजका आराम बजरी यताम दीया जाय; बादमे तरेहेग् हो ! बस्स ! तुम्हे लाजिम हो के इस्की पैरवी हो. और इस्के सिवा जो कुच होकुम होंगे, हमारे

दफ्तरस भेज दीये जाएंगे ! और किल्लेदारभी मुतल्ला होगा ! ( घातकीराव जातो. )

अखूत०—( तो गेल्यावर पाहून, आपल्याशीं ) अच्छा ! हरामजादे. आया तूने इस बातकु नहीं जाना के तू भी वीरसेनके साथ नीस्त वो नाबूद होगा ! हां ! ये बात तो तुझे मालुम ही नहीं ! यह वोह सलतनत् नहीं, के जिस्मे माल्लोमीके कारोबार जारी हों ! अगर दूरबीनीसे देखो तो यही बात पाई जाती है के तुज जैसे निमकहराम एक रोज हमेभी तलवारका मुंहू दिखलाएंगे ! ( थांबून व विचार करून ) अहा भाई ! कैद खानेमे किसी एककु जुल्दही भेजना है. ( पहाऱ्याकडे पाहून ) अरे कोइ हैरे ; पहेरा किस्का है ?

[ पहारेकरी येतो. ]

पहारेक०—जी हुजूर.

अखूतर०—जमादारकु बुलाव.

( चाकर जाऊन येतो. )

पहारे०—हुजूर, बमोजिब इरशाद आपके गुलाम जमादारके बुलानेकु गया, मगर मालुम हुआ के जमादार साहाब कवायदे सरकारीमे मशगूल हैं !

अखूत०—कुच फिकर नहीं. जल्द बुलाव !

( चाकर जाऊन जमादारासह परत येतो. )

पहारे०—हुजूर. जमादार साहाब आते हैं !

**माधव०**—अहो, यांत म्हणजे त्यांचा कसला दोष आहे असं नाहीं! कारण आईच्या मागें मुलाला जसं वळण लागेल तशी त्याची प्रवृत्तिहि होते!

**गणपत०**—खरं! परंतु बीजाहून भिन्न प्रकारचा अंकुर कधींही फुटणार नाहीं! आतां इतकं मात्र खरं, कीं त्याच्या रहाण्याच्या निगेप्रमाणें ते गुण कमी अथवा जास्त मानानें राहतील! मला असं सांगा कीं ढगांनीं जरी सूर्य व्याप्त झाला, तरी त्याचा प्रकाश अजिबात लोपला आहे का? आतां इतकं मात्र खरं, कीं त्या मानानें तो कमी अथवा जास्त पडेल!

**माधव०**—हें तुमचं ह्मणणं कांहीं अंशीं खरं आहे!

**गणपत०**—विजयगडच्या थोरल्या मोहिमेच्या वेळीं अगदीं आणीबाणीच्या प्रसंगीं विलासगडकर, रामदुर्गकर, जयकर, पठारकर, व इतर सरदार जवळ असतां, प्रथम अपजय होतोसा दिसला त्यावेळीं "सरदारहो! तुह्मांला डगण्याचं कांहीं कारण नाहीं! आज जरी कदाचित् दुर्दैवानें अपयश आलं तरी धीर सोडूं नका! 'सुंभ जळलं तरी त्याचा पीळ कायम रहातो' हें लक्षांत आणून आपल्यामध्यें असणारा जो खरा पीळ तो विसकटूं देऊं नका! आज तुह्मी जे या धारातीर्थीं आपल्या प्राणांची आहुति देऊं किंवा दुसऱ्यांच्या प्राणांची घेऊं, अशा निश्चयानें उभे अहां, ते महाराजांसाठीं नव्हे किंवा त्या सिंहासनासाठीं नव्हे; परंतु तुमची जन्मभूमि

म्हणजे तुम्हाला मातोश्रीसमान जो हा सुवर्णमालिनी देश त्याच्या रक्षणा करतां आहे! हें पूर्ण लक्षांत ठेवा; म्हणजे तुम्ही आपल्या जयाचा झेंडा लवकरच मिरवाल!" असं जें चंद्रसेन महाराजांनीं मोठ्यानें ओरडून भाषण केलं, तें त्यावेळे पुरतंच कां हो!

माधव०—अहो हें उघडच आहे! दिनमान फिरलं, म्हणजे मनुष्याच्या नित्य क्रिया सुद्धां बदलतात! तसं कशाला! हल्लीं हेच मुसलमान 'वर हिंदु कीं मुंड त्याला' असं करीत आहेतच कीं नाहीं!

गणपत०—कसलं घेऊन बसलां आहां दिनमान! हा बेशरमपणा असाच वाढत जायचा बरं! जरी विषारी दांत उपटून काढला, तरी सर्पाचं पूर्ण स्वरुप कधीं बदललं आहे का! त्याच्या अंगावर काठी उगारल्यास तो कधीं स्वस्थ बसेल का? (किंचित् थांबून) आतां या गोष्टी बाहेर पडूं लागल्या बरं! घरांत चोरी झाली, तिला कांहीं दिवसही लोटले; चोरी करणारा तर अशा योग्यतेचा मनुष्य बनला, कीं त्याचं नांव घेण्याची सुद्धा पंचाईत अशा वेळीं जर त्याचं नांव समजलं, व तोही घरचाच आहे असं कळलं तर काय उपयोग! या घातकीरावाचं या राज्यक्रांतीच्या कामीं अंग होतं व आज आलेल्या या नीच स्थितीला तरी

कारण ताय! हें आतां कळूं लागलें! परंतु काय उपयोग!

माधव०—अहो, अरुण जरी लंगडा आहे, तरी तो सध्यां सूर्याचा सारथी आहे, एवढं लक्षांत आणलं ह्मणजे पुरे आहे! बरं चला.

( जातात. )

( पडदा पडतो )

प्रवेश चौथा समाप्त.

अंक दुसरा समाप्त.

---

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

स्थळ—रस्ता.

[ घातकीराव एकटाच प्रवेश करितो. ]

घातकी०—( आपल्याशीं ) सर्व कामांत मनुष्य हुषारी ठेवतो, परंतु स्त्रियांपुढें तो कधींना कधीं तरी फसतोच! आपल्याच ताब्यांत आहे, आपण ह्मणूं तेव्हां करूं, आपल्यावांचून आतां दुसऱ्या कोणाला

आधार आहे, अशा अनेक कल्पना करून आपण स्वस्थ बसतों; परंतु त्यांचा कावा कांहीं निराळाच असतो! त्या केव्हां हातावर तुरी देऊन पळून जातील याचा कांहीं नियम नाहीं! हीच रांड चंद्रिका! म-रोदर असल्यामुळें प्रथम तिला तशीच राहूं दिली; प्रसूत झाल्यावर पुढें विचार पाहूं म्हणून स्वस्थ बसलों! प्रसूती नंतरही अनेक प्रसंगीं नुसता खडा टाकून पहा-वं असा क्रम चालवला! तरी कांहीं नाहीं! नंतर तिला कांहीं दिवस तरी दुःखाचा विसर पडावा ह्मणून "आपल्याच ताब्यांत आहे पुढें पहातां येईल" असं समजून वासना प्रबळ झाली असतांहि तिला जागच्या जागीं दडपून स्वस्थ राहिलों! ही गोष्ट जर दुसऱ्या कोणाला सांगूं लागलों तर तो देखील "तुमच्या ता-ब्यांतच होती तर बलात्कार करायचा होता" असं ह्मणून या मूर्खपणाबद्दल माझ्या तोंडांत शेण घालील! बरं तितकं करायला तरी मी चुकलों का! तरी सुद्धां ती बधली नाहीं! इतकंच नव्हे तर उलट हातावर तुरी देऊन पळून गेली! ती कोणत्याही प्र-कारें वश होत नाहीं, व आतां तर दम धरण्याची सोय नाहीं, असं होऊन तिच्या कारट्याला मारण्या-च्या भीतीनें तरी ती वश होईल असं समजून जेव्हां तिच्या महालांत गेलों व "तूं माझं म्हणणं कबूल न करशील, तर आतांच्या आतांच तुझ्या का-रट्याला परलोकाला पाठवतों" असं जेव्हां मी ह्मणा-

अखत०—आने दो.

जमादार०—( पुढें होऊन ) हुजूर. गुलाम हाजिर है.

अखत०—तुमे लाजिम है कै फौरन एक हत्यारवाली तुकडीके साथ जेल चले जाव और बात देने इस खतके ( कागद देतो ) किलादारकु उनके होकुमकी कामिल हो. बस्स यही होकुम है चले जाव !

( पडदा पडतो. )

प्रवेश दुसरा समाप्त.

---

## प्रवेश तिसरा.

स्थळ—तुरुंग ( बाहेरील बाजू )

[ घातकीराव प्रवेश करतो. ]

घातकी०—( आपल्याशीं ) आजपर्यंत चालत्यलेल्या कपटरूपी प्रहसनाच्या दुसऱ्या अंकाचा शेवटचा प्रवेश होऊन उद्यांक पडदा तर पडणार! गुलामा तुरुंगांत राहून देखील माझ्यावर गुरगुरणं ग्यां ! कर आतां गुर गुर ! उद्यां ते मांग रस्त्यांतून तुझी धिंड काढू लागले म्हणजे वाटेल तितकी गुरगुर कर ! एवढा उद्यांचा कार्यभाग उरकला, म्हणजे लोकांच्याही चळवळीकडे वळतो.

जरा कुठे नास्त कमी दिसलं पुरे! कैद, शासन, मृत्यु या शिवाय अन्य व्यवस्थाच ठेवीत नाहीं! आतांशी जरी सुभेदार माझ्या पाळतीवर आहे व चांद्रिका पळाली तीही माझ्याच बळावर असं जरी त्याला विनाकारण वाटत आहे, तथापि त्याबद्दलचा त्यानें मागितलेल्या जाब देण्याची मला बिलकुल पर्वा वाटत नाहीं! कारण विषयींरावानें तिच्या शोधार्थ चाल-वलेली खटपट कधीं वाया जाणार नाहीं! असो. पहातां येईल! (पाहून) कोण आहेरे पहाऱ्यावर?

(पहारेकरी पाहारा करीत आहे असा प्रवेश करितो.)

पहारेकरी०–कौन है? क्या काम है साहाब?

घातकी०–किल्लेदार साहेबांना मी आलों आहे ह्मणून कळीव!

पहारेकरी०—तो चले जानां. अंदरजाने दे-नेकु मै न सकताहूं! और मै हुकुमका तावेदार ठेरा. तो मै ह्यांसे जाने नहीं सकता! ये देखो कैद-खानेमेसे कोई फरास जाता है उसकू भेजो किल्लेदार साहाबके तरफ!

(एक फरास येतो.)

घातकी०–(फरासास) अरे, प्रथम किल्लेदार-साहेबांना मी आलों आहे ह्मणून कळीव जाऊन!

(फरास जातो; व पुन्हा किल्लेदारासह येतो.)

घातकी०–(किल्लेदारास) किल्लेदार, आजपर्यंत

चाललेल्या वाटाघाटीचा निकाल बादषहानें करून सुभेदारसाहेबांच्या मनोदयानुरूप हुकूम दिला. काढा कुलुप !

किल्लेदार०--क्यौं भाई ! बीरसेन महाराजकु कतल करना कैसा ? और अगर कतल करना है तो क्या होकुम वहींसे हुवा ?

घातकी०--हुवा काय ? सुभेदारसाहेबांच्या हातीं देखील घेऊन पडला ! तमाम लोकांत हा विधि उद्यींकच उरकून घ्यायचा म्हणून दवंडी देखील फिरली !

किल्लेदार०-(रागावून)अबे हरामजादेहू ! हत्ताके अपने बादपाहकी सल्तनत तकू फितूरसे बरबाद की! अपने आकाकु जिलावतन किया ! हुनूज जानका लेना बाकी है और यह बहोत बडी तेरी निमकहरामीकी निशानी है के अपने मालिकका कातिल आज तूही बन आया ! मै अपने दार्नोंकु चाब जुरूर ये कहुंगा के तुज जैसे इस् सलतनतमे कुत्ते देखकर जी क्यौं न जले ! हम् जैसे सिपाहि योंका पेशा तो यही है के अपने नमक हलालीके साबित् करनेमे जुल्मका करना, होकुमका बिठलाना, तुज् जैसे शोदोंकु मदद करना, हर तौरसे वाजिब व लाजिम है ! मगर यह् वोह् पेशा नहीं ! और यह् वोहू नमकहरामी नहीं के आपने मालिकका नमकखा उसीके सर चढ बैठें !

अगर इनसाफसे कहीये ऐसे आकोंके एहेसां फो-
रामुशोंकु वर सरदार करना चाहिये ! बलके तुझ्
जैसे जालिम और नमकहराम पैदाही न होते तो क्या
अच्छाथा ! मगर ताअज्जुब है के मुल्कमे तुज्
जैसे बदअखलाख, एहेसान् फरामूश व गरदनकुश
अबतख बाकी हैं ! और अफसोस तो ज्यादा इस
बातका है के अब तक सुभेदार साहाबने तुज् जैसे
कम् जर्फक क्यौं रखा ! बेहेतर तो ये था के अबतक
तेरा नामो निशान मिट हो गया होता ! मगर खि-
यालन मालुम होता है के सुभेदार साहाबकी गरदन
पर जूं अबतक न चढी ! खैर चलो ! मेरे पासभी
सुभेरदार साहाबकी जानिबसे होकम आया है
सुकल बीरसेनका सर उडाया जाय ! अफसो-
स ! ( दुःखाने ) हालांके ए भाइयो, मै एक गैर
जातका अदमी—न तुम्हारी मौतका शरीक, न खाने
पीनेका शरीक ना अकल रखता हुं, न समज है मग-
र तौभी मै यही कहुंगा के हत्तल मकदूर ऐसे घा-
तकीराव जैसे नमकहराम, एहेसां फरांमूश, दगाबा-
जकी सोहोबतसे बचो ! और अपने बाप दादा-
ओंकी नेक रस्मोंकु और नेक आदतोंकु और बहा-
दुर्योंकु अपनी तन दुरुस्ती संभाल इख्त्यार करो;
के उन्के नामका निशान जबतक् के यह् आलमे
फानी फना न होने पाय तबतक् कायम रहे ! बस्स !
अगर कहेना है तो यही है ! चाहे सुनो या न सुनो!

हमारा काम रास्ता बतलाना था ! बतलाया ! आगे मर्जी तुम्हारी !

( पडदा पडतो )

प्रवेश तिसरा समाप्त.

---

## प्रवेश चवथा.

### स्थळ—तुरुंग.

[ पायांत बिड्या असलेला वीरसेन प्रवेश करितो ]

**वीरसेन**–(दुःखानें) आज इतकीं वर्षे एकसारखी कैद ! छे छे ! आनंदवास ! अरे अरे अरे ! हाच माझा आनंदवास अं ! पक्ष्यांचं ओरडणं हेंच माझ्या सभेंतील शास्त्रिमंडळाचं भाषण ! अंधकार हाच माझा स्नेही ! गाढ रात्रींत चहूंकडे असणारी शांतता हीच माझ्या हृदयाची समता ! व त्यावेळीं होणारा किर्र शब्द हाच माझ्या चित्ताला समाधानवृत्ति आणणारं साधन ! चहूंकडे जमिनीवर कधींही हात न फिरल्यामुळें सांचलेली गुढघा गुढघा धुळ हीच माझी मऊ बिच्छायत! सुंदर कोंड्याची भाकरी व तें लाल घुटं हींच माझीं पक्वान्नं ! आणि त्या काळ्या मांगड्यांच्या मुखावाटे निघणारे दिव्य शब्द हाच माझ्या नांवाचा स्तुतिपाठ ! शिव शिव ! याच राजपुत्राच्या सतत चालू असणाऱ्या गोष्टी अं ! ( भांबावून ) कोण ! मी

राजपुत्र ! गाढव ! ( संतापून ) राजपुत्र मी आणि एखाद्या अपराध्याप्रमाणें आज इतकीं वर्षे कैदेंत ! धिक्कार असो मला ! गाढवा ! तुझी अक्कल गेली कठे ! तुझं शौर्य काय झालं ! ( भांबावून ) काय ! माझं शौर्य ! गेलं, गेलं माझं शौर्य ! [स्मरलेसें करून दुःखानें] हाय हाय ! बाबांचा मृत्यु ! त्यांना तिलांजलि देणार मी ! तूंच कारे त्यांना तिलांजलि देणारा दिवटा! यापेक्षां प्रत्यक्ष पत्थर झाला असतास तर ठीक झालं असतं ! ( संतापानें लाल होऊन ) काय कैद ! आणि सतत आज इतकीं वर्षे ! हे पृथिव्यादि भुवनत्रय संचारी गंधर्वकिन्नरानों, केवढा–केवढा भयंकर अनर्थ हा ! राज्याची उलथापालथ ! आणि ती एका बटकीच्या दिवट्याकडून ! केवढा अधमपणा हा ! वसुंधरे, एकदम दुभंग होऊन ह्या हतभाग्याला आपल्या पोटांत कां नाहीं घेत ! लाथा, बुक्या, मार व अति निंद्य अपमान सहन करणारा हा कोडगा तूं आपल्या स्वच्छ, निर्मल व पुण्य अशा ठिकाणीं कशा करतां ठेवलास ! हे अभ्रपटलशोभिनि विद्युल्लते ! तुझा तो कडकडाट, ती तुझी अतर्क्य शक्ति व तें तुझं उग्र तेज हीं सर्व या गाढवाला–नाहीं नाहीं या षंढाला–पाहून अदृश्य झालीं का ! कां नाहीं याला आपल्या सपाट्यांत ओढीत ! रविकिरणांनो यापेक्षां जास्त तापून कां नाहीं या कुलांगारावर आपली आग पाखडीत ! ! बस्स ! आज मृत्यु किंवा सुटका ! प-

रमेश्वरा ! आज याला बळ आणि उत्साह दे ! ( पाहून व भांबावून ) कोण रे तो ! हाच तो अधम ! हं ! खबरदार पुढें पाऊल टाकशील तर !

( इतक्यांत घातकीराव व किल्लेदार येतात ).

**घातकी०**—सरकार, आतां हे किल्लेदार आपल्या हातापायांतल्या बेड्या काढून उद्यांपासून आपल्याला अक्षय्य सौख्य भोगण्याची मोकळीक देणार आहेत! आजपर्यंत जरी आपल्याला इच्छित पदार्थ सेवनाला मिळाले नाहींत, तथापि आतां सर्व दिवस व रात्रभर आपल्याला इच्छेस येईल तो पदार्थ मागून घेण्याची मुभा आहे ! उद्यांपासून आतां आपण नित्य सुखांत रहाल !

**वीरसेन**—( रागानें ) मी नित्यसुखांत रहातों किंवा तूं रहातोस हें तुला दाखवितों ! थांब !

**घातकी०**—अरे ! हे असें भ्रमिष्टासारखें काय करूं लागले.

**वीरसे०**—गुलामा भ्रम झाला काय मला ! थांब ! ( असें ह्मणून पायांतील बेड्या तोडून घेऊन त्याच्या अंगावर धावतो. )

**घातकी०**—( घाबरून ) अरे ! कोणी येऊन यांना धरा ! हे अगदीं बावरले ! आपापलीं हत्यारें संभाळा!

( दोन शिपाई येऊन वीरसेनास धरितात. )

**वीरसे०**—( त्यांस हिसडून ) हां ! खबरदार

माझ्या अंगाला कोणी हात लावाल तर! ( असें म्हणून घातकीरावाच्या अंगावर जातो. )

**घातकी०**—दुसऱ्या हातविड्या तरी आणवा! पहातां काय! धरा त्यांना! ( शिपाई लोक येऊन वीरसेनास धरतात, इतक्यांत दोन धटिंगण येऊन वीरसेनास सोडवितात व शिपाई व किल्लेदार यांस जखमी करितात. )

**पहिला धटिंगण**—सरकार, आपण आधीं या गृहस्थाबरोबर ( दुसऱ्याकडे बोट दाखवून ) बाहेर चला! मी मागोमाग येथील सर्व व्यवस्था लावून येतोंच! नंतर मी कोण व काय हें आपल्याला समजेल!

( वीरसेन व दुसरा धटिंगण जातात. )

**पहिला धटिं०**—(घातकीरावास खालीं पाडून) गुलामा! याच वेळीं तुला यमाजीभास्कराकडे पाठवला असता; परंतु तसं न करण्याविषयीं मी शपथ घेऊन चुकलों आहें! गुलामा ज्याचं नांव घेतलं असतां तुझ्या सर्वांगाची लाही होत असे, तोच हल्लीं जीवदान दिल्यामुळं तुला तुझ्या बापाप्रमाणं झालेला हा लिंबाजी! समजलास! ( त्याच्या तोंडांत बोळा घालून त्यास बांधून टाकतो ) पड गुलामा अ-

साच! ह्मणजे तुला कोणी येऊन सोडवीपर्यंत आह्मा- ला सुरक्षितपणें शहराबाहेर तरी जातां येईल !

( पडदा पडतो. )

प्रवेश चवथा समाप्त.

तिसरा अंक समाप्त.

---

# अंक चवथा.

## प्रवेश पहिला.

स्थळ-विषयीरावाच्या वाड्यांतील दिवाणखाना.

( विषयीराव बसला आहे. )

विषयी०-( आपल्याशीं ) इतका नादीं पडलों, पण अखेर कांहीं नाहीं ! चंद्रिकेकरितां आपलं कुळशील सर्व एकीकडे गुंडाळून ठेवून सर्व प्रजेच्या दोषाचं स्थान बनलों; तरी कांहीं नाहीं ! चंद्रिकेचं नुसतं नख सुद्धां अद्याप दृष्टीस पडत नाहीं ! काय करावं आतां ! या कामांत पैशाचा तरी किती खरची झाली व हल्लीं होतही आहे ! ( किंचित् थांबून ) तें

कांहीं नाहीं ! हा घातकीरावच लुच्चा ! यानें ती येथें असतांनाच कां नाहीं तिची व माझी गांठ घालून दिली ! कारण या फक्कडरावाला तिनें एकदां निरखून पाहिलं असतं, म्हणजे येथून पळून जावं असं तिला कधीं वाटलं नसतं ! इतकंच नव्हे ! पण या रावाशींच सदैव समागमसुख घ्यावं असं होऊन ती या पठ्याच्या पुनर्दर्शनाविषयीं अगदीं आतुर झाली असती ! सर्व खरं ! पण आतां काय ! आतां चंद्रिका मिळते कशी ! तिच्या शोधाकरतां पाठवलेले लोक अद्याप कां बरं परत येत नाहींत ! ही शोधार्थ लोक पाठवण्याची पांचवी खेप ! या खेपेला तरी तिचा शोध लागतो कीं नाहीं कोणाला ठाऊक ! केव्हां एकदां तिचं दर्शन होईल असं मला झालं आहे !

[ इतक्यांत एक चाकर येतो. ]

चाकर--धनीसाब, आपुन पाठिवल्येल लोक आल्याती !

विषयी०--काय! मी पाठवलेले इसम परत आले?

चाकर—व्हय सरकार. सदरवर बसलं हायती !

विषयी०—जा जा. त्यांना अगोदर वर आण !

( चाकर जातो व त्यास घेऊन येतो. )

विषयी०—कायरे भवानराव, कसं काय झालं.

भवान०--सरकार, आपण सांगितल्याप्रमाणं मी व सुभानराव मिळून दोघांनीं चंद्रिकाबाईचा बराच शोध

केला। परंतु त्या अमुक रस्त्यानं गेल्या किंवा अमुक ठिकाणीं त्यांचा सुगावा लागण्याचा संभव आहे असं कोणीही सांगेना !

**विषयी०**—तर मग तुम्हाला तिचा शोध लागला नाहीं !

**सुभान०**—छे छे ! सरकार, तसं नाहीं ! आह्माला त्यांचा शोध लागला नाहीं असं नव्हे ! परंतु त्यांचा शोध लागायला फार प्रयास पडले ! कारण अड्या-डोंगराच्या पायथ्याशीं जो सरकारी तुरुंगवाडा आहे, त्यांत त्यांना कोणी कैद करून ठेवल्या आहेत ! ही बातमी तरी आह्माला फारच गुप्त रीतीनें समजली ! कारण दरवाजाला बाहेरून कुलुप आहे !

**विषयी०**—परंतु त्या ठिकाणीं तीच आहे असं कशावरून तुह्मी ह्मणतां ?

**भवान०**—ह्मणजे ! हें काय विचारावं सरकार ! आह्मीं त्यांना प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिलं ! त्या ठिकाणीं केवळ त्याच होत्या असं नव्हे ! त्यांचा मुलगा व ती फटाकडी दासीही त्या ठिकाणीं होती !

**विषयी०**—( पडद्याकडे पाहून ) कोण आहेरे तो ! विठोबा !

[ विठोबा येतो. ]

**विषयी०**—( त्यास पाहून ) जा, माझा रुमाल व कलमदान घेऊन ये !

( चाकर जाऊन घेऊन येतो. )

**विषयी०**--( पत्र लिहून ) भवानराव, हें पत्र घ्या व घातकीरावाच्या वाड्यांत जाऊन खुद्द त्यांच्याच स्वाधीन करा. जा.

[ दोघे मुजरा करून जातात. ]

**विषयी०**--( आपल्याशीं ) आतां मात्र मी लवकरच आनंदसमुद्रांतल्या विषयनौकेंत जाऊन बसणार !

[ पडदा पडतो. ]

**प्रवेश पहिला समाप्त.**

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**-अडच्या डोंगराच्या पायथ्याजवळील तुरुंगवाडा.

( **चंद्रिका, सुशीला** व लहान मुलगा **तीव्रसेन** प्रवेश करितात. )

**चंद्रिका**-( दुःखानें आपल्याशीं ) देवा ! मागच्या जन्मीं मी असं कोणतं पातक केलं होतं कीं त्याचं फळ मला असं भोगावं लागत आहे ! हा मेला निर्दय घातकीराव ! हाच बरं इतक्या सर्व दुःखाचं कारण ! कसली मेल्याची कसाबा सारखी करणी ! खोटं नाटं पत्र लिहून मेल्यानं मला बापाच्या घरून तिकडे नेलीन ! म्हटलं मुलगा मोठा होईपर्यंत त्याच्या तोंडाकडे पाहून कसे तरी चार

दिवस काढीन ! पण तें सुद्धां मेल्याला पाहवलं नाहीं! आतां काय करूं मी ! देवा ! कामवासना ह्मणजे पापवासना नव्हे का ! आणि ती अगदीं परक्याच्या ठिकाणीं ! ह्मणजे तर त्याहीपेक्षां भयंकर नव्हे का ! पण देवा ! ती धरणाऱ्या पाप्यालाच उलट तूं साह्य झालास ! तुझ्याजवळ पाप आणि पुण्य या दोहोंचाही हिशोब असतो असं म्हणतात ! मग याच वेळीं तुझे चित्रगुप्त तो मांडायला कसे चुकले ! माझं कांहीं जरी होतं तरी मला पुरवतं ! पण मेल्यानं माझ्या करतां सर्वांची राखरांगोळी केलीन ! [ हुंदका देऊन ] हल्लीं तिकडची प्रकृति कशी असेल नि काय! हाल होत असतील ! कोणी जवळ नसेल ! तिकडे दुःख भोगावं आणि मीं तें मला कळत असून जिवंत राहून त्याचा नुसता विचार करीत बसावं ! ( गहिंवरून ) जीव सुद्धां दिला असता ! मला कुठे परवा आहे त्याची ! पण बाळाकरतां म्हणून सर्व दुःखं गिळून टाकलीं आहेत ! ( किंचित् थांबून ) माझं हें दुःख पाहून सुशीलेशिवाय दुसऱ्या कोणाला वाईट वाटणार आहे !

**सुशीला**—वइनीसाहेब, पुरे आतां ! किती बरं दुःख कराल ! हे पहा तीव्रसेन महाराज सुद्धां आपल्याला दुःखी पाहून अगदीं कष्टी झाले आहेत !

**तीव्रसेन**—आईसाहेब, आपण किती दिवस बरं बाहेर आहों ! आतां आपल्याला घरीं नाहीं का

चलायचं ! ( तिच्या कमरेला मिठी मारून ) आई ग अशी रडतेस कां बरं ! ( ती बोलत नाहीं असें पाहून ) मी आपला आवडता तीव्रसेन नाहीं का !

**चंद्रिका**—( त्याला पोटाशीं धरून व गाहिं- वरून ) बाळा, आतां कुठलं आपल्याला घर ! आप- लं घर धरणीमाय व आपला पोशिंदा जगदीश्वर ! सुशीळे, अशी काग माझ्या बाळावर वेळ यावी !

**सुशीला**—वहिनीसाहेब, येऊं नये. सारं खरं ! पण आतां आली त्याला काय करायचं !

**चंद्रिका**--काय करायचं ! या सर्व कृत्याचा सूड घ्यायचा ! समजलीस ! मला बाहेर पडूं देग ! म्हणजे मी जरी जातीनें स्त्री आहें तरी त्या मेल्या घातकीरावाचा सूड घेतल्या शिवाय कधीं रहायची नाहीं!

**सुशीला**--आपण राजधानींत असतों, तर तसं करण्यासारखं साधन तरी होतं ! पण आतां काय !

**चंद्रिका**--नको ग बाई ! राजधानींत रहा- ण्याचं नांव सुद्धां काढूं नको ! ज्या ठिकाणीं फुलं वेंचलीं, त्या ठिकाणीं गोंवऱ्या वेंचणं तुला प्रशस्त वाटतं का ! एका क्षणांत सगळीच दुनया कशी उलटी झाली ! सगळ्यांच्याच कशा अकला गेल्या ! राजा लढतो तो आपल्याच का सुखा करतां ! प्रजा- सौख्य नाहींच का त्याला ! आपल्या प्रजेची अन्ना- दानी रहावी व आपली संपत्ति आपल्याच जवळ कायम रहावी, असं नाहींच का वाटत त्याला !

[ इतक्यांत शिवाजी येतो. ]

शिवाजी--[ आपल्याशीं ] शाबास ! चंद्रानने शाबास ! ! खरं विद्यामृत तुलाच मिळालं आहे ! खरं व खोटं याची परीक्षा तू चांगली करतेस ! तू त्या घातकीराबाला बहीण देखील शोभत नाहींस ! धन्य आहे तुझी ! तुला हें त्याचं कृत्य सहन न होऊन तुझी जी घटकोंघटकीं चंचल स्थिति होते, व तुझ्या मनांत जे भयंकर विचार येतात ते कांहीं कालपर्यंत तुला तसेच एका बाजूस ठेवले पाहिजेत ! चंद्रानने, तुझं चंद्रसेन महाराजांवरचं प्रेम व वीरसेन महाराजांच्या उत्कर्षाविषयीं बळकट इच्छा, ही व्यर्थ आहेत ! यामुळें प्रसंगीं तूं आपल्या जीविताला सुद्धां अंतरशील ! परमेश्वरा ! जातीची स्त्री असून तिच्या अंगीं पुरुषाच्याही अकलेवर बिनतोड अशी अक्कल दिलीसना ! धन्य आहे ! केवढा राज्यधारणीपणा हा ! खरोखर ही च जर चंद्रानना नसती, तर माझी सुटका होऊन महाराजांचीही सुटका करण्याचा व त्याचप्रमाणें वहिनीसाहेबांच्याही पुढें होणाऱ्या आनंदकारक भेटीचा हे प्रसंग कधींच आले नसते ! युक्ति तरी किती शहाणपणाची ! जाधवरावावर आपलं पूर्ण प्रेम आहे असं दर्शवलं ! बिचारा जाधवराव तो ! त्यानें प्रेमानें वेडावून जाऊन सुभेदार साहेबांच्या मोहोरेचा किल्लेदाराला दिलेला खलिता

तसाच तेथें टाकला । मग काय ! " लिंबाजीला रातोरात निपाणी किल्ल्यावर नेऊन तेथें अटकेंत ठेवावा " अशा प्रकारचा मजकूर वाचतांच तो लखोटा माधवरावाच्या घरीं पोंहोंचवून रातोरात रस्त्यांतच मला सोडवलं ! व त्या दिवशीं " वीरसेन महाराजांस उदयीक देहांत शासन देण्याचं ठरलं आहे, " हीही बातमी मला कळवून त्यांच्या सुटकेकरतां लागणारीं सर्व साधनं मला दाखवून त्यांची ताबडतोब सुटकाही मजकडून करवली । आज तब्बल वर्षं एकसारखा तुरुंगांत असल्यामुळें माझ्या हातापायांतली शक्ति कशी अगदीं क्षीण झाली आहे! एकदा दैवानें प्रतिकूलता दाखवली कीं तें प्रतिकूळच व्हायचं ! पण एकदां का त्याच्या उलट झालं कीं सर्वच अनुकूल! सुटका झाल्यापासून आज इतके दिवस अशा वेषानें शहरांत हिंडतों आहे, परंतु कांहीं भीति झाली नाहीं किंवा त्यासारखं कांहीं घडलंही नाहीं! उलट काल संध्याकाळीं विषयीरावानें घातकीरावाला लिहिलेलं पत्र अल्प श्रमांनींच हातीं लागल्यामुळें आज वडनी साहेबांचीही गांठ पडण्याचा आनंदकारक प्रसंग आज आला! काय चमत्कार पहा । वास्तविक तें पत्र माझ्या हातीं लागण्याचा कांहीं संभव नव्हता! परंतु पत्र घेऊन जात असतां त्या लोकांना चंद्रिकेचंच नाव घेऊन बोलण्याची बुद्धि कां व्हावी! व तीही भर रस्त्यांत! रात्रीचा समय असल्यामुळें त्यांचा पाठलाग करून

त्यांना मी आडगल्लींत गांठलं! तितक्यांतूनही ( तलवार काढून ) या वयाचा सपाटा कांहीं विलक्षण आहे! हिचं दर्शन होतांच हूंचूं काहीं न करतां त्यांनीं मला सर्व हकीगत सांगून हें पत्रही माझ्या स्वाधीन केलं! ( किंचित् थांबून ) अरे! पण मी असा विचार करीत काय राहिलों! इतक्यांत जर तो दुष्ट घातकीराव आला तर भलताच प्रसंग येईल! कारण ही बातमी त्याला ठाऊक नसेल अशा समजुतीनें जरी विषयीरावानें तें पत्र त्याला लिहिलं होतं; तरी चंद्राननेनें काढलेल्या शोधावरून अख्तरशाहाच्या गुप्त कामगारांनीं चंद्रिकेला धरून या वाड्यांत ठेविली; व पुढें तिची व्यवस्था लावण्याकरितां घातकीरावाला आजच हुकुम मिळाला आहे असं समजतं! व त्या लोकांनींही असंच त्यांनाही समजल्याबद्दल मला कळवलं आहे! तेव्हां आतां विलंब लावूं नये! अगोदर बइनी साहेबांना ज्या वाड्यांत कोंडून ठेवलं आहे म्हणून त्यांनीं मला सांगितलं त्याचा शोध करावा ! ( इकडे तिकडे फिरून व पाहून ) हाच बरं तो वाडा ! आणि हाच तो प्रचंड पिंपळाचा वृक्ष ! वा ! हीच ती विहीर ! असो. आतां अगोदर चहूंकडे फिरून पाहिलं पाहिजे ! नंतर मग कुलपावर हल्ला ! !

( जातो. )

**चंद्रिका**—मी म्हणतें घातकीरावासारखा एखादा जरी फिरला, तरी बाकीच्यांना अकला होत्याना !

अग अशांना क्षत्रिय कसं म्हणावं ! यांना पशु म्हटलं तर चांगलं शोभेल ! ज्यांना अपपरभावाचा विचार नाहीं ते कसले क्षत्रिय ! चाली फिरल्या, रीती बदलल्या, ईश्वरावरची श्रद्धा उडाली ! काय उरलं काय ! मी म्हणतें यांची एक तशी स्थिति झाली असेल ; पण मेल्यांनीं आपल्या बरोबर आपल्या बायकांसुद्धां बिघडवल्या ! [ संतापून ] हा मेल्यानों ! ऐक्य, स्वामिभक्ति, देशाभिमान हीं सर्व एकदमच कशीं तुमच्यामधून नाहींशीं झालीं !

**सुशीला**—वहिनीसाहेब, आपण खरोखर बडबडूं लागलां !

**चंद्रिका**०—काय ! मी बडबडूं लागलें म्हणतेस ! अग वेडे, राजकुलांतल्या कोणत्याही मनुष्यानें म्हणजे विनाकारण बडबड केल्याचें ऐकलं आहेस कां ! पण सुशीले, आतां मुळीं जगण्याचीच आशा उरली नाहीं ! ( ऐकलेंसें करून ) अगबाई ! आतां मात्र खरोखर मरण जवळ आलं ! ( पडद्यांत ' खड खड ' असा अवाज होतो. भांबावून ) कोणी दार उघडलं ! कोणी आलं ! संपलं वरं आपलं आयुष्य [ मुलाला पोटाशीं धरून व गहिंवरून ] बाळा तीव्रसेना, खरोखर ही तुझी आई नव्हे ! जन्मापासून तुला दुःख देऊन अखेर तुझा अंतही आपल्या डोळ्यांदेखत पहाणारी ही निवळ कैदाशीण आहे ! माझ्या पेक्षां कैकयी देखील बरी ! ( दुःखानें मुलाला

पुढे करून ) सुशीले, आतां हा तीव्रसेन तुझा असं मान ! तूंच त्याची आई ! माझ्या मागें त्याचं रक्षण करणं तुझ्याकडेच आहे ! मी येतें बरं आतां ! [ पदरा खालीं लपवलेलें शस्त्र काढून ] बाबा, तूं आतां कोणाची वाट पहातोस ! ( भांबावून ) बाळा तीव्रसेना ! पण आतां तूं सुशीलेचा झालास !

तीव्र०—( तिच्या कंबरेस मिठी मारून ) थांब थांब ! आई, आधीं तें शस्त्र माझ्याच हातीं दे ! आई मीच नव्हे का पायगुणाचा ! मी गर्भांत होतों तेव्हांपासून असे हाल व विपत्ति तुम्हाला भोगाव्या लागत आहेत ! तेव्हां मीच कांटा ! मलाच प्रथम दूर केलं पाहिजे ! ( रडत रडत ) नकोग नको ! आई मी तुला कधीं असं करूं देणार नाहीं !

चंद्रिका—( त्याचें चुंबन घेऊन ) बाळा, मी कुठें जात नाहीं बरं ! क्षणभर डोळा लागला तर पहातें ! ( शस्त्र घेऊन ) अरे बाबा, असा थांबलास कां ! पण छे ! मला पक्कं ठाऊक आहे कीं तूं असं कधीं करणार नाहींस ! पण हा मेला माझा हातच तुला पुढें येऊं देत नाहीं, त्याला तूं तरी काय करणार ! सुशीले, संभाळ बरं ! ते मांग यायच्यापूर्वींच माझे डोळे मिटले पाहिजेत ! आलेच वाटतं कोणी ( असें ह्मणून जांबिया उरांत मारून घेण्याकरितां उगारते इतक्यांत सुशीला व शिवाजी येऊन ते धरतात. )

लिंबाजी--काय हें वइनीसाहेब !

चंद्रिका--काय ! मला वइनीसाहेब ह्मणून कोणी हाक मारीत आहे ! शब्द तर ओळखीचासा दिसतो ! पण देवा ! या हतभागिणीला सुशीले शिवाय ' वइनीसाहेब ' म्हणणारं कोण उरलं आहे !

लिंबाजी--नाहीं का ! वर पहा ! हा आपला गरीब चाकर लिंबाजी आहेना आपल्याला 'वइनीसाहेब' ह्मणणारा!

चंद्रिका--कोण लिंबाजी !

लिंबाजी--तोच मी आपला नम्र सेवक !

चंद्रिका—( हंबरडा फोडून ) लिंबाजी तिकडची काय वाट ! तुम्ही दोघे एके ठिकाणीं ना होतां ! मग तूं आलास नि येणं कसं नाहीं झालं ! सांग सांग ! आज इतक्या वर्षांत माझ्या डोळ्यांना खळ नाहीं तो आतां तरी पडूं दे ! मुलाला तरी नजरेस पडूं दे !

लिंबाजी—( मुलाला जवळ घेऊन ) वइनीसाहेब, आपण अगदीं दुःख करूं नका ! सरकार हल्लीं सुस्थळीं असून सुरक्षित आहेत ! त्यांची व आपली लवकरच भेट होईल ! परंतु वइनीसाहेब, आपण आधीं या ठिकाणाहून उठा ! कारण तो दुष्ट, येथें येण्याचा संभव आहे !

चंद्रिका—लिंबाजी, पण जायचं कुठे !

लिंबाजी—सरकार, वेळ घालवण्यांत अर्थ नाहीं!

पलिकडच्या दालनांत आपल्याला घालण्याकरितां मी मर्दानी पोषाख ठेवला आहे, तो घालून आपण आधीं या वाड्याबाहेर पडा! मी आपल्याला सुस्थळीं नेतों!

**चंद्रिका**—पण बाहेर पहारेकरी निजले असतील ना!

**शिवाजी**—ते हल्लीं असह्य निद्रा घेत आहेत! चला आपण!

(जातात)

**प्रवेश दुसरा समाप्त.**

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ**—नगर खेड्यांतील एका भिक्षुकाचें घर.

[ भिक्षुक व त्याचा मुलगा प्रवेश करितात ]

**भिक्षु०**—(मुलास) अरे विनू, तूं असा खिन्न कां?

**मुलगा**—बाबा, मी कुठें तरी दूर जातों म्हणजे कांहीं जुळलं तर जुळेल!

**भिक्षु०**—अरे बाबा, दूर जाऊन काय करणार? नशीबीं आहे तें कांहीं केल्या चुकत नाहीं! येथेंच राहून काय मीठ भाकरी मिळेल ती आनंदानें सर्व जण एके ठिकाणीं खाऊं म्हणजे झालं!

मुलगा–तिसरगडच्या दुमालदारांची जाऊन गांठ घेतों व माझी सर्व हकीगत त्याला कळवून, माझा इतका इतका विद्याभ्यास झाला आहे असं ह्मणून माझ्या जवळच्या सर्व सनदा त्याच्या पुढं ठेवतों! मग जें व्हायचं असेल तें होईल! बाबा, तुह्मी मला "लां-ब जाऊं नको" ह्मणून म्हणतां याचा अर्थ काय! या अशाच समजुतीमुळं राष्ट्राची खराबी होत चालली! व म्हणूनच हल्लींचा ही स्थिति आपण अनुभवीत आहों! हेच मुसलमान जर इतक्या लांबून येथें आले नसते; व त्यांना दीर्घ प्रयत्न करण्याल उत्तेजन मि-ळालं नसतं; तर हल्लींप्रमाणें त्यांचं दैव उदयाला येऊन इतकं सौख्य त्यांना कधींच मिळालं नसतं!

भिक्षु०–अरे विसू, तूं म्हणतोस तें खरं! पण तूं थोडासा वेडा आहेस! लोकांची स्थिति पहा म्हणजे तुझ्या तत्काळ लक्षात येईल! अरे बाबा, हल्लीं असं आहे कीं, 'द्रव्येण सर्वे वशाः' समजलास! अशी जे-थें स्थिति आहे तेथें विनाकारण वलवल करण्यांत काय बरं अर्थ आहे! नाहींतर याहूनही आणखी एक साधन आहे; त्याच्या आडून जो प्रयत्न करील तो रंक असला तरी देखील राव होईल!

मुलगा–असं कोणतं बरं साधन तें बाबा!

भिक्षु०–तें सांगण्यासारखं नाहीं! तूं अजून पोर आहेस! थोडे दिवस जगांत उठूं बसूं लागलास व

व्हवहारांतले सर्व व्यापार करूं लागलात म्हणजे तुला तें आपोआप कळेल!

[ इतक्यांत एक वैरागी प्रवेश करितो ]

**बैरागी**–(आपल्याशीं) धिक्कार! धिक्कार असो मला! अरे मी राजपुत्र! आणि बैरागी होऊन कुत्र्याप्रमाणें दारोदार फिरतों आँ! पारध्याच्या भीतीनें ज्याप्रमाणें श्वापदं कोठें तरी निवाऱ्याचं स्थान पाहून लपून बसतात; त्याप्रमाणें "मला कोणी पाहील का! इतक्यांत मला कोणी येऊन धरील का!" अशा भीतीनें हा बैराग्यांचा वेश घेऊन जेणेंकरून गुप्त रीतीनें रहातां येईल अशी सोय पहाण्याचं कपाळीं यावअं! केवढी भयंकर स्थिति ही! राज्य गेलं! वडलांचा नाश झाला! एक स्नेही तोही नाहींसा झाला! एकंदरींत आज मी निराधार, निराश्रित, एकटा, सर्वस्वी नाश पावून एकट्या दैवावरच हवाला ठेवून फक्त एका विश्वासु चाकरासह असा भटकूं लागलों! (रागावून) अरे गाढवानों! तो युद्धप्रसंग अगदीं विसरलांना! त्यावेळीं तुह्मी वाहिलेल्या शपथा व दिलेलीं वचनं सर्व नाहींशीं झालीं का! अहो वेणकर! अहो! नळदुर्गकर! अहो नयकर! तुम्ही जिवंतच आहाना अरे अरे अरे! मी तर तुमची जीवनन्मृतांत गणना करितों! तुमचा क्षात्र धर्म बुडाला का! ( किंचित् थांबून व ओंठ आंवळून ) या घातकीरावाचं स्मरण झालं

कीं, सर्वांगाची कशी लाही होते! गुलामाला पहातां-क्षणींच उभा जाळूं कीं काय असं वाटतं! गुलामा! तुला बाबांनीं लहानाचा थोर केला! तुझ्या कुटुंबाचं पोषण करून तुम्हाला उच्च स्थितीला आणलं त्या सर्वांचे असे उपकार आं! केवढा अधम निर्लज्ज दुष्ट चांडाळ हा! ( किंचित् थांबून ) काय अवस्था ही! अवस्थे, शिकस्त आहे तुझी! तुझी गति कोणत्या ठिकाणीं कशा प्रमाणानें वक्र होईल हें कांहीं सांगतां येत नाहीं। ( दीर्घ श्वास सोडून ) काय हा प्रकार! राज्यातल्या एका क्षुल्लक मनुष्यानें अशी दुर्दशा क-रून अन्नान्न करायला लावावं मला! (संतापून ) वीरसेना ! गुलामा, या पेक्षां जन्मून पशु झाला असतास तर फार ठीक झालं असतं ! एका साठ घट-काच्या आंत आई, बाप, बायको, राज्य, स्नेही या सर्वांपासून पराङ्मुख ! बेशरम ! बेअक्कल ! खरोखरच असं! गाढवा, तुला लाज कशी नाहीं वाटत ! जरी आपल्यावर प्रसंग आला, तरी सिंह छावा कधीं निमुटपणें हार गेला आहे कां ! तूं सिंह छावाच नव्हे-स! बापाच्या पोटीं कुलांगार जन्मलास! अहो लो-कहो ! याचे कोणी कान तरी उपटा ! याला चांगला डागा तरी! याच्या तोंडावर थुंका ! म्हणजे तरी याला कांहीं शरम वाटली तर वाटेल! केवढा अधम! परमे-श्वरा ! अशाचा या जननीला विनाकारण भार तरी का देतोस ! अशाला राजकुलांत व्यर्थ जन्म दिलास!

इकडे तिकडे फिरून ] अरे ! हें काय ! मी अ-गदींच बहकत चाललों ! खरोखर या जगांत मन व त्यांत येणारे विचार या सारखं अनिवार्य दुसरं कांहीं-नाहीं! असो! आतां वेषाप्रमाणें भिक्षा मागून रहाण्याची सोय पहावी! वीरसेना, तुला रहाण्याची सुद्धां पंचाईत पडावी अँ! त्या ठिकाणाहून सुटलों तो सुद्धां एका स्त्रीच्या सहाय्यानें! बस्स! नशीब ह्मणजे कांहीं चमत्कारिक आहे! (इकडे तिकडे फिरून व पाहून) हा ब्राह्मण बरा गरीब दिसत आहे! याच्याच येथें रहाण्याची सोय झाल्यास पहावी! ( पुढें होऊन ) महाराज, कुच चावल आटा मिलेगा? नहीं तो मेरेकू वो भी आस नहीं! लेकिन आप जो एक रात बस्ती करनेके वास्ते जगा देवेगे तो भगवत् तुमारा भला करेगा!

**मुलगा**—( आपल्याशीं ) हा बैरागी मोठा सज्जन दिसतो! ( उघड ) बाबा, तो जर खायला प्यायला कांहीं नको ह्मणून ह्मणत आहे, तर राहीना एक रात्र!

**भिक्षुक**—हो! अन् रात्रीमध्यें मारीना हात! आपलं काय! उजाडतांच दंड थोपटून बापाच्या उरावर बसायला तयारच! मिळवायची अक्कल नाहीं कवडीची! आणि ह्मणे राहीना एक रात्र! ( बैराग्यास ) बाबारे, आमच्या घरीं कांहीं सोय नाहीं! सरकारांनीं धर्मशाळा बांधून ठेवल्या आहेत त्यांत जाऊन खुशाल उतर!

**वैरागी** —( एक मोहोर पुढें करून ) महाराज, ये अपने जगेका मोल लेव ! लेकिन जरा टीकनेके वास्ते थोडी जगा मेरेकू देना ! मेरेपर कुच वख्त आया है इसवास्ते मैने ये बेस लिया है ! [ मोहोर देतो. ]

**भिक्षु॰**—( मोहोर हातांत घेऊन व पाहून ) हा कांहीं निराळाच वैरागी दिसतो! बरं द्यावी जागा ! जागले एक रात्र ! मग काय करतां ! मोहोर तर मिळते !

**मुलगा** —( आपल्याशीं )' द्रव्येण सर्वे वशाः ' ही म्हण आतांच बावांनीं सांगितली ! व त्याचा अनुभवही पण आतांच्या आतांच व आमच्याच घरीं येत आहे !

**भिक्षु॰**—( वैराग्यास ) रहा पण या ओसरीवरून इकडे तिकडे जातां कामा नये !

**वैरागी**—भगवत् तुमारा भला करे !

( पडदा पडतो )

**प्रवेश तिसरा समाप्त.**

---

## प्रवेश चवथा.

**स्थळ**—आडरान

[ **वैरागी** वेषधारी **चंद्रसेन** प्रवेश करितो ]

**चंद्रसे॰**—( आपल्याशीं ) क्षयाची भावना हो-

ऊन एकदां मनुष्याची व अंथरुणाची गांठ पडली ह्मणजे मग तो त्या दुखण्यांतून उठून पुन्हां हिंडूं फिरूं लागणं ह्मणजे फार करून कठीण ! तद्वतच आमची हल्लीं स्थिति झाली आहे ! आणि हेंही वास्तविकच आहे, कीं एकवार रसातळाला जाऊन मिळालेली वस्तु पुन्हां उच्च स्थितीला येणं म्हणजे अशक्यच ! तथापि "सुखा मागून दुःख व दुःखा मागून सुख" असं हें रहाटगाडगं नेहमीं चालायचंच असं मनांत आलं ह्मणजे मात्र किंचित् आशा उत्पन्न होते ! काय ही आमची स्थिति ! आज इतकीं वर्षं झालीं, आशा धरायला आधार असं कांहींच दिसत नाहीं ! जिकडे जावं तिकडे अमावास्येचाच अंमल ! चंद्रोदय म्हणून नाहींच! शिव शिव ! वीरसेनाचा खरा वृत्तांत कांहींच समजत नाहींसा झाल्यामुळें माझं मन कसं उदास झालं आहे ! त्याचा कोठेंच थांग लागत नाहीं! कोणी तो तुरंगांत आहे म्हणून सांगतात! परंतु तेंही खरं वाटत नाहीं ! कारण कोणी तो व लिंबाजी नुकतीच आपली चमत्कारिक रीतीनें सुटका करून गेले असं सांगतात! बरं! "त्या ठिकाणाहून आपली सुटका करतेवेळीं लिंबाजीनें घातकीरावाचे फार हाल केले; व त्याला तेथेंच बांधून ठेवला; ह्मणून घातकीरावानें उभयतांसही पुन्हा गुप्त रीतीनें पकडून आणून नुकतेच पाळो-

कालाही पाठवले!" असंही कोणी सांगतात! तव्हां यांतून आतां मी खरं असं काय समजावं! हर हर! माझी व माझ्या लाडक्या **चंद्राननेची** जर यावेळीं गांठ पडती तर तिनें मात्र सर्व वृत्तांत मला कळविलं असता! परंतु तें तरी कशावरून! कारण इतकीं वर्षं ती तशीच राहिली असेल का! (किंचित् थांबून दुःखानें) शिव शिव! **विषयीराव** हा सर्वच दोष तुझ्याकडे आहे बरं! तूं जर इतक्या गोष्टीला प्रवृत्त झाला नसतास व तुझ्यावर सोंपवलेल्या कामांत दगलबाजी केली नसतीस, व लष्कराला योग्यकाळीं योग्य वस्तूंचा पुरवठा केला असतास, तर त्या चांडाळानें आणखी लाखों जरी खटपटी केल्या असत्या तरी त्या चालत्याना! परंतु आतां त्याचं काय! परमेश्वरा! **वीरसेन** महाराजांची व माझी कशाही प्रकारें भेट होवो इतकंच तुझ्याजवळ मागणं आहे! कारण राज्यप्रकरणाच्या बाबतींत पुन्हां मनही घालूं नये असं हल्लींच्या या लोक स्थितीवरून मला वाटूं लागलं आहे! आतां आह्मी उभयतांनीं एकत्र राहून सदैव ईश्वर चिंतनांतच काळ घालवावा हें उत्तम असं मला वाटत आहे! अहो! इतर राष्ट्रांची स्थिति मी पहातों, केवढं अंतर! त्यांच्यांत व हल्लींच्या आमच्या या क्षत्रिय ह्मणवून घेणाऱ्या लोकांत जमीन अस्मानाचा फरक! इतर राष्ट्रांतल्या लोकांत एकी केवढी! स्वराजनिष्ठा काय! स्वातं-

ऱ्याचा अहंपणा किती! त्यांच्या लक्षांश तरी हल्लीं यांच्यांत आहे का! अहो, क्षुद्र जंतूंना देखील स्वातंत्र्याचा अभिमान असतो! आणि यांनातर मुळींच नाहीं! प्रत्यक्ष आपला राजा नष्ट झाला, आपलं राज्य गेलं, आपण सर्वस्वी नागावले जाऊन अन्नाकरितां दीन होऊन दुसऱ्याच्या तोंडाकडे पहात बसण्याची आपणास पाळी आली; व आपण परावलंबनाच्या विकट व्यूहांत पडलों, अशी अनिवार्य व दुःखद स्थितीत झाली असतां राज्यकारणी व क्षात्र धर्माचा अभिमान बाळगणाऱ्या विरांनीं मुद्दाम मौन स्वीकारलं आहे ही शरमेचीच गोष्ट नव्हे का! अहो! मुसलमानांनीं कसकशी नासधूस चालवली आहे इकडे लक्ष न देतां उलट ऐषआराम, चैन व नेहमीं विषय सौख्य या गोष्टींकडे प्रवृत्ति वाढत चालली! आपलं तें वाईट व दुसऱ्यांचं तें चांगलं असं वाटूं लागलं! अत्यंत नीच—केवळ शास्त्रानेंच नव्हे, परंतु त्याच्या परिणामावरून देखील नीच—अशा सुरापानाचा जबरदस्त अमल यांच्यावर बसला! धर्माधर्म विचार नाहींसा होत चालला! त्यांचा 'खुदा' हें नांव सोडून नुसतं "देव" हींच अक्षरं तरी मुखावाटे काढण्याकडे कधीं कल झाला आहे का! सायंकाळीं सूर्यास्त होतांच कोणत्याही ठिकाणीं कशाही उद्योगांत असतां गुडघे टकून परमेश्वराचा स्तव करण्याचा क्रम कधीं तरी बंद पडल्याचं कोणी पाहिलं किंवा ऐकलं असेल

का! दुःखानें) सत्यासत्याचा भेद तर नाहींच उरला! ज्या स्त्रियांकडे पाहिलं असतां पापवासना धरून आलेल्यांस देखील उपरति होऊन त्यांच्या मनांत पूज्य बुद्धि उत्पन्न होत असे; त्या स्त्रिया इतक्या बेफाम व इतक्य निर्लज्ज बनल्या! व " आह्मी अशा बनतों याला कारण पुरुषच असं धडघडीत प्रपादूं लागल्या! व हें खरेंही आहे! व्यभिचारादि अनन्वित कृत्यं करणं ह्मणजे त्यांत कांहीं नाहीं असं त्यांना वाटूं लागलं! आणि हा सर्व प्रकार गोषांत ठेवण्याचं अनुकरण आह्मी करूं लागल्यामुळें! काय हें! केवढा अविचार हा! परमेश्वरा! असल्या स्थितींत ठेवून इतरांनीं 'छी थू' करावी, यापेक्षां मोठमोठे अनर्थापात आणून सर्व देश धुळीला कां नाहीं मिळवीत नद्यांच्या जागीं पर्वत, पर्वतांच्या जागीं नद्या व मनुष्यांच्या जागीं पत्थर अशी भयंकर व्यवस्था कां नाहीं लावीत! असं पूर्वींच केलं असतंस तर इतका दुःखकारक प्रसंग येऊन त्याबद्दल खेद करीत बसण्याची पाळी कधींच आली नसती! अरे, असे तुह्मी पशु-कसेरे झालां? तुमच्या सर्व अकला गेल्या तरी कुठे? हर हर! केवढा अविचार हा! निंद्य! अति निंद्य! अत्यंत निंद्य असं हें तुमचं आचरण पाहून इतर लोक तुह्माला हंसतात, तुमची निर्भर्त्सना करतात, आणि तुमच्या या मूर्खपणाबद्दल तुमच्या तोंडांत शेण घालतात; त्याचं तुम्हांला कांहींच नाहींना वाटत!

( इकडे तिकडे फिरून ) असो! जशी तुमची इच्छा! याच गोष्टींकडे लक्ष देऊन जर मी स्वस्थ बसेन व पुढें मनांत आणलेले सर्व चार एकीकडे ठेवीन तर कसं चालेल! मला तर माझं कर्तव्य केलंच पाहिजे! माझ्या प्रयत्नाला कांहीं तरी फळ येईलसं दिसतं! त्या **यमाजी** नायकानें माझ्या सर्व गोष्टी कबूल करून मला अंतःकरणपूर्वक मदत करण्याचं कबूल केलं आहे! (समाधानमुद्रेनें) अहाहा! तसं जर घडून येईल, तर या मुसलमानांचा क्षणांत चूर करीन। असो आतां अगोदर **वीरसेन** महाराजांच्या शोधाची तजवीज केली पाहिजे! बरं कबूल केल्याप्रमाणें त्या यमाजी नायकालाहि भेटावं! परमेश्वरा! तूं दिनांचा दयाळु आहेस! तुझ्या ठिकाणीं अन्यायाचा लेशही नाहीं! ह्मणून या कामी तुझं मला सहाय्य दे! असो! सावल्यास चंद्राननेचीही भेट घ्यावी! अहाहा! सखे, तूं पूर्वीप्रमाणेंच अद्यापही जर शुद्ध असशील तर खरोखर हेंच आमच्या भाग्यो-दयाचं चिन्ह खास असं मी समजेन!

( जातो. )

**प्रवेश चवथा समाप्त.**

---

## प्रवेश पांचवा,

स्थळ —आडरान.

[ पुरुष वेषधारी **चंद्रानना** प्रवेश करिते. ]

**चंद्रान॰**—देवा! मी काय हें मनांत आणून नि-

घालें ! ज्याप्रमाणें माझ्या मनांत आहे तसं घडू येईल का ! माझी व तिकडची भेट होईल का अथवा या साहसपणाबद्दल मला दोष तर नाहींना तिकडून मिळणार ! पण महाराज, मी तरी काय करूं ! मला या सर्वांचा कसा अगदीं वीट येऊन गेला! आपल्यावरचं प्रेम व स्वराज्याविषयीं आवड या दोन गोष्टींनीं मला असं करायला लावलं ! माझ्या कर्तव्याप्रमाणें चंद्रिकाबाईसाहेबांची, लिंबाजींची व वीरसेनमहाराजांची सुटका करण्याच्या कामीं मी केलेल्या प्रयत्नाला यश आलं ! या कामीं क्षणभर जाधवरावांशीं मला वरकांतीं प्रेम आहे असं दाखवावं लागलं! इतकंच मात्र माझ्या हातून घडलं ! महाराज, माझं आपल्यावरचं प्रेम जसं कायम आहे, तसंच आपलंहीं कायम आहेना ! अथवा हें काय मी मनांत आणतें ! मनुष्य दुःखांत असलं ह्मणजे त्याला काय बरं सुचणार ! खरंच दादा, तूं जर त्या वेळीं फितुरी केली नसतीस, तर आजची ही अशी स्थिति कधीं तरी आली असती का ! आपल्या हातानें आपल्याच घरावर विस्तव कसा ठेवलास ! किती नीच कृत्य हें ! देवा, अशा ठिकाणीं मला जन्म देऊन अशा नीचाची बहीण होण्याचं कशाकरतां माझ्या कपाळीं घातलंस ! अरे दादा, ज्यांना ज्यांना ह्मणून पूर्वीच्या स्वातंत्र्याचं स्मरण आहे, ज्यांनीं ज्यांनीं म्हणून त्या वेळचं थोडं तरी सुख अनुभवलं आहे, त्यांना त्यांना या तुझ्या

कृत्याबद्दल फार संताप येत असेल ! बरं त्यानें एक तसं केलं ! पण सर्वांना तर नव्हतना त्यानें आपल्या- सारखं करायला शिकवलं ! सर्वांनीच कसा ताळ सो- डला ! मेल्यांनो तुमच्या सुद्धां अकला कुठें गेल्या ! तुमची स्वामिभक्ति कशी नाहींशी झाली ! स्वराज्या- च्या ठिकाणची तुमची निष्ठा काय झाली ! सगळाच कसा बाई कसायांचा बाजार बनला ! तुम्हाला आ- पलं काय हरवलं आहे हें कसं कळत नाहीं ! तुमच्या इथलं लज्जेचं चिन्हाड अस एकाएकींच कसं उठलं ! मेल्यांनो, विद्वत्तेचा, शहाणपणाचा आणि अकलेचा तोरा मात्र मिरवतां! पण यापैकीं एक गुण म्हणजे तुमच्यांत खरा आहे असं कधीं प्रत्ययाला आलं आहे का ! तुमच्या या पुळपुळीत बडबडीनें आणि या पोकळ विचारांनीं तुम्ही आपल्याला अधिं- कच संकटांत नाहीं कां पाडीत ! इतरांनीं तुम्हाला जरा फूस दिली पुरे ! म्हणजे ग तुम्हीं वाटेल तसे नाचूं लागतां ! आपण रस्त्यानें चाललों असतां एका- एकीं वादळ होऊन एखादं घर कोसळून आपल्या अंगावर पडलं, व त्या खालीं आपण सांपडलों अशा वेळीं दुसऱ्याचं सहाय्य घेऊन त्यांतून सुटका करून घेण्याचा विचार सोडून त्या धांदलींत आपल्या डोक्यावरील पडलेली पगडी हुडकण्यांत अथवा आ- पल्या अंगावर झालेल्या जखमांबद्दल कष्टी होण्यांत मर काळ घालवला तर काय होईल! आपला अमूल्य

जों प्राण त्याला नाहीं का आपण मुकणार! त्याचें प्रमाणें आपणावर आलेल्या स्थितीबद्दल विचार न करतां भलत्याच गोष्टी केल्या असतां होणार आहे! तुम्ही चालू क्रमच जर कायम ठेवाल, तर गळगळीत कांच-पात्रांत पडलेला ढेंकूण जसा वर येण्याच्या विचारानें त्यांतच घोंटाळत राहून अखेर प्राणासही मुकतो, तशीच तुमची अवस्था होणार आहे! म्हणून म्हणतें मेल्जांनो, तुम्हा आपले विचार निःसत्व गोष्टींकडे लावूं नका! (इकडे तिकडे फिरून) पण मी आतां जाणार कुठें! कुठें महाराज भेटतील मला! (पाहिल्या सें करून) अगबाई! हें कोण येत आहे इकडे! (नीट पाहून) हा तर मेला विषयीराव! पण हा काय चमत्कार! यानें असा बैरागी वेष कां घेतला!

(इतक्यांत विषयीराव येतो.)

**विषयी०**—(आपल्याशीं) धिक्कार! धिक्कार असो या दुष्ट वासनेला! व ती धरणाऱ्या मजसारख्या अधमाधमाला!! (दीर्घ श्वास सोडून) वा! घातकीराव! तुझी संगत फार चांगली असं मला आतां वाटूं लागलं! तिऱ्हाइताला मदत करवलीस ॲं! गुलामा, फितुरीपणानें सर्व देशाची, राष्ट्राची, राजाची, प्रजेची व आपल्याबरोबर माझ्याही स्वामिभक्तीची खराबी खराबी करून टाकलीस ॲं! जगन्माता सर्वांची स्वामिणी जी चंद्रिका तिच्या विषयीं मला मोह उत्पन्न करून लोकांत तोंड का-

ढायला सुद्धां जागा नाहीं ठेवलीस ! गुलामा, त्यांत देखील महत्वाकांक्षा व अपलपोटेपणा ! " कुसंगाचा परिणाम वाईट " असं जें ह्मणतात तें खोटं नाहीं ! प्रत्यक्ष मातोश्रीकडेच मी पापदृष्टीनें पहात होतों ! काय म्हणावं या कामवासनेला ! केवढा पातकी मी ! घातकीराव जातीनें घातकी खरा ! परंतु तसा बनून आपल्याला असलेल्या माहितीचा व अधिकाराचा उपयोग करून प्रत्यक्ष जामदारखान्यावरच हल्ला करायला मदत करणारा मी किती नीच व घातकी! केवढा अधम मी ! वीरसेन महाराज, आपण तुरुंगांतून सुखरूपपणें सुटून गेलां खरे ! परंतु अल्लतरशहाच्या मरणानंतर जो नवीन सुभेदार आला आहे तो फारच दुष्ट आहे ! तो तर " क्षत्रिय ह्मणवून घेणारीं रजपूत घराणीं निखालस जमीनदोस्त करावीं " असं म्हणतो व आपल्या शोधाचीही त्यानें जबरदस्त तजवीज चालवली आहे ! महाराज, परमेश्वर आपल्याला असाल त्या ठिकाणीं सुरक्षित राखो व एकंदर या सर्व दुष्ट कृत्यांबद्दल त्या चांडाळाचा सूड घेण्याची उत्कट इच्छा व बळ तुह्मांस देवो ! महाराज, या वेळीं माझी सर्व धुंदी उतरून जाऊन माझ्या अंतःकरणांत पुरा प्रकाश पडला ! आतां मला आपलं दुर्लभ झालेलं दर्शन व मृत्यु या शिवाय कशाचीही इच्छा नाहीं ! ( इकडे तिकडे फिरून ) असो, आतां

गत गोष्टींचा विचार न करतां महाराजांच्या शोधार्थ फिरावं ! [ इकडे तिकडे फिरतो ]

चंद्रान०—( आपल्याशीं ) आपले दुष्ट हेतु साधले नाहींत म्हणून या वेषानें तरी बाहेर पडून चंद्रिकेचा शोध लागल्यास पहावा अशा हेतूनें तर यानें हा असा वेष घेतला नसेलना ! देवा ! तुला संकट असूं दे ! त्या साध्वीच्या पातिव्रत्य भांडारावर या नीच चोरांचा हात पडूं देऊं नको, इतकंच तुझ्यापाशीं पदर पसरून मागणं आहे ! ( किंचित् विचार करून ) आतां कसं बरं करावं ! मी हा पुरुष वेश घेतला आहे, आतां याला मी स्त्री आहें अशाबद्दल मुळींच संशय येणार नाहीं ! तेव्हा आतां याला " आपण कोण, कुठून आलां, जायचं कुठें, " हें विचारून " असा हा वेष कां घेतला " असंही विचाराव ! म्हणजे हा त्यावर काय जें उत्तर देईल त्यावरून समजेल ! आतां याच्या जवळ वेषाप्रमाणेंच भाषेचाही उपयोग केला पाहिजे ! ( जवळ जाऊन उघड ) महाराज, आप कौन हो ? आपका पेहला धाम कोनसा था ! आप जाते कहां, आये कहांसे और अपने ये जोग किससबबसे लिया है ये सब मेहेरबानीसे एकदफे मुझकु कहीये !

विषयीं०—( आपल्याशीं ) हा कोणी पठाण दिसत आहे, याला आपली खरी हकीगत सांगायला काय हरकत आहे ! अथवा नको ! भलत्याच एखाद्या

प्रसंगांत पडण्याची पाळी यायची ! ( विचार करून व पाहून ) नाहीं ! पण तसा कांहीं प्रकार दिसत नाहीं ! याच्या चेहऱ्यावरून, भाषणावरून व एकंदर सर्व दर्शीवरून तसा कांहीं प्रकार दिसत नाहीं ! मला तर निराळाच संषय येतो ! तसं तर नसेलना ! अहाहा ! परमेश्वरा, माझा संषय जर खरा ठरेल व हे **वीरसेन** महाराजच जर खास असतील, तर आज तूं मला धन्य केलंस असं मी समजेन ! अंधाला ज्याप्रमाणें एकाएकीं दिसूं लागावं तसं मी मानीन ! बाकी हा कुलीन असावा याविषयीं तर खात्री झालीच ! ( उघड ) आजि साहाब, मै एक गरीब हूं ! बदबख्तीसे मैंने ये जोग लिया है ! क्या करना ! वैसा वख्त है के छोकरा माकु समजता नहीं, दोस्त दोस्तकू मानता नहीं जिधर देखे उदर सब् बेमान लोक भरे है ! अच्छा कोनसा और बुरा कोनसा ये कोइभी जाननेवाला रहा नहीं ! दिलकू चाहेसो करना वैसा वख्त है ! आप कौन हो, आपना धरम क्या है, आपना हुव्बुल वतन कोनसा, वख्त कैसा, आप करते है क्या, ये बातोंका कोई बिचारभी करते नहीं ! आपना सब राज डुबा गया और जाताभी है ये सब लोक जानते है, लेकिन डुबानेवाले बदमाष आपसमेंहि है ये कोईभी देखते नहीं ! कोई जाननेवाले है तोभी अलग बैठके चुप मजा देख रहे है

क्या कहूं ! मै बडा खराब आदमी था ! लेकिन खुदाके मेहेरसे मेरी और सब नादान लोगोंकी दोस्ती छुटी और ये बेस मैने लेकर कहां तोभी जंगलमे जहां कोई आन न सके ऐसे जगहपर जाना ऐसा मेरा इरादा है !

चंद्रान०—( आपल्याशीं ) काय ! याला आजपर्यंत केलेल्या दुराचारीपणाबद्दल पश्चात्ताप झाला ! अथवा तसं कुठून व्हायला ! यानें मला ओळखलं खास ह्मणूनच हा मेला असलीं मानभावी बोलणीं बोलत आहे ! नाहीं तर असा विरक्तपणा दाखवला म्हणजे चंद्रिकेचा सहजच शोध लागेल अशा आशेनें हा असा बहाणा तर करित नसेल ना ? बरं विचारावं आणखी ! ( उघड ) सुनो भाई आप कहते हो के आप बडे खराब अदमी थे, तो आपने ऐसा खराब काम कोनसा कीया है ?

विषयी०—( आपल्याशीं ) या पठाणाला प्रथम पाहतांच हेच वीरसेन महाराज खास असं मला वाटलं ! पण तसं नाहीं दिसतं ! याचा हा वेष कृत्रिम असून ही स्त्री असावी असं वाटतं ! अहाहा ! याच चंद्रिकाराणीसाहेब! आतां कांहीच शंका उरली नाहीं ! या त्या तुरुंग वाड्यांतूनही पळून गेल्या अशी नुकतीच वदंता उठली होती ! त्यावरून सुरक्षितपणें इच्छित स्थलीं जातां यावं म्हणून त्यांनीं हा असा वेष घतला ... ! आतां यांना खरी हकीगत सांगाया-

ला काय हरकत आहे !(उघड)आजि साहाब,मै जो सब आपकू कहूंगा तो आप मुझपर खप्पा होंगे ! इसलिये मुझे बडी शरम मालूम होती है !

**चंद्रान॰**—कुच नहीं ! मै तो आपकू मेरा भाई समजताहूं ! कहीये !

**विषयी॰**—अच्छा सुनीये ! मेरा नाम बिषयीराव ! पेहेला आपना राजा मालोजी था; उसवख्त फौजपर मै उन्का तावेदार बडा सरदार था !

**चंद्रान॰**—क्या तुम सरदार थे ?तो तुम बडे अदमी थे ! फेर कम नसीब कैसे हो !

**विषयी॰**—आईसाहेब, मी पायां पडतों मला क्षमा असावी (पायांपडतो) आईसाहेब,आपणालां ही दीन दशा आणण्याला घातकीरावाच्या संगतीनें मीच कारण झालों ! थोरले सरकार व आपले पति युवराज महाराज **वीरसेन** यांना पदभ्रष्ट करून **वीरसेन**महाराजांच्या सर्व दुःख स्थितीला कारण मीच झालों ! याच अधमानें आपल्याकडे पाप दृष्टीनें पाहिलं व आपल्याविषयीं दुष्ट वासना धरून आपला छळ केला!आईसाहेब, परावलंबन दुःखद असं मला आतां पक्कं कळून आलं ! आईसाहेब, आतां मला एकवार "क्षमा" म्हणून सांगा, [ लपवलेलें शस्त्र काढून ] व युद्ध प्रसंगीं दगलबाजानें जें शस्त्र उभयतां सरकारांवर चालवण्याकरता धांवून गेलों, तें हें घेऊन या अधमाला दुखंड करा !

**चंद्रान०**—( आपल्याशीं ) आतां मात्र याल पश्चात्ताप झाला खरा! शाबास, विषयीराव शाबास! तुला खरा पश्चात्ताप झाला! परंतु यानें मला मी स्त्री आहें असं ओळखलं! व हा मला मीच चंद्रिका असंही समजत आहे! तर याला मी तीच आहें असं दर्शवून कांहीं कालपर्यंत खरं वर्तमान कळवूंच नये! ( उघड ) शाबास विषयीराव! तुला खरा पश्चात्ताप झाला! तुला पश्चाताप झाला एवढ्यानेंच तूं क्षमित झाला आहेस! आतां तुला निराळी क्षमा नको आहे! तथापि तुझी इच्छाच आहे, तर पुढील कृत्य न करतां मी तुला जीव दान देतें! ( त्या हातांतील शस्त्र दूर टाकते ) ऊठ! मी तुला क्षमा-क्षमा केली!

**विषयी०**—( उठून ) अहाहा! आईसाहेब, या वेळीं आपला जयजयकार करायला मजजवळ कांहींच साधन नाहीं हें पाहून खेद वाटतो! आईसाहेब, आतां सदैव आपल्याजवळ रहावं व आपण कराल तो हुकूम पुत्रवत् पाळावा अशी माझी इच्छा आहे!

**चंद्रान०**—बरं विषयीराव, चला. या जवळ च्या खेड्यांत आपल्याला गेलं पाहिजे!

**विषयी०**—आईसाहेब, बाळ महाराज तीव्रसेन कोठे आहेत?

चंद्रान०—त्या खेड्यांतच सुशीला व माझा बाळ आहेत!

( जातात ).

**प्रवेश पांचवा समाप्त.**

---

## प्रवेश सहावा.

### स्थळ—रानांतील पडकें देऊळ.

[ येसबा, राणबा, वाघोजी व रामा इत्यादि रामोशी बसले आहेत तों तुक्या व जानबा येतात ]

**तुक्या**—( जानबाचा हात सोडून ) बसा जानबा!

**जानबा**—( चाचपडत ) कुनीकड र? ( सर्वेच बसतो )

**राणबा**—ये जान्या, जरा मागं व्हशील का न्हाई! एयेका हत का हाये! इचिभन ह्ये काय!

[ जानबा जागेवर बसतो ]

**वाघोजी**—का जानबा, काइ तुनुन्त चिन-तुन वडा!

**जान०**—ए तुक्या, द्ये की मर्दा!

राण०—येसबा काईबी व्हवूद्या गम्मत!

( लावणी म्हणतात )

राणबा—येसबा, आनीक व्हवूद्या यकांदी !

येसबा—अर बिव्या कालची शिकार घावती तर चेंगल उद्दार्ली असती ! मंग लावन्या लावन्या काय ! अक्शी योकावर योक उडावल्या असत्या !

राण०—तुमी येसबा असच ! समद्या कामा मंदी तुमची म्हनी अक्शी घाईच पगा ! तरी वाघुनी दादा म्हनाल व्हत कीं, हत्यारा बगार व्हनार न्हाई ! पन तुमी काय ! म्हन समद दमावर व्हत ! अन् मंग न्हाई झाल कुठ त्ये शिकार मातुर गमावली का न्हाई !

जानबा०—तुमी त्येवढ लावन्या म्हनाल नामी ! म्हंच गाडग गाडग पैस मिळल असत म्हजा नसतं नीट झालं ! अर मरद त्ये मरद ! तुमी का कराव भद्यो !

येस०—का जानबा, लयी त्वांड सोडलं हाय !

जान०—न्हाई ! मुसकं घाल आनुन !

येस०—मरद क्वान हाये त्येची परक्षाच व्हवूद्या ! आलाय लयी सूर सांगाया तत !

( इतक्यांत शीळ ऐकू येते व दार वाजतें )

वाघो०—दमा वाईच ! नाईक आल वाटत ! येजान्या, मरा म्हार हो ! पग पग क्वान हायें त्ये !

जान०---( उठून व दाराशीं जाऊन ) अर क्वान हाये क्वान ?

[ इतक्यांत शंभु पुढें येतो ]

शंभु---मी हाये संभ्या !

जान०---क्वान संभ्या ! थुः तह्ये मन ! मंग त्येका निशानी यिसरलास व्हय !

शंभु---( त्याच्या कानाशीं लागून ) आज दादा लयी जबांर हाये शिकार ! थ्वोरा झोस्याची हाये !

जानबा---मंग का करावं ! त्येचा यिचार नाईक आल्याबगांर न्हाई व्हनार ! चल घे त्यासनी आंत ! अन् दार ढकाल ! चल झटशी !

शंभु---या हकड गड्यो !

[ चंद्रानना व विषयीराव व इतर रामोशी येतात. ]

शंभु---( बोट दाखवून ) हत बसा दादा !

जानबा---वाघुजीदादा, शिकार हाये!

[ पडद्यांत-" क्वान हायेंर जान्या ! " ]

जानबा---जी व्हयि ! तुक्या झोर दाराशी जा

तुक्या---[ सर्वांस ] आलर दादा नाइक !

वाघोजी---ए येशा, जरा गप्प बस मर्दा ! त्यो यम आला ना !

[ तुक्या कथी काढतो व **यमाजी** नाईक व **चंद्रसेन** येतात ]

**नाईक**—कार जान्या, आज काई शिकार वि-कार न्हाई व्हय ! इक्त्या वाडुळ काय चाललं व्हत र ?

**जानबा**—न्हाई वाइच येसवा दोन लावन्या ह्मगाल इक्त्यामंदी संब्या बी आला शिकार घेऊन शानी ! त्येचा यिचार करीत व्हतो इक्त्यांत तुमी बी आला ! संब्या, कायर !

**संभु**—नाईक आज लयी ब्येस शिकार हाये ! ह्ये दोन इसम आनल हायती आज !

**नाईक**—बर न्हारद्ये ! त्येचा यिचार ह्मोर करता येइल ! पन ह्योगड्यो, ए गोसायी दादा तुमास्नी काईबी सांगनार हाये; त्ये ऐका अदुगर !

**सगळे**—ह्मणी अमी समद जन ऐकनार अन् !

**चंद्रान०**—[ आपल्याशीं ] देवा ! या बैराग्याकडे मी जसजशी बघूं लागतें तसतसं माझं मन असं शंकाकुल कां बरं होऊं लागतं ! माझ्या वृत्तीत अशी बदल कां बरं होते ! मला असा मोह कां बरं येतो !

**विषयी०**—( आपल्याशीं ) हा बैरागी खरा ! परंतु " हा कांहीं सांगणार आहे, " असं या नायकानें ह्मटल्यापासून मला फारच अचंबा वाटूं ला-

गला आहे ! शिवाय याच्या मुद्रेवरून हा कांहीं निराळाच आहे असं वाटतं !

**चंद्रसेन**—( उठून ) सच्चिदानंद परमेश्वर तुमचं कल्याण करो ! मित्रहो, मी आतां तुम्हांला ज्या कांहीं गोष्टी सांगणार आहें, त्या लक्षपूर्वक ऐकून त्यांच्या सत्यतेबद्दल तुम्ही आपल्या मनाशींच विचार करा ! व त्याबद्दल अमुक अमुक केलं पाहिजे म्हणून जें मी तुम्हांला सांगणार आहें, तेंही करूं किंवा न करूं याबद्दल मला कळवा ! आतां प्रथम मी जें तुम्हाला सांगणार आहें, तें तुह्माला पसंत पडो अथवा न पडो; परंतु त्यांतील एक अक्षरही बाहेर फुटणार नाहीं अशाबद्दल **श्रीजगज्जननी भवानीची** व आपल्या तलवारीची शपथ घ्या ! ( सर्व तसें करितात ) तुह्मांला हा आपला देश केवढा मोठा आहे; याच्या कोणत्या दिशेला काय आहे; यांत महत्वाचीं व पूज्य स्थानं कोणतीं आहेत; व आपले क्षत्रिय रजपूत राजे राज्य करूं लागण्याच्या पूर्वीपासून या आपल्या देशाची कशी भरभराट होती; येथील लोक कसे सुखी होते येथें लक्ष्मी कोणत्या दरानें वास करीत होती; व्यापाराला तेजी कितपत होती; शेतकी किती भरभराट अवस्थेंत होती; आपले पूर्वज किती हुषार होते; या गोष्टी काय ठाऊक असणार ! मित्रहो -ज्या आपल्याला संपत्ती ह्मणजे पाण्याप्रमाणें झाली

होती, तेच आपण या मुसंड्यांच्या अव्याहत लुटीमुळे पेलाभर पाण्याला देखील महाग होत चाललों अँ! ज्या ठिकाणीं मोठा जवाहिराचा व्यापार चालायचा, त्या ठिकाणीं मातीचा व्यापार देखील चालण्याची पंचाईत पडावी! जें धान्य पूर्वी आपण गुरांढोरांना बिनदिक्कत खायला घालीत होतों तेंच धान्य आतां आपणा स्वतःला एक वेळची तरी भूक भागवण्या इतकं मिळेल काय असं होऊन दीनपणानें दुसऱ्याच्या तोंडाकडे पहात बसण्याची पाळी यावीना! जी विद्या आपल्या येथील विद्वान केवळ विद्वत्ता वादावी या हेतूनें शिकत, तीच विद्या एखाद्या मुनशाची मन धरणी करून व फार परिश्रमांनीं शिकूनही आपल्या उपजीविकेचंच साधन व्हावीना! आणि तरी देखील उपजविनाची वानवाच अँ! ज्या ठिकाणीं महान महान पराक्रमी योद्धे, मोठ मोठे ज्योतिषी, विशाळ बुद्धीचे वैयाकरणी, विलक्षण तत्ववेत्ते, प्रख्यात शास्त्री कुशल कारागीर, असे होऊन गेले; त्या देशांत निव्वळ बडबडे, तोंडपुजे, मत्सरी व विषयलंपट पुरुष निपजावे अँ! आपली देवस्थानं विटाळलीं, मूर्ति फोडल्या, बळजबरीनें आपणास धर्मभ्रष्ट करूं लागले, असं असतां आपण बांगड्या भरणं हें नीट आहेना! एकंदरींत आज सर्वतोपरी या नीच मुसलमानांचे आपण दासानुदास बनलों हें सर्वांस पसंत आहेना! जी लेखणी पूर्वी मोठ मोठे गुढ विषय व राज्यप्रकर-

र्णी गोष्टी लिहिण्याकडे वळत असे, तीच आतां ना-
स्कळ, वृथाभिमानी व निंदास्पद गोष्टी लिहिण्याच्या
कामीं लागावी काय ! जीं हत्यारं पूर्वी शिकारीचे,
वेळीं किंवा रणयज्ञांत शत्रूच्या काळजाचं विदारण
करण्याच्या कामीं उपयोगीं पडत, तींच आतां म्या;-
नाला केवळ शोभा देण्याच्याच कामीं लागावि अँ ;-
ज्या रजपुतांचं नांव घेतलं असतां इतर राष्ट्रांतल्याच
काय परंतु या मुसलमानांच्या देखिल अंगावर थरारून
कांटा उभा रहात असे तेच रजपूत आतां आपलं शौय
धैर्य सोडून आपल्या पूर्वजांना कलंक लावणारे परा-
वलंबनरूपी मकरंदावर लुब्ध होणारे भ्रमर बनले !
( किंचित थांबून )पण थांबा ! मित्रहो, दुःखानें, सं-
तापानें, व अंतःकरणांत स्वदेशबंधूंची सांप्रतची स्थिति
पाहून जी एक कालवाकालव चालली आहे तेणेंक-
रून माझ्या झालेल्या भ्रमिष्टपणामुळें मी या इतक्या
गोष्टी बडबडलों. यांत तुम्हाला काय समजणार आहे!
तुम्हाला जें सांगायचं तें निराळच आहे ! पहा, मि-
त्रहो, अन्नाकरतां तुम्ही कसे दारोदार लागलां आहां!
तुम्हाला राहण्याला सत्तेचं झोपडं तरी आहेका!म्हणून
म्हणतों तुमच्यासारखे शूर असून काय कामाचे!ज्या फितु-
रांनीं आपला गळा कापला,व ज्यांनीं आपल्याला अन्नान्न
करायला लावलं, त्यांचा सूड न घेण्याइतके हिजडे
तुम्ही बनलांना ! तुम्हाला तुमचं स्वातंत्र्य नष्ट झालं
त्याबद्दल कांहींच वाटत नाहींना ! धिःकार ! धिक्कार

असो तुम्हाला ! जन्माला येऊन भूमीला भार व आपल्या वडलांच्या नांवाला कलंक लावण्याला मात्र कारण झालां ! उठा ! पहातां काय ! खऱ्याचे पूत असाल तर आपल्या वाडवडलांचं नांव कायम ठेवा व आपल्या स्वातंत्र्याचे झेंडे सर्व पृथ्वीवर नाचवा !

**सर्व**--ह्मना भवानी आई की जय !

**बाघोजी**--नाईक, ह्यो दादा " सवतंनरता सवतंतरता " म्हून म्हनाला; तवा मी ह्मनतो की आजपुन आपल्या आंबाबाईचं नांव बी सवतंतरता द्येयीच ठुवाचं

**जानबा**--म्हना सवतंननरता द्येयी की जय अन् नाईक द्येयीचा उरुस बी भरायचा ! कोकुड बी मायंदाळ द्येव आईला !

**चंद्रसेन**०--( आपल्याशीं ) अहाहा ! परमेश्वरा ! धन्य आहे तुझी ! प्राणनाथच खास हे ! आई अंबा! बाई, आतां मी तुझी कशी उतराई होऊं ! आम्ही दोघेही आतां अखंड एकत्र राहूं !

**विपयी**०--( आपल्याशीं ) परमेश्वरा ! आज मी धन्य झालों ! आज चंद्रसेन महाराजांचीही भेट झाली ! ( उघड ) आईसाहेब, आपण या बैराग्याला ओळखलं का ! हे आपले चंद्रसेन महाराज !

**जानबा**--( उठून ) आता समद्यास्नी माझं ह्ये म्हनन हाये, कीं समद्यांनीं आजपुन ह्येच दादाचं ऐकायचं ! अन् आपुन जन्मुन ह्यो ह्मनतो कीं आपल्या मायबापाच्या नांवाला काळुखी आली, तर राव

आपुन खऱ्याच बच्ये होत तर ह्येजा आपठं कसत्र दांवा ! का नाईक माझं म्हननं खर हायें का न्हाई पन दादा, तुमी क्वान, कुठलं, तुमचं नांव, गांव काय ह्ये काईबी न्हाई सांगितलं !

**चंद्रसे०**—( उठून ) दुष्ट व अधम घातकीराव व विषयीराव यांच्या कृष्ण खटपटींनीं राज्यापासून, आईबापांपासून व प्रजेपासून दूर झालेलं जे मालोजी-राव महाराजांचं घराणं, त्यांतलाच मीहि एक आहें ! आपल्या बाल महाराजांचा परम स्नेही ज्याला **चंद्र-सेन** ह्मणतात तोच हतभागी मी !

**चंद्रा०**—( उठून ) व त्यांच्या पायांशीं देह वाहून, आजपर्यंत विरहदुःखानें गांजलेली ही हतभाग्या **चंद्रानना** ! ( असें म्हणून **चंद्रसेनास** मिठी मारते. )

**चंद्रसेन**—[ साश्चर्यानें ] कोण ! माझी लाडकी चंद्रानना ! लाडके, तूं हा असा वेष कशा करितां घेतलास !

( सर्व आश्चर्यानें पाहूं लागतात. )

**विषयी०**—(आश्चर्यानें आपल्याशीं ) काय ही चंद्रानना ! शाबास चंद्रानने शाबास !

( रामोशी आप आपसांत कुजबुजतात. )

**राणबा**—वाघुजीदादा, ह्ये काय झालं ! अन इचिभन दुसरी बी आवाच हाये व्हय की काय !

**जानबा**—म्हाराज, बाईसाहेब भेटल्यांनू आज

म्हजी समदा आनंदच झाला हाये ! आता माझ हात कस आवशी सळसळत्यात ! कधी त्या घातकी-रावाच न् यिशयीरावाच टुकड करूं असं झालं हा-ये ! ह्मना मज्यो सवतंतरता देयी की ज्य !

विषयी०--[ पुढें होऊन व चंद्रसेनाच्या पायां पडून ) हाच तो अधम, व घातकी विषयीराव ! आतां याचं काय पाहिजे तें करण्याला आपण मुखत्यार आहां!

राणबा—अर जान्या, ह्यो यिशयीराव पघ ! ह्यो बी हतच आला !

जान०—हाये कुठ ! तुक्या हाव !

चद्रंसेन——कोण ! विषयीराव ! नीचा असलं हें तोंड कशाकरितां मला दाखवायला आलास !

जानबा—हान हान !

( सर्व एकदम धांवतात. )

चंद्रसेन—हं खबरदार! मित्रांनो, असे उता-वळ होऊ नका !

विषयी०—चंद्रसेन महाराज, आपल्याला माझा राग आला असेल व तो येणंहि वाजवी आहे ! म-महाराज, आतां माझ्यानें जास्त बोलवत नाहीं ! सर्व खरा वृत्तांत चंद्राननाच सांगेल !

चंद्र०—काय ! प्रियेला तुजबद्दल माहिती आहे !

चंद्रा०—महाराज, आपल्याजवळ मला पुष्कळ बोलायचं आहे! त्यावेळींच विषयीरावाबद्दलही सांगेन

चंद्र०--ठीक आहे! चला मित्रांनो आतां पुढं काय करायचं याचा विचार करूं!

पडदा पडतो.

प्रवेश सहावा समाप्त.

अंक चवथा समाप्त.

---

# अंक पांचवा.

## प्रवेश १ ला

स्थळ—सत्यपुरी—( घातकीरावाचें घर )

( घातकीराव आपल्याशीं विचार करीत बसले-ला प्रवेश करितो. )

घातकी०—( आपल्याशीं ) स्वराज्य व स्वातंत्र्य यांची आठवण लोकांना स्वप्नांत सुद्धां होऊं नये; व तसे विचार नुसते मनांत आणणं देखील भयप्रद अशी स्थिति व्हावी; व या मुसलमानांचा अंमल जबरदस्त वाढून बहुतेक बाबींत आपल्यालाच अधिकार

मिळावा, हा माझा ममत्वापासून हेतु असतां, सर्व गो-ष्टींत या सुभेदारांना माझाच कसा संषय येऊं ला-गला ! आणि चमत्कार असा, कीं त्यांना संषय येण्यासारखं घडूंही लागलं ! कारण प्रथम चंद्रि-का पळाली; त्या मागून वीरसेन व लिंबाजी हेही नाहींसे झाले; बरं अख्तरशहानें पुन्हा तिला पकडून अड्या डोंगराच्या पायथ्याजवळच्या तुरुंगवाड्यांत ठेवली होती, तेथून हो पुन्हा ती आपल्या कार-ट्यासह नाहींशी झाली ! एकंदरींत प्रत्येक बाब माझ्याच अंगावर उलटून येऊं पहाते ! वास्तविक मी इतक्या सत्य निष्ठपणानें स्वराज्याच्या वेळीं एक क्षणभर देखील वागलों नाहीं ! चंद्रिकेबद्दल इतकं नव्हे, पण तें कारटं हातचं गेल्यामुळें अख्तरशहानें त्या वेळीं मजवर केवढं तुफान केलं ! पुढें तर काय प्रत्यक्ष राजकीय कैदीच सुटला ! (किंचित् थांबून ) चहूं कडूनच कसं विंचू लागल्यासारखं झालं ! विषधीराव व चंद्रानना हीं ही आज कित्येक दिवस नाहींशीं झालीं आहेत ! ( रागानें ) गुलामा लिंब्या ! वीरसेनासह पळून जाऊन, राज्यांत बंडाळी माजव-ण्याचा विचार करतोस काय ! इतके दिवस तुह्माला तुरुंगांत जिवंत तरी रहायला सांपडलं होतं ! पण थांबा ! आतां तुमचा शोध लागला पुरे ! तुह्माला धरून आणून तुमच्या तोंडाला मुसक्यां घालतों ! व सर्वांना हारीनें उभीं करून तुमच्या एकदम गु-

सांप्रमाणें माना छाटवीन तरच नांवाचा घातकीराव ! नवीन सुभेदार अत्यंत कठीण अंतःकरणाचा, मतलबी व पुरा मसलती असल्यानें, ' माझं वजन अगदीं कमी होईल व झालेंही आहे ' असा जरी सर्वत्र समज झाला आहे, तरी मला त्याची बिल्कुल पर्वा नाहीं ! मी तर त्याचा असा स्वभाव आहे हेंच माझ्या मनीषा पूर्ण होण्याला चांगलं साधन आहे असं समजतों ! त्यानें जरि वीरसेनाचा, लिंबाजीचा व त्या कारल्याजा शोध करण्याच्या कामीं मजवर आपला अगदींच विश्वास नाहीं असं दर्शवलं होतं, तथापि **रामगिरी व शिवगिरीच्या** राजांशीं शरीर संबंध घडवून आणून त्यांना मुसलमानीं धर्म स्वीकारण्याला लावण्याच्या कामीं मी केलेले अव्याहत श्रम पाहून, तो त्याचा समज नुसता नाहींसा झाला इतकंच नव्हे; परंतु अख्तरशहापेक्षांही त्याचा मजवर विश्वास बसला ! बस्स ! आतां हां हां म्हणतां या गुलामांच्या पारिपत्याची तजवीज लावीन ! विषयीरावाला म्हणावं माझी एकचशीं काय परंतु अशा शेंकडों बहिणी पळवून नेल्यास तरी त्याबद्दल मलां वाटणार नाहीं ! म्हणजे गुलामा, तुला याबद्दल शासन होणार नाहीं असं समजूं नको ! या मुसंड्यांना काय कळत आहे ! ' अंधळं दळतं आणि कुत्रं पीठ खातं ' अशी तर व्यवस्था आहे ! आमच्या इकडच्या शेंळ्या कशा राखाव्या हें शिकविणारे आमच्यासारखे

बहादर आहेत म्हणून तर कांहीं चाललं आहे ! आणि म्हणूनच आमचे इष्ट हेतु सिद्धीस जातात ! लोकांच्या चळवळीकडे लक्ष देऊं लागल्यापासून आतां मात्र वाटेल त्याप्रमाणें वागतां येईल असं वाटूं लागलं आहे !

[ इतक्यांत एक चाकर येतो ]

चाकर—सरकार, आपल्या गुप्त कामगारांनीं कांहीं लोक कद करून आणले आहेत. त्यांत बायका मुलंही आहेत ! व आपल्याला ठरल्या ठिकाणीं ६ येण्याविषयीं त्यांची विनंती आहे !

घात०—कोणतीही अधिक चवकशी न करतां त्या सर्वांस देहांत शासन देण्याचा माझा हुकुम आहे म्हणुन त्यांना कळव ! व गुप्त रीतीनेंच हें काम करावं असं सांग ! जा. मीहि लवकरच येतों !

( पडदा पडतो. )

**प्रवेश पहिला समाप्त.**

---

## प्रवेश दुसरा.

स्थळ—निगुडवन—पडकें देऊळ.

( चंद्रसेन व चंद्रानना बसलेलीं प्रवेश करितात. )

चंद्रसेन—लाडके, तुला इतके आयास पडले ! व तेही मजकरतां ! शिव ! शिव ! मी अधम खरा ! कोणत्याही रीतीनें मी आपली गुप्त बातमी तुला देत

जाईन असं सांगून ती न कळवल्यामुळें मी तुझा अपराधी आहे खरा ! परंतु लाडके, त्यावेळीं असलेल्या स्थितींत तुला मी आपली बातमी कळवावी, व तुझ्या मनाला विनाकारण दुःखांत ठेवावं हें मला प्रशस्त दिसेना ! यावरून ह्मणजे माझं तुझ्यावरचं प्रेम कमी झालं होतं असं समजूं नको ! तुझी मूर्ती अंतःकरणांत अगदीं खिळलेली होती ! शिवाय तुला न कळविण्याचं वास्तविक कारण ह्मणशील तर माझी बातमी तुला गुप्त रीतीनें कळते असं बाहेर फुटल्यास तुझ्या जिवाला मात्र कांहीं अपाय घडता ! शिवाय तुला कळवण्याला ह्मणजे मी कुठे जवळच होतो असं नाहीं ! मी तुला भुजंग देशांतील हकीकत सांगितलीच आहे ! मी तुझा निरोप घेऊन निघालों तो प्रथम अनेक देश, तेथील लोक, तेथील लोकांचं आचरण, त्यांच्या मधील ऐक्य, स्वातंत्र्याविषयीं त्यांची उत्सुकता, उद्योग, स्वधर्माभिमान, तेथील शेतकी वगैरे सर्व गोष्टी पाहून त्यांच्यांत कलाकौशल्याचाही कितपत पसार झाला आहे हेंही पाहिलं ! या सर्वांत आङ्ग्ल देशात मी बरेच दिवस काढले ! तेथील लोकांची थोरवी, त्यांचं सौजन्य, त्यांची आदरआतिथ्य बुद्धि व कोणत्याही उद्योगाच्या कामीं एक निष्ठा या गुणांबद्दल त्यांचं जितकं वर्णन करावं तितकं थोडं ! एकंदर अशा रीतीनें मी बरींच वर्षे काढून अखेर परत स्वदेशीं आलों ! नंतर पुढें इच्छित उद्योगाला ला-

गलों ! हल्लीं सुमारें आज दोन अडीच वर्षांत तुझ्या भेटीबद्दल व वीरसेन महाजांच्या शोधार्थ मी कसकसे दीर्घ उद्योग केले हें मी तुला सांगितलंच आहे ! अहाहा ! लाडके अशा स्थितींत तुझी अकालिक व विलक्षण भेट झाली ! व तूं इतकी शुद्ध आहेस असं कळल्यापासून तर या माझ्या इच्छित यत्नांत मला यशच आल्याप्रमाणें वाटत आहे !

**चंद्रान०**—महाराज, काय संकटं भोगलीं आपण हीं ! महाराज, आतां मात्र मी कधीं कुठे जाऊं द्यायची नाहीं ! नकोगबाई ! भुजंग देशांत आपल्याला अन्यायानें तुरुंगांत पडावं लागलं म्हणून आपण सांगितल्यापासून माझ्या काळजांत कसं बांधबसल्यासारखं झालं आहे ! धर्माधिकाऱ्याला आपल्या जागीं बांधून ठेवून त्यांचा वेष घेऊन आपण सुटका करून० घेतली म्हणून सांगितलं ! छेगबाई ! नकोच तें ! अशीं दुःखं आपण भोगावीं आणि मी मात्र या ठिकाणीं आनंदांत राहिलें !

**चंद्र०**—बरं ! आपल्या सुखदुःखाच्याच केवळ गोष्टी बोलत बसण्याची ही वेळ नव्हे ! मला विषयीराव केव्हां परत येऊन तिकडील वर्तमान कळवील असं झालं आहे ! खरोखर यावेळीं विषयीरावासारखा मनुष्य पुन्हा आपलासा झाल्यामुळें आरंभलेल्या कृत्यांत यश येईलसं दिसतं ! परंतु लाडके, आपल्याला

असं सांगून परत गेल्यावर तो कांहीं फसवणुकीच्या तर विचारांत नसेलना !

चंद्रा०—शिव शिव! महाराज हा आपला संशय विनाकारण आहे ! कारण प्रथम पठाणाच्या वेषांत असतां त्यानें मला ओळखण्यापूर्वीं मीच चंद्रिकाबाई असं समजून जें आचारण केलं त्यावरून त्यांच्या विषयीं माझं तर मन अगदीं शुद्ध झालं आहे ! व त्याचंही मन शुद्ध झालं आहे अशाबद्दलची खात्री त्यानें त्या वेळेपासून पश्चातापजन्य ज्या ज्या गोष्टी केल्या म्हणून मी सांगितलं त्यावरून होईलच !

चंद्रसे०—( तिच्या खांद्यावर हात टाकून ) बरं! “ हा वैराग्याचा वेष टाकून देऊन पुन्हा परत राजधानीस जा; व तेथील खटपटी काय चालल्या आहेत, वीरसेन महाराज सुटून गेल्यामुळें कितपत चळवळ सुरू आहे, याबद्दल नित्य भेद मला कळवीत जा ’ असं सांगून तिकडेच त्याला राहयला सांगितलं हें ठीक झालं कीं, नाहीं ! लाडके, आतां तुलाही हा स्त्रीवेष बदलून पुन्हा पूर्ववत पठाणाच्या वेषानें राहिलं पाहिजे ! कारण स्त्रीवेषानें अशा या जंगलांत राहणं माझ्या मतानें निर्भय दिसत नाहीं ! शिवाय मलाही केव्हां व कोठें जावं लागेल याचा नेम नाहीं !

चंद्रान०—( त्याच्या गळ्याला मिठी मारून ): पण महाराज, आतां या दासीला मात्र हे पाय अंत-

रणार नाहींना ! कसे जरी भयंकर प्रसंग सोसण्याची पाळी आली तरी मी आपल्याच जवळ राहीन !

[ इतक्यांत तुक्या रामोशी येतो.

तुक्या—म्हाराज, आज आखाडा मांडा म्हून आपुन सांगितल व्हत, त्या परमान समदी तयारी हाये म्हून आपनास्नी सांग म्हूनशान नाईक म्हनल !

चंद्र०—चल प्रिये, जरा आखाड्यांत जाऊन यांच्या कुस्त्या, पट्ट्याचे हात, कसरती वगैरे पाहूं ! तुकोबा, नायकांना मी आलोंच म्हणून कळव ! पण काथेरे, पट्टे वगैरे चांगले आहेतना !

तुक्या—स्हजी ! ह्ये काय यिचारावं ! आपुन बघायला येनार म्हून आम हत्याराची लयी खबरदारी घेतली हाये !

चंद्र०—ठीक आहे. चल मी येतोंच !

[ तुक्या जातो. ]

चंद्रसे०—लाडके, चलायचंना ! बरं ! आतां एक गोष्ट अशी, कीं तुला पाहिजेत ते लोक निवडून घेऊन उद्यां तूं राजधानीच्या बाहेरील अंबिकेच्या खिंडींत तळ दे, व प्रसंगानुसार वर्तन ठेव !

चंद्रान०—महाराज, पण असं करण्यांत तें वियोगजन्य दुःख भोगण्याचा तर प्रसंग नाहींना येणार !

चंद्रसे०—( तिच्या हनुवटीस हात लावून )

नाहीं बरं ! आतां तुझे दुःखाचे दिवस अगदीं संपले ! आतां तुला कांहीं काळजी नको ! तुझ्या मागून बाकी कशा टोळ्या कोठें पाठवायच्या याची व्यवस्था करून कांहीं लोकांनिशीं मीही येणारच आहे !

[ जातात. ]

**प्रवेश दुसरा समाप्त.**

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ—नजर खेड्यांतील भिक्षुकाचें घर.**

( भिक्षुक एकटाच बसलेला प्रवेश करितो )

**भिक्षुक**—( आपल्याशीं ) काल दवंडी पिटल्या-प्रमाणें शिपाई लोकांना मी वीरसेनाला तुमच्या स्वाधीन करतों म्हणून सांगितलं, परंतु हाच वीरसेन खास असं कस समजावं ! ( किंचित् थांबून ) पण हा बैरागी वीरसेनच खास ! कारण तिच्या तोंडून खोटी बातमी कधींच समजायची नाहीं ! शिपायांना वर्दी देण्यापूर्वीं देखील प्रथम " आपण या बैराग्याला ताब्यांत द्यावा किंवा नाहीं, हा वीरसेनच असेल का " वगैरे संषय घेऊन आमच्या हिला तिनदां तीनदां विचारलं, तेव्हां सद्धां तिनें मला अगदीं खात्रीनें सांगितलं ! वा ! आतां काय कमी आहे! पांच हजार मोहोरांची थैली हातीं येणार ! एकं-

दरीनें पहातां बराच फायदा होणार ! बरं ! आतां ते सरकारी शिपाई येतील ! तेव्हां तो वैरागी काय करीत आहे तें पहावं ! पण आज अजून तो इकडे कसा नाहीं आला ! रोजच्या नियमाप्रमाणें ह्मटलं ह्मणजे तो पोथी ऐकण्याकरतां यावा ! खरोखर हा बैरागी वीरसेनच असावा, असं मलाही वाटतं ! कारण पांडव राज्यभ्रष्ट झाले, पुढें त्यांना अरण्यांत बारावर्षं काढावीं लागलीं, एक वर्ष पुढें गुप्त रहायचं होतं त्यामुळें तर त्यांना फारच दुःखं सोसावीं लागलीं ! अशा भारतांतल्या कथा मी वाचूं लागलों, कीं वर मान करून व दीर्घश्वास सोडून तो अगदीं गाँहिवरल्या प्रमाणें होतो ! कित्येक वेळां तर एकदम लाल होतो; व त्यामुळें हा आतांच कांहीं भयंकर परिणाम करतो कीं काय असं वाटूं लागतं ! “द्रौपदीची जशी भयंकर स्थिति झाली, तशीच भयंकर व दुःसह स्थिति भोगण्याचं तुझ्याही कपाळीं आलं ना ! ” असं म्हणून कित्येक वेळां त्याला सजल नेत्र झालेला पाहिल्याचं मला स्मरत आहे ! काल ह्मणीं मालोजी महाराजांच्या मृत्यूबद्दल, चंद्रसेन महाराजांसंबंधीं वगैरे गोष्टी मी मुद्दाम त्याच्जवळ बोलूं लागलों, त्याबरोबर तर तो एकदम भांबावल्या प्रमाणें झाला ! व मोठ्यानें श्वास सोडून मला ह्मणाला कीं, “या गोष्टींशीं आपल्याला काय करायचं आहे!

तुह्मी पुढं वाचणार असाल तर पोथी वाचा!" यावरू-न तो वीरसेनच खास असं मला वाटतं!

( इतक्यांत दारावर थाप वाजते. )

भिक्षुक—हें कोण! हं हे शिपाई आले असतील.

[दाराची कडी काढतो व शिपाई आंत येतात.]

१ जा०—क्यों जाफर अब कैसा करनेका?

२ रा०—करनेका क्या! जमादार साहाबका हुकुमही है के "बीरसेन तुमारे काबूमे आये वख्त वो बम्मनकूभीं एकदम कैद करना!" बस्स! फेर क्या! आपनेकुभीं वैसाच करनेका!

१ ला.—अच्छा! (उघड) क्यौं महाराज, आपुन सांगला तेचा काय झाला? हमी तो वख्तपर तयार है!

भिक्षुक.—तुह्मी बाहेर बसा! तो इतक्यांत इकडे येईल! वेळ आल्याबरोबर मी मोठ्यानें टाळी वाजवून तुह्माला खूण करीन! त्याबरोबर तुह्मी आंत येऊन त्याला आपल्या ताब्यांत घ्या! पण कारे बाबांनो, मोहरांची थैली कुठे आहे? पांच हजार मोहरा मोजा आधीं!

२ रा.—वो सब् हम करेल! लेकिन् उस्कू ब-ताव अव्वल!

भिक्षुक.—बसा बाहेर! (पाहून) हा पहा! तो इकडेच येत आहे!

( शिपाई जातात वीरसेन येतो. )

**वीरसे०**—( आपल्याशीं ) आज या ठिकाणीं येऊन इतके दिवस झाले, अद्याप कसा लिंबाजीला माझा शोध लागत नाहीं ! तुरुंगांतून सुटलों त्यावेळीं जो मनुष्य मजबरोबर होता, त्याला देखील याच खेड्यांत मी तुमची वाट पाहीन ह्मणून सांगितलं होतं ! असं असून अजून कसा लिंबाजी येत नाहीं ! का त्या मनुष्याची व लिंबाजीची अद्याप गांठच पडली नाहीं ! कारण तसं झालं असलं तर मात्र लिंबाजी प्रथम ठरल्या जागीं जाऊन, तेथें मी नाहीं ह्मणून निराशेनें परत गेला असेल ! असो ! आतां कांहीं होवो ! उद्यिक आपल्याला येथून बिऱ्हाड उचललंच पाहिजे ! कारण कालची दवंडी ऐकल्यापासून माझ्या मनांत बरेच विकल्प येऊं लागले आहेत ! शिवाय या ब्राह्मणाच्याही वृत्तींत आज दोन दिवसांत फरक दिसतो ! असो. आजची रात्र कशी तरी काढली पाहिजे खरी ! मग होईल तें होईल ! प्रसंग पडल्यास आपलं शस्त्र जवळ आहेच !

**भिक्षुक**—कां बुवाजी ! आज सोप्यांत यायला उशीर केला ! पोथी नाहीं ऐकायची वाटतं !

**वीरसे०**—आज माझी प्रकृति ठीक नाहीं ! उद्यांच ऐकूं झालं !

**भिक्षुक**—आज कांहीं फारसं नाहीं ! अश्वत्थाम्याचा पांडव शिबिरावर छापा झाला कीं आटपलं !

( एकीकडे ) तुजवरचा छापा झाला ह्मणजे ही आट-पळंच !

**वीरसेन**——ठीक आहे. चालूं द्या !

**भिक्षुक**—'अश्वत्थाम्यानें रुद्रदैवताला प्रसन्न करून त्याजवळून काळखड्ग मिळवलं; व तो आंत शिरला ' इतकं काल झालंच आहे ! पुढं जे ते असं झालं— ( ओंव्या वाचतो )

" मत्स्याचे कोठरा माजी एक ॥ जैसा यावा अवचित बक ॥ तैसा तो द्रोण तनय देख ॥ येई धृष्टद्युम्न जेथें ॥१॥ ज्या शिबिरीं होता धृष्टद्युम्न ॥ तेथेंच गेला गुरुनंदन ॥ लत्ता प्रहार हाणोन ॥ केशीं धरूनी ऊठवी ॥ ५ ॥ "

याप्रमाणें द्रोणवधाचा प्रथम सूड घेण्याकरतां जेते अश्वत्थामा द्रौपद शिबिरांत तो निद्रिस्थ असतां गेला बरं काय!

वीरसेन—फारच हृदयद्रावक भाग दिसतो बरं का आजचा!

भिक्षुक —यापेक्षांही हृदयाचं खरं विदारण क-रणारा भाग इतक्यांतच होईल! ( वाचूं लागतो )

" घाबरा पाहे द्रुपद सुत ॥ तों काळरुप द्रौणी दिसत ॥ आपुले गळां पाश घालीत ॥ येरू येत काकुळती ॥ ३ ॥ म्हणे आचार्यपुत्रा अवधारी ॥

मज आतां शस्त्रानें मारीं ॥ आपदा करूं नको
ये अवसरी ॥ ऐकेना तें परी द्रौणी ॥ ४ ॥
सेवक समस्त पळोनि जाती ॥ वक्षस्थळें नितंबिनी
पिटिती ॥ पाश घालोनी सत्वर गती ॥ पाडी
द्रौणी द्रौपदा ॥ ५ ॥"

( टाळी वाजवतो, इतक्यांत शिपाई लोक आंत येतात )

वीरसेन–( आश्चर्यानें )काय! सरकारी शिपाई! व तेही सशस्त्र!! (भिक्षुकास )गुलामा,अश्वत्थाम्याचा-पांडव शिबिरावर छापा आणि हा माझा तुझ्यावर! समजलास! (असें म्हणून त्यास खालीं पाडतो इतक्यांत शिपाई अंगावर धांवून येतात त्यांस संतापानें.) खबरदार! जो पुढें पाऊल टाकील त्याचा मुडदाच पाडीन!! ( आपल्याशीं ) आतां मात्र मीं शत्रूंच्या हातीं लागलों खरा! काय हा अधमपणा! गुलामा, आजपर्यंत प्रति दिवशीं एकेक मोहोर मजजवळून घेऊन अखेर माझ्यावरच उलटलास अँ! हर हर! एकंदरत फितुरीचं चहूंकडे वर्चस्व बसत चाललं आं! लोकहा अजून शहाणे व्हा!

१ ला. शि०–अब आपना हत्यार नीचे रख देव!

वीरसेन–काय! हत्यार खालीं ठेवूं! हुकुम! आणि तो मला!! थांब आधीं तुला खालीं ठेवतों आणि तर हत्यार ठेवीन! ( असें म्हणून त्यास वार करितो, इतक्यांत इतर लोक भोंवती वेढा घालतात ),

वीरसे०—( संतापून ) खबरदार ! व्हा बाजूला ! रस्ता खुला करा! ( असें म्हणून एक दोघांस वार करतो, इतक्यांत हातांतील तलवार सुटून पडते.) अरे अरे ! घात झाला !. हातांतून शस्त्र पडलं! लोकहो! आतां मी तुमच्या ताब्यांत आहे! तुम्हाला मला जिकडे घेऊन जाणं असेल तिकडे लवकर चला! ( भिक्षुकास ) गुलामा! मर असाच!

( जातात )

प्रवेश तिसरा समाप्त.

## प्रवेश चवथा.

स्थळ—आडरान.

( पुरुषवेषधारी चंद्रिका प्रवेश करिते )

चंद्रिका०—देवा! तुझी लीला अगाध आहे! तूं रंकाचा राव व रावाचा रंक केव्हां करशील याचा कांहीं नेम नाहीं! ही आमचीच स्थिति पहा! आम्ही कोण होतों व काय झालों! प्राणनाथांची आणि अमची चुकामुक पडल्यापासून माझं काळीज कसं उडत

आहे! प्राण देखील जातील तर बरं! देवा! आतां मी काय करूं! "अमुक अमुक ठिकाणीं मी आहें; त्याच ठिकाणीं लाडकीला व बाळाला घेऊन ये" असं लिंबाजीला सांगून महाराज आपण त्या ठिकाणाहून एकाएकीं कसे गेलां! नाहीं तर महाराज आपल्याला एकाएकीं विरक्तता तर आली नसेना! पण असं कसं व्हावं! क्षात्र धर्माचा अभिमान बाळगणाऱ्या शुद्ध वंशीय रजपुतांनीं ह्मणजे विरक्त होऊन सर्वस्वाचा त्याग करून शत्रूचा सूड घेण्याविषयीं उदासीन झाल्याविषयींचं आजपर्यंत कधींच माझ्या ऐकिवांत नाहीं! नाहीं तर देवा, कांहीं भलतं सलतं तर झालं नसेल ना! तसं जर असेल तर मात्र माझ्या सर्व आशा फसल्या! पण तसं असावं असं कांहीं दिसत नाहीं! कारण लिंबाजीला तसं कांहीं असत तर ताबडतोब समजलं असतं! त्यानें हल्लीं ज्या खटपटी चालवल्या आहेत, त्यांवरून खरोखर लवकरच सुदिन येईल असं दिसतं! फार श्रम करून अनेक संकटं भोगून चिद्याऱ्यानें त्या लोकांचीं मनं वश करून घेतलीं व त्यावर आपला सर्वस्वी अंमल बसवला; व आपण सांगूं त्याप्रमाणें त्यांनीं वागावं असं करून त्यांना आपले ताबेदार केले; व एकंदर सर्व जमावाला 'अजिंक्य सेना' असं नांव दिलं! त्यांत जरी मलाही लोकोपचारार्थ इतरां प्रमाणेंच वागावं लागतं, तरी त्याचं कांहीं वाटत नाहीं! कारण तसे न केल्यास व मी 'कोण, कोठें'

वगैरे बाहेर फुटल्यास कदाचित् भलताच प्रसंग येईल असं मीच त्याला सुचवलं आहे! महाराजांचा शोध खास लागत नाहीं, असं पाहून सुशीलेबरोबर तीव्रसेनाला रणधीरकर हंबीररावाकडे पाठवून दिल्या मुळें माझा बाळ आतां सुरक्षित झाला! म्हटलं सुशी-ला जवळ आहे तेव्हां आतां मला बाळाची मुळीच काळजी नको! पण देवा! अशा स्थितीं सुद्धां तुला आमची दया आली नाहींना! माझ्या सुख दुःखाच्या वाटेकरणीला इतक्यांतच तूं माझ्या पासून दूर केलीसना! सुशीले, बाई तूं पुण्यवान खरी! आणि म्हणूनच या हतभागिणीच्या आधीं अक्षय सुख भोगण्याकरतां गेलीस! आतां माझ्या लाडक्याजवळ तुझ्या इतकं मायेचं कोण आहे! बाकी हंबीररावानें 'मी आपल्या मुलाप्रमाणेंच तीव्रसेनाला मानीन' असं वचन दिलं आहे! असो. आतां मेळ्याचे लोक जमले असतील, तेव्हां लवकरच आपल्याला तिकडे गेलं पाहिजे! कारण दररोज मी अशी जर फार वेळ बाहेर एकटी राहूं लागलें तर ठीक नाहीं! (इकडे तिकडे फिरूं लागते).

(इतक्यांत विषयीराव व एक चाकर येतात.)

विषयी०—[ चाकरास ] तूं पुढें होऊन चंद्रसेन महाराजांना सर्व वृत्तांत सांगून मीही मागोमागच

येत आहे असं कळव ! कारण मी फार दमल्यामुळे किंचित् विश्रांतीस्तव येथेंच झाडा खालीं बसणार आहें ! अर्ध्या घटकेनें मीही येतों ! जा लवकर ! महाराज माझी वाट पहात असतील !

( चाकर जातो )

विषयी०—[ आपल्याशीं ] गुलामा, आतां मात्र तुझे दिवस भरले असं तूं पूर्ण समज ! राज्यक्रांती माझ्याचमुळें होऊन तुला आपल्या सुखाचा विचार-ही माझ्याचमुळें करतां आला ! व आतां त्याच्या उलट होऊन तुझे हाल हाल करण्याचा प्रसंगही माझ्याचमुळें येणार ! व मीच आणणार ! आतां तुझे हाल झालेले पाहीन तेव्हांच मला स्वस्थता वाटेल ! ही भयंकर हकीगत चंद्रसेन महाराजांना कळवून हरामखोरा, केव्हां तुझा सूड उगवतांना पाहीन असं मला झालं आहे !

चंद्रिका —[ आपल्याशीं ] हे पहा ! रामलाल, शिवलाल वगैरे सर्व नमूं लागले ! चला तर आतां आपणही जावं ! [ पाहिलेंसें करून ] अगबाई ! हा कोण बरं येथें विचारांत उभा आहे ! [ न्यहाळून पाहून ] हा विषयीराव ! आतां काय बरं करूं! आपल्या लोकांना शीळ घालून येण्याबद्दल खूण केली पाहिजे! [ शीळ वाजवते. इतक्यांत शिवाजी, रामलाल,

शिवलाल वगैरे येऊन विषयीरावाभोंवती वेढा घालतात ]

लिंबाजी —[ त्यास ओळखून ] कोण विषयीराव ! वा ! गुलामा, फार चांगला सांपडलास ! स्वराज्याची नासाडी करणारा घातकीरावापेक्षांही अधम तो तूंच ना ! गुलामा, [ चंद्रिकेकडे बोट दाखवून ] त्या वेळीं मातोश्रीसमान सर्वांच्या स्वामिणी ज्या या चंद्रिका राणीसाहेब त्यांच्याशीं "आतां संगमसुख घेणारा बहाद्दर हाच" असे शब्द प्रत्यक्ष महाराजांसमोर उच्चारून त्यांच्या हृदयावर वज्राप्रमाणें घाव हाणणारा तो तूंच का ! "आमची आतां स्वामिभक्ति बुडाली ! आह्मी अत्यंत सुखांत रहाणार" असं ह्मणणारा निर्लज्ज तो तूंच का ! जो लिंबाजी तुला परसांतली भाजी वाटत होता, तोच हा आतां तुझ्या नरडीचा घोंट घेणार समजलास ! ( लोकांस ) तुह्मी आश्चर्यांत काय पडलां ! तुमचा नाईक जो तुह्माला आजपर्यंत बखतसिंग या नांवानें ठाऊक होता, त्याला वीरसेन महाराजांचा नम्र सेवक लिंबाजी असं आजपासून समजा ! आजपर्यंत ज्यांना तुह्मी धनपाल असं समजत होतां, ते धनपाल नसून दुर्दैवानें अशा स्थितींत रहायचं कपाळीं आलेल्या चंद्रिका राणीसाहेब आहेत! चलाउठा! काय पहातां! बांधा गुलामा. ा ! नाहं ! अ... मूर्ति जिवंत ठेवतां कामा नये !

( असें ह्मणून त्यास वार करून पाडतो ) भोग गुला. मा आपल्या कर्माचीं फळं !

विषयी०—हायहाय ! वीरसेन महाराज, आतां मात्र माझा निरुपाय झाला ! चंद्रसेन महाराजांना आपल्यावर गुदरलेल्या प्रसंगाची बातमी आतां कोण देईल ! महाराज, माझा चाकर पुढें गेला आहे त्यानें नीट उमज पडण्या सारखं सांगितलं तर बरं ! नाहीं तर चंद्रसेन महाराजांना देखील पुन्हा माझा संषय येऊन ते मजविषयीं तिटकारा दर्शवतील !

चंद्रिका —अरे लिंबाजी, हें काय ह्मणत आहे हा ! ( गाहिंवरून) खरोखर कांहीं तरी दगा आहे ! तिकडची आणि माझी आतां खास गांठ पडत नाहीं! अरे बाबा काय बडबडलास तूं! या प्रसंगीं हंबीररावांना कोण कळवील !

विषयी०—आईसाहेब, काय सांगूं ! माझं हतभाग्याचं सांगणं आपल्याला खरं वाटणार नाहीं ! खचित आईसाहेब, माझ्या अधमपणाबद्दल मला झालं हें योग्य शासन झालं ! आतां माझी इच्छा ह्मणाल तर कृतकर्माबद्दल आपल्या तोंडून एकवार ‘ क्षमा ’ हे शब्द निघावे ! आईसाहेब वेळ घालवूं नका ! वीरसेन महाराज पुन्हा त्या घातकीरावाच्या हातीं लागले आहेत !

चंद्रिका—हायहाय ! आतां मात्र माझ्या सौभाग्य मंदिराला अग्नि लागला ! ( मूर्च्छित पडते )

**शिवाजी**—( जवळ जाऊन ) हां हां ! वहिनी-साहेब, अशा प्रसंगीं मन अगदीं घट्ट केलं पाहिजे ! वहिनीसाहेब सावध व्हा ! असं काय ! " आम्ही तळ हातावर शीर घेऊन आपण सांगाल तें करण्याला तयार आहों " असं अश्वासन देणारे हे आपले लोक तयार असतां आपण अशा निराश कां होतां ! सावध व्हा !

**रामलाल**--खरं आहे नाईकसाहेबांचं ह्मणणं! आईसाहेब, आम्ही आपल्या हुकमाचे ताबेदार आहों! फक्त आपला हुकुम होण्याचा अवकाश आहे ! आपल्या या सुवर्णमालिना देशांत इमानी रजपूत बच्चा म्हणून आतां कोणीच उरला नाहीं, असं समजू नका ! सर्वांनाच म्हणजे स्वामिभक्तीनें सोडलं असं नाहीं ! सर्वच म्हणजे स्वराज्य व स्वातंत्र्य याबद्दल विचार करीनासे झाले असं नका मानूं! सर्वच म्हणजे ' अल्लाच्या ' स्मरणांत गुंग होऊन परवशतारूपी जाळ्यांत सांपडले आहेत असं नव्हे ! हे पहा आम्ही सर्व रजपूत आपल्या प्राणांची देखील आशा सोडून आपल्या हुकमाची वाट पहात आहों ! आई साहेब, आपण धीर कां खचूं देतां ! हें पहा आम्ही या घटकेला निघण्याला तयार आहों !

**चंद्रिका**--( सावध होऊन ) आतां तिकडची व माझी पुन्हां गांठ पडेल का !

**शिवाजी** —वहिनीसाहेब, आपण त्याविषयीं अ-

गर्दी निश्चिंत असा ! ( विषयीरावास ) विषयीराव, तुम्ही महाराज हातीं लागले म्हणून म्हटलेंत तर तें काय ? ( आपल्याशीं ) अथवा हा अधम असं कांहीं तरी सांगून वइनीसाहेबांना व मला कांहीं भयंकर प्रसंगांत तर नाहींना लोटण्याचा विचार करीत !

विषयीराव —आईसाहेब, शिवाजी, माझ्यानें आतां ज्यास्त बोलवत नाहीं ! महाराजांचा उदयिक सायंकाळीं सूर्यास्तापूर्वी दोन घटका मोठ्या इतमामानें वाजत गाजत आणून सत्यपुरीतील आपल्या राजवाड्यासमोरील भव्य मैदानांत शिरच्छेद करावा असा हुकुम सुटला आहे ! म्हणूनच आईसाहेब, ही बातमी आजच्या आज कळून महाराजांची सुटका करण्याचा यत्न करावा या हेतूनें निर्गुडवनांतल्या अंबिकेच्या देवालयांत चंद्रसेन महाराजांकडे इतक्या त्वरेनें जात होतों; व मध्यें अर्धी घटका विसावा घ्यावा म्हणून चाकरास पुढें पाठवून या झाडाखालीं विचार करीत उभा होतों, तों हा असा प्रकार झाला ! आईसाहेब, आतां कसेंही करून मी सांगितलेल्या ठिकाणीं पुन्हां आपला मनुष्य पाठवून झालेलें सर्व वर्तमान त्वरित कळेल असं करा ! व " मी आपलं वचन पाळून तें पुरं करण्यांतच माझा अंत झाला " असं त्यांना कळवा ! आईसाहेब, आतां एकवार स्वमुखानें ' क्षमा ' असं म्हणा, व महाराजांची व आपली भेट होतांच माझ्या वतीनें क्षमा मागा ! शिवाजी, तू धन्य आहेस ! आतां

एकवार मला ' क्षमा ' आहे म्हणून सांग म्हणजे मी सुखानें ' राम ' म्हणतों ! अरेरे ! माझा घसा कोरडा पडत चालला ! हायहाय ! माझी जीभ आंत ओढू लागली ! ( बडबडतो ) काय ! स्वराज्याची हानि केली म्हणून लयकर्ता आपल्या राज्यांत न नतां यमाच्या म्हणजे यवनांच्या राज्यांत ढकलणार! नको मला परावलंबन नको ! अरे नकारे असं म्हणूं ! पण तुम्ही कोण ! काय ! काळपुरुष ! अरे अरे अरे ! आईसाहेब, लिंबाजी, तुम्ही नाहींना मला क्षमा करीत!

**लिंबाजी**—( गहिंवरून ) मी आपल्याला अंतःकरण पुर्वक क्षमा करते बरं ! हर हर !

**चंद्रिका**०-विषयीराव, मी देखील तुला क्षमा करतेबरं !

**लिंबाजी**०-अरे, एकजण यांच्या बोटांतील ही अंगठी घेऊन त्या अंबिकेच्या देवालयांत जा; व अंगठीची खुण दाखवून यांनीं सांगितलेली व येथें घडलेली सर्व हकीगत चंद्रसेन महाराज तेथें आहेत त्यांना कळवा :

**विषयी**०-माझी तलवारही बरोबर न्या ! अरे अरे! आ-आ-आ-आई-साहेब, ये - ये-ये - ये तो मी आता ! रा -रा- रा-रा -राम म-म- महाराजानां मा-मा-मा-मा- ( मरतो )

**लिंबाजी**०-अरे अरे अरे ! विषयीराव अखेर तूं आइयाच हातून मेलास अं ! शिव शिव ! असो! शिव

लाल, आतां अगोदर आजच्या आज स्वारीची तयारी करा. हें प्रेत नीट जपून स्वारी बरोबर द्या! व वइनीसाहेब! चला आतां तयारीच!

चंद्रिका०—शिव शिव! अखेर तरी निषधीराव सच्चारितात मेला, एवढं ठीक झालं!

( पडदा पडतो )

**प्रवेश चवथा समाप्त.**

---

## प्रवेश पांचवा

**स्थळ—सत्यपुरी—रस्ता.**

( घातकीराव एकटाच येतो. )

घातकी०—( आपल्याशीं ) बस्स! आतां तर मी म्हणेन तें करीन! आजचा हा विधि उरकला कीं झाल! चंद्रसेन वगैरे मंडळी बंडाळी करण्याच्या विचारांत आहेत! परंतु "त्यांचाही आजच शोध लागल्यास वीरसेनाबरोबरच पुसतपास कांहींएक न करतां त्यांची व्यवस्था लावावी" असा सुभेदारसाहेबांचा हुकुम आहे! हे कांटे एकदा नाहींसे झाले कीं आमचा रस्ता साफ! मग स्वसौख्याच्या बाबतींत

विचार करण्याला मी मोकळा होईन! आजकाल चालवलेल्या धामधुमीपासून लोकांची चळवळही बऱ्याच अंशीं बंद पडल्यासारखी झाली आहे! कारण या धामधुमीमुळेच माझ्या सुभेदाराला पुन्हा विश्वास आला! आतां मात्र वीरसेनानें मला यःकश्चित मानल्याचा मी खरा सूड उगवला, असं मला वाटत आहे! तरी पण गुलामानो, तुमच्या सर्वांच्या माना मांगांनीं उडवलेल्या ज्या वेळीं मी प्रत्यक्ष पाहीन, त्यावेळीं माझा आत्मा तुष्ट होईल! हा विचयोरात परत येऊन काल वीरसेनाला देहांत शासन देण्याचं ठरल्या पासून पुन्हा कोठें नाहींसा झाला! काय! हाही त्या बंडवाल्यांना सामील होऊन कांहीं घोटाळा करणार असेल! गुलामा, तसं कांहीं असेल तर तें तडीस जाईल असं नको समजूं! ज्या सुभेदाराची इतकी वाखाणणी झाली आहे, व हें कार्य तडीस नेण्याचा ज्याचा कृत संकल्पच आहे तो ह्मणजे अशा वेळीं बेसावध राहील असं नको मानूं! आज तर चहूंकडे हत्यारबंद शिपाई फिरत आहेत! काय चालणार आहे तुमचं! असो! आतां लवकरच वधस्थानाकडे गेलं पाहिजे! (पाहून) अरे! हे कोण येत आहेत इकडे! हेच ते दोघे ब्राह्मण्याचा तोरा मिरवणारे गृहस्थ! थांबा! गुलामांनो, तुह्माला स्वराज्य पाहिजे नाहीं! मिळेल!! आणि तेंच तुह्माला मिळावं

ह्मणून मी खटपटींत आहे ! हल्लीं या चालू असलेल्या यज्ञांत तुमचीही आहुति देण्याचा माझा विचार आहे! समजलांत ! काय ! हे या कोंपऱ्यावर बोलत उभे राहिले ! तर मग हे काय बोलतात तें आपल्याला ऐकलं पाहिजे ! (आड उभा राहतो )

( दोन गृहस्थ येतात. )

**गणपतराव**—माधवराव, आज राहूची पूर्ण छाया पडून खग्रास बरं ! हर हर ! माधवराव, आतां मात्र आपल्याला हें असह्य होत चाललं ! अहो प्रत्यक्ष ज्यांची स्वारी बाहेर पडली असतां त्रिवार जमिनीला हात लावून आम्ही मुजरा करीत होतों; तेच धडधडीत आपल्या डोळ्यांदेखत बलात्कारानें त्या मांगड्यांच्या हातून परलोकवासी होणार हें पाहून आपण स्वस्थ बसावं काहो! अहो लोकहो! उठा! आजचा प्रसंग ह्मणजे मालोजीमहाराज भ्रष्ट होण्यापूर्वी दोन दिवस जसा होता तसाच आहे ! पूर्वी एका काळीं तुह्मी खरे राजनिष्ठ होतां, तुमच्यांत एकी पूर्ण होती, तुह्मी शौर्यादि गुणांचे मूर्तिमंत पुतळे होतां, असं जें म्हणतात त्याची सत्यता पहाण्याची खरी वेळ आजच आली आहे ! अहिनकुलाप्रमाणें हिंदु व मुसलमान यांत चालत आलेला परंपरा वैरभाव तो आज खरा आहे असं दाखवा ! तुमच्या पूर्वजांच्या शौर्याचा कांहीं अंश जर तुमच्यांत असेल, तर त्याचा आज उपयोग करून सर्व जगाला तुह्मी खऱ्या

चे पूत आहां असें भासवा ! आज जो कोंदणां-तून गळलेला हिरा अग्नींत भंगून जात आहे, तो ज-पून ठेवून पुन्हा कोंदणांत बसवतां येईल असें करा ! ज्यांचा अभिषेकोत्सव आपण पहाणार होतों त्यांचा कंठच्छेद आपण पहाणार ना ! हाय ! हाय !

माधव०—गणपतराव, काय हा वेडेपणा ! इतके भांबावलां काय ! असा उन्मत्तवायू चांगला नव्हे !

गणपत०—काय ! प्रत्यक्ष आपला बाप नष्ट होत असतां मुलाची भयंकर स्थिति होणें याला उ-न्मत्तवायु म्हणतात ! बेहेत्तर आहे ! जें होईल तें होईल ! आज एक महाराजांची सुटका अथवा त्यांच्या देखत आपल्या प्राणांची आहुति ! चला त्या होमकुंडाकडे ! आज मी म्हणतों कीं त्यांत असंख्य प्राणांच्या आहुति पडणार आहेत !

( इतक्यांत घातकीराव मागून येऊन उभयतांस वार करून खालीं पाडतो. )

घातकी०—ही प्रथम तुमची आहुति मी देतों !

( इतक्यात गणपतराव त्यास मारण्याकरितां त-साच उठतो; तों घातकीराव निघून जातो ).

( पडदा पडतो. )

प्रवेश पांचवा समाप्त.

---

## प्रवेश सहावा.

स्थळ—राजवाड्यापुढील मैदान—वधस्थान.

[ दवंडीवाला, शिपाई व मांगांनीं धरलेला **वीरसेन** येतात ]

**दवंडी०**—चला हटा! रस्ता सोडा! व्हा बाजूला! हे पहा मांग महाराजांना घेऊन येत आहेत! व्हा बाजूला! लोकहो ऐका—

"तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं राज्यक्रांतीचे वेळेपासून बरींच वर्षे तुरुंगांत असलेले युवराज महाराज **वीरसेन** हे एक वर्षापूर्वी आपल्या विश्वासु चाकरासह मोठ्या युक्तीनें पळून गेले होते; त्यांस, आज आठ दिवस झाले, नजर खेड्यांतील एका ब्राम्हणानें पकडून दिले. या अधम, दुष्ट व घातकी ब्राम्हणास त्यानें केलेल्या या कृत्याची बक्षिशी घेण्याकरितां महाराजांनीं स्वतः त्याच घटकेला यमाच्या स्वाधीन केला! आतां महाराजांना आजच देहांत शासन देण्याचें ठरल्यावरून महाराजांच्या या दुःखकारक मरणानंतर आजपासून तीन दिवस पर्यंत सर्व आबालवृद्धांनीं दुःखप्रदर्शन करावें, असा **सुभेदार** साहेबांचा हुकूम आहे हो!"

**१ ला शि०**—चलो भाई! रस्ता छोडके खडे रहेना! ये देखो सुभेदारसाहाब, अप्पासाहाब वगैरा सब आ रहे! चलो पीछे हटो!

( इतक्यांत दिलेलशहा, घातकीराव वगैरे येतात. )

**घातकी०**—( डोळ्यांस पदर लावून ) अरे बाबानों, आणवा महाराजांना वधस्थानाजवळ!

( वीरसेनास आणून उभा करितात )

**घातकी०**—( रडण्याचें मिष करून ) सरकार' आपल्या वर्तीनें आपल्याकरतां माझेकडून झाली तितकी रदबदली मी करून पाहिली; परंतु सरकार " एकदां सुटलेला हुकुम कधींही फिरायचा नाहीं ' असा मला निक्षून जबाब मिळाल्यामुळें मी अगदीं निरुपाय झालों आहें! आतां मी तरी काय करूं! आपले प्राण कायम रहावे म्हणून मी आपला देखील प्राण देण्यास तयार झालों! परंतु काहीं नाहीं सरकार, मी काय जास्त बोलूं! आतां आपण स्वतः तरी चार शब्द बोलून पहा!

**वीरसेन**—( आपल्याशीं ) शिव! शिव! शिव शिव! धिक्कार असो मला! ज्या वाड्यापुढें " स्वारी बाहेर पडेल केव्हां व आम्ही पाहूं केव्हां " या उत्कंठेनें लोक उभे असायचे! त्याच वाड्यापुढें माझा आतां होणारा वध पहाण्याला इतकी लोकांची गर्दी झाली अं! ( दीर्घ श्वास सोडून ) हरहर! मला पाहिलं म्हणजे माझ्या तोंडून काय निघतं या भीतीनें जो घामाघुम होत असे, तो धोतरंबडव्या हा अधम अंतकाळीं देखील वज्राप्रमाणें लागणाऱ्या कठोर शब्दांनीं ताडीत आहे अं! असो. आतां काय,

( वर पाहून ) हे सूर्यनारायणा, हेपंचमहाभूतानों हे जगच्चालका तुम्ही सर्व आतां या हातभाग्याला आपला आश्रय द्या! ( दुःखानें भांबावून ) बाबा, आलोंच मी आतां तुमच्या भेटीला बरं! सखे, या वेळीं तूं कोठें असशील! हर हर! पुत्रमुख सुद्धां पहाण्याचं कपाळीं नाहीं माझ्या! सखे, आतां ही प्राप्तवैधव्याची बातमी तुला समजल्यावर तूं काय करशील! अरे अरे अरे! ती कल्पना माझ्या मनांत येतांच मलाच जर आतां इतकं दुःख होत आहे, तर प्रत्यक्ष तुझी काय अवस्था होईल! परंतु कांहीं विपरीत करून बाळाला मागें एकटा ठेवूं नको बरं! आपल्या क्षत्रिय धर्माला उचित तेंच कर ह्मणजे झालं! अस्तु! तुम्ही दोघंही कोठें तरी खुशाल असा ह्मणजे झालं! मित्रा चंद्रसेना! तूंही असशील तेथें सुखी रहा! लिंबाजी, विनाकारण श्रम करूं नको! सुखानें राहून कालक्षेप कर! येतों बरं! प्रजाजनहो, तुह्मी देखील सुखानें रहा! मात्र चालवलेला क्रम सोडून जेणेंकरून इष्ट गोष्टीच साध्य होतील असं करा! विनाकारण "आपलं नुकसान व जगाचं हंसं" असं मात्र करून घेऊं नका! असो. अरे बाबानों आतां उशीर कां! हा पहा दिवस बुडण्याच्यासुद्धां बेतांत आला!

१. **मांग**—म्हाराज, घ्या देवाचं नांव!

२ रा. **मांग**—दादा, अन् आता वोढाताण न्हाई चालनार!

**वीरसे०**—नाहींरे बाबा ! मी कशाला ओढाताण करूं ! ज्यापासून ताद्दश फायदा न होतां उलट जिवाला मात्र क्लेश होणार तसं मी कां करीन ! नाहीं बरं ! खुशाल चालूं द्या ! मात्र पहिल्या घावाबरोबर काम उरका ह्मणजे मी तुमचे त्या लोकीं देखील आभार मानीन ! आतां माझं कांहीं म्हणणं नाहीं तुम्हाला !

१ ला मांग—म्हाराज, सरकार म्हनत्यात आपली काइबी बिच्छा व्हाइली असल तर सांगा !

**वीरसे०**—नाहीं बरं ! माझी कांहीं इच्छा नाहीं ! फक्त प्रियेची एकवार भेट होऊन चंद्रसेनादिकांची बातमी कळती तर ठीक होतं ! परंतु तसं नाहीं कपाळीं ! असो. आतां नका उशीर लावूं !

२ रा मांग—नीट मान व्हाउद्या !

( तरवार उगारतो इतक्यांत **चंद्रिका** आपल्या लोकांसह येऊन मांगास मारते व वीरसेनाच्या गळ्यास मिठी मारते )

**चंद्रिका**— महाराज, कायही आपली दशा मांडली आहे मेल्यांनीं ! ( घातकीरावास ) थांब ! मेल्या, आतांच्या आतांच तुला यमाच्या स्वाधीन करतें ! अरे पहातां काय ! महाराजांच्या हातीं एक शस्त्र द्या ! आणि त्या दाढीवाल्या सुभेदाराला कैद करा ! ( घातकीरावास ) मेल्या मर आतां ! ( असें ह्मणून घातकीरावाच्या अंगावर धांवून जाते )

**घातकी०**—रांडे, (असें ह्मणून चंद्रिकेस वार करतो,

( इतक्यांत वीरसेन शस्त्र घेऊन त्याचे अंगावर धांवून जातो, तोंच चंद्रानना घातकीरावाला मारण्याकरतां धांवून येते, तों चुकून वीरसेनास वार होतो व तो पडतो. )

चंद्रानना– ( पाहून व घाबरून ) हाय हाय! महाराज आपण मध्यें होतां हें आवेशांत असल्यामुळें न कळून असं झालं! महाराज, काय हें या चंद्राननेच्या कपाळीं होतं !

वीरसे०– (जागेवरून) कोण! चंद्रानना! अहाहा ! चंद्रानने, परमेश्वरानेंच तुझा हात चुकवला! असो. बंधु हत्येचं तरी पातक घडलं नाहीं तुला !

घातकी० – मी कुठे पण भगिनी हत्येचें पातक समजतों ! ( असें ह्मणून चंद्राननेस वार करितो; इतक्यांत शिवाजी आपल्या लोकांसह येऊन घातकीरावास खालीं पाडून त्यास वार करितो. )

शिवाजी–अधमा, केवढं भयंकर कृत्य हें! हा तुझा बाप शिवबा पाहिला का !

( इतक्यांत धरा, मारा, कैद करा असें ओरडत चंद्रसेन आपल्या लोकांसह येतो. )

चंद्रसेन– ( पाहून व घाबरून ) अरे अरे अरे ! काय हें! किती हत्या ह्या ! आणि महाराज कोठें आहेत ! ( चहूंकडे फिरून व पाहून ) कोण सरकार! हाय हाय ! काय ही भयंकर स्थिति आपली! ( आश्चर्यानें ) ऑं ! या तर राणीसाहेब ! अहाहा ! वहिनीसाहेब, आपणही कशा आलां येथें !

**चंद्रानना**– ( कण्हत ) वीरसेनमहराज, चंद्रिका-बाईसाहेब, –

**चंद्रसेन**–( गर्हिवरून ) कोण चंद्रानना ! हर हर ! हा कोणीं वार केला तुला ?

**लिंबाजी** ....हा पहा सरकार कसा अधम पडला आहे तो !

**घात०**– ( किंचित उठल्यासारखें करून ) महाराज, ही पहा खरी ज्योत आतां पेटूं लागली ! मी कोण, माझा अधिकार किती, माझी योग्यता काय, मीं केलं काय, वगैरे सर्व गोष्टी मूर्तिमंत माझ्यापुढें उभ्या राहूं लागल्या ! दुराचारी, उन्मत्त, साहसी अधम, घातकी--जितकीं विशेषणें द्याल तितकीं थोडींच आहेत ! सरकार, राजद्रोह करणारा अधम मी ! आतां मला बोलण्याची देखील लाज वाटते ! महाराज, मला क्षमा करा हेंच मागणं मागतों मी आतां !

**चंद्रसेन**–सरकार, माझ्याकडे पहा ! मी आपला चंद्रसेन ! वहिनीसाहेब, वर मान करा ! लाडके दोन शब्द तरी बोल ! अरे अरे ! माझं काळीज अगदीं फाटून गेलं !

**चंद्रिका**–चंद्रसेन भाऊजी, लिंबाजी, माझा बाळ मला भेटेल काहो !

[ इतक्यांत तीव्रसेन ( मुलगा ) येऊन तिच्या गळ्याला मिठी मारतो. )

**तीव्रसेन**– ( गर्हिवरून ) हाय हाय ! आई सा-

हेत्र, काय ही आपली दशा! आई, नकोग नको! तू चाललीसना!

चंद्रिका—बाळा. येतें बरं आतां.

वीरसेन— (पुन्हा तिला मिठी मारून) अरे माझ्या आईला कोणी वांचवारे! आई! तूं असं काय म्हणतस! मी हा येतों! (ती बोलत नाहींसें पाहून) आई! आई! अगे कोण आहेरे! ही पहा माझी आई बोलत नाहीं! अरे हें तोंड पहा! तिचे ओंठ हलताहेत! आई माझ्याजवळ बोल तरी! (घाबरून) आईसाहेब! अरे असं काय हें! असे कां डोळे होऊं लागले! आई तुला माझा राग कां आला! आई! मला आतां 'माझा बाळ' असं कोण ह्मणेल. मी 'आई आई' ह्मणून लाडिवाळपणानें कोणाजवळ जाऊं! हा गाढवा कुलांगाराद्विव्या! गर्भसमयापासूनच गुलामा या फेऱ्यांत आई, बाप, राज्य, धन दौलत यांना घातलंस! आणि त्याच फेऱ्यांत त्यांचा होणारा हा भयंकर अंतही पहाण्याला जगलास! धिक्कार धिक्कार असो मला! आई, व्यर्थ ग व्यर्थ! या गाढवाचं ओझ व्यर्थ सहन केलंस! आयांनो, तुह्मी देखील अ.पल्या मुलांचीं ओझीं विनाकारण सहन करीत आहां! कारण यापुढें आतां असेच कुलदीपक निपजायचे व हल्लीं निपजतही आहेत!

चंद्रिका—बाळा संभाळ बरं! महाराज, येऊं मी आतां! शिवाजी माझ्या बाळाचं चांगलं रक्षण कर

बरं! बाळा, येतें बरं आता! म-म-म-महाराज, च-च-च-चंद्रसेनभाऊजी मरतें! रा-रा-रा-रा-राम (मरते.)

**वीरसेन**—नको ग नको! प्रिये, मला येऊं दे. मीही आलोंच. बाळा तीव्रसेना, तूं कसा आलास या ठिकाणीं?

**एकजण**—(पुढें येऊन) सरकार, आपण मला आईसाहेब व लिंबाजी यांचा शोध लावण्याकरितां नजर खेड्यांतून पाठवलं, त्याप्रमाणे त्यांचा शोध करीत मी पुष्कळ फिरलों; परंतु तपास लागेना! पुढें परत येण्याकरितां निघालों, इतक्यांत आपण पुन्हा सांपडलां ह्मणून कळलं! तेव्हां आपल्या तोंडून मी एक दोन वेळां हंबीरराव महाराजांचं नांव ऐकलं होतं, त्यावरून आईसाहेब वगैरे तेथें त्यांचे जवळ असतील असं समजून तिकडे निघालों, तों वाटेंत परवांचे दिवशीं आपणास देहांत शासन देण्याचं ठरलं असं ही समजलं! मग फार जलदीनें तेथें जाऊन हंबीरराव महाराजांस सर्व वर्तमान कळवलं! त्या बरोबर ते सर्व लष्कर बरोबर घेऊन नुकतेच येथें येऊन दाखल झाले! ते येण्यापूर्वींच आईसाहेब, लिंबाजी, चंद्रसेन, चंद्रानना यांनीं बहुतेक मुसलमानांच्या सैन्यास पळ काढण्यास लावून येथपर्यंत येण्याला मार्ग खुला केला होता! पुढें त्यांनीं बाळमहाराजांस मजबरोबर देऊन "लवकरच मुसलमानांचा मोड करून मीही येतो" असं सांगून मला पुढें

पाडूवलं! मला वाटतं मुसलमानांचा अगदीं मोड हो-ऊन त्यांचे बरेच मुत्सद्दी हस्तगत झाले असावे!

वीरसे०—शाबास धन्य आहेस तूं! बाबा, सुखानें रहा! बाळा येतों बरं आता!

( तीव्रसेन 'हायहाय' असें म्हणत मूर्छित पडतो.)

लिंबाजी—बाळमहाराज, असं काय बरं; उठा. सावध व्हा! हानींच्या घातक्या! अहो लोकहो या घातकीरावाचें उदाहरण पाहून तुमच्यामध्यें कोणी असें असाल तर तो गुण टाकून द्या! कारण ज्या प्रमाणें या एकाच्या नीचामुळें या सुवर्णमालिनी देश-च्या राजघराण्याची ही झालेली वाताहत पहात आहां; त्याचप्रमाणें होऊन तुह्मी आपल्या कुळालाही अंतराल! व आज या घातकीरावाप्रमाणेंच ज-न्मापासून बापलेकाच्या ताटातुटींचं पातक—जर तु झाला पाप पुण्याची क्षिति वाटत असेल तर—मींथीं च्याल!

वीर०—माझा प्राण कासावीस होऊं लागला लिंबाजी, ईश्वर तुझं कल्याण करो! चंद्रसेना मु-लाला संभाळ बरं! माझी जीभ ओढूं लागली! चं-द्राननेला वार झाला आहे, तिला संभाळ! बा—बा बा—बाळा. रा—रा—रा—राम ( मरतो. )

चंद्र०—अखेर सुवर्ण मालीनीचा सूर्य मावळला!!

चंद्र०—महाराज, हिच्यावरच प्रेम जसंच्या तसंच

व.र ! \

घातक।

आहेस तूं ! तुझ्

हातून मला मृत्यु आ

म—म—म—म— ( मरतो। ,

( इतक्यांत हंबीरराव

हंबीर०—आणारे ते सर्व कैदी

पासून या प्रांतांत मुसलमानांचा संबंध न.

चहुंकडे द्याही फिरवा ( पाहून ) अरे प०,

वीरसेन महाराज, ताईसाहेब, अखेर आपला

पहाणें नशीबीं आल.

शिवाजी०—( मुलाला पुढें करून ) हं

हा आपला भाचा व आमचा धनी मी तुम

धीन करतों, याचा नीट संभाळ करा,

तोंपरी आपण आहां त्यांना !

( म्हणून शस्त्र घेतो

)